रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ ▌वर्ष ८९▌अंक १४५ ▌पृष्ठे १० ▌MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in

रायगड, रविवार, दि. २ नोव्हेंबर २०२५

# कृषीवल

किंमत ४ ₹



# मतचोरीविरोधात जनआक्रोश

- महाविकास आघाडीचा मुंबईत सत्याचा मोर्चा
- शेतकरी कामगार पक्षाचे हजारो कार्यकर्ते सहभागी
- निवडणूक आयोगाला विचारला जाब
- सामान्य मतदारांचीही मोर्चाला विराट गर्दी

। रायगड/मुंबई । जिल्हा प्रतिनिधी ।

मतचोरी आणि मतदार याद्यांमधील घोळाबद्दल निवडणूक आयोगाचा निषेध नोंदवून लोकशाहीचा आणि खऱ्या मतदारांचा आवाज बुलंद करण्यासाठी शेकाप, महाविकास आघाडी-मनसेच्यावतीने मुंबईत शनिवारी (दि.१) सत्याचा महामोर्चा काढण्यात आला. असत्याविरोधात काढण्यात आलेल्या या धडक मोर्चाला लाखोंची गर्दी उसळली होती. राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार, शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे, मनसे अध्यक्ष राज ठाकरे, शेतकरी कामगार पक्षाचे सरचिटणीस जयंत पाटील, काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सकपाळ, बाळासाहेब थोरात, विजय वडेट्टीवार, राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे, खा. सप्रिया सुळे, आ. जयंत पाटील, जितेंद्र आव्हाड, कम्युनिस्ट पक्षाचे नेते रानडे आदी मान्यवर उपस्थित होते. त्यांनी आपल्या भाषणातून निवडणूक आयोगाला मतचोरीचा जाब विचारत चांगलेच धारेवर धरले. मुंबईच्या फॅशन स्ट्रीट ते आझाद मैदानापर्यंत हा मोर्चा काढण्यात आला होता.

## मोर्चाला अलोट गर्दी

दुबार मतदार यांच्याविरोधात शेतकरी कामगार पक्ष, महाविकास आघाडी-मनसेच्यावतीने सत्याचा विराट मोर्चा आझाद मैदानावर काढण्यात आला. चर्चगेट ते आझाद मैदानापर्यंत असलेल्या मोर्चाला दुपारी साडेबारानंतर सुरुवात झाली. सरकारसह निवडणूक आयोगाविरोधात घोषणा देण्यात आला. या मोर्चात लाखोंच्या संख्येने कार्यकर्ते सहभागी झाले होते. दरम्यान, कार्यकर्त्यांनी बोगस मतदार यादीची तिरडी तयार करून अंत्ययात्रा काढली. यावेळी आगळ्यावेगळ्या पद्धतीने निवडणूक आयोगाच्या कारभाराचा निषेध व्यक्त करण्यात आला. यावेळी शेकाप कार्यालयीन चिटणीस ॲड. राजेंद्र कोरडे, राज्य महिला आघाडी प्रमुख ॲड. मानसी म्हात्रे, शेकाप जिल्हा चिटणीस सुरेश खैरे, जिल्हा चिटणीस मंडळाचे सदस्य अनिल पाटील, शेकाप अलिबाग तालुका चिटणीस सुरेश खैरे आदींसह हजारो कार्यकर्ते उपस्थित होते.

## मतांचा अधिकार टिकविण्यासाठी एक व्हा : शरद पवार



मागील काही वर्षांपूर्वी संयुक्त महाराष्ट्रासाठी लढा पुकारण्यात आला होता. त्यावेळी असेच अनेक मोर्चे काढण्यात आले. आपल्या न्याय्य हक्कासाठी महाराष्ट्रातील प्रत्येकजण या मोर्चात सहभागी झाले होते. आजच्या सत्याच्या मोर्चामुळे संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या लढ्याची आठवण करून देत आहे. देशातील संसदीय लोकशाही जपण्याची वेळ आता आली आहे. संविधानाने दिलेला मतांचा अधिकार टिकविण्यासाठी एक व्हा, असे आवाहन राष्ट्रवादीचे नेते माजी संरक्षणमंत्री, खासदार शरद पवार यांनी केले. यावेळी शरद पवार म्हणाले की, विधानसभा निवडणूकीनंतर सर्वसामान्यांना मोठा धक्का बसला. अनेक ठिकाणी आजही लोक अवस्थ आहेत. देशात सत्तेचा गैरवापर होत आहे.मतदार यांद्याच्या घोळाविरोधात आज सर्वांनी एकजूट दाखविली आहे. संयुक्त महाराष्ट्र चळवीच्या वेळी असेच मोर्चे निघाले, काळाघोडा परिसरातील पान २ वर

## अन्यथा रस्त्यावर उतरू : जयंत पाटील



निवडणुकीत पहिला पाया मतदार याद्या आहेत. तो पाया नष्ट करण्याचे काम राज्यकर्ते करीत आहेत. दबाव आणून निवडणूक आयोगाला हाताशी धरून काम केले जात आहे. त्याच्याविरोधात हा विराट मोर्चा आहे. दुबार मतदार याद्या दुरुस्त केल्या नाही, तर रस्त्यावर उतरून लढा देऊ, असा इशारा शेकाप सरचिटणीस जयंत पाटील यांनी दिला. बोगस मतदार याद्यांच्या विरोधात शेतकरी कामगार पक्ष, महाविकास आघाडी, मनसेच्यावतीने मुंबईत मोर्चा काढण्यात आला. यावेळी पत्रकारांशी संवाद साधताना जयंत पाटील बोलत होते. यावेळी शेकाप नेते जयंत पाटील म्हणाले की, अनेक ठिकाणच्या मतदार यादीमध्ये दुबार नावे आहेत. वेगवेगळ्या भागातील नावे यादीमध्ये घुसविण्यात आली आहेत. चुकीची नावे टाकण्यात आली आहे. सदोष मतदार यादी तयार करण्यात आली आहे. या यादीतून निवडणुका घेणे सरकारचा एकतर्फी निर्णय आहे. सत्ता आणि पैशाची मस्ती पान २ वर

## लोकशाहीसाठी मोर्चा : उद्धव ठाकरे



संयुक्त महाराष्ट्र चळवळीनंतर अशा प्रकारची पक्षांची एकजूट आज दिसून आली आहे. आजचा मोर्चा हा लोकशाहीचे नेतृत्व करण्यासाठी आहे. मते चोरणाऱ्यांना वाटणारी ठिणगी नसून वणवा आहे. या ठिणगीचा उद्या वणवा कधी होईल हे सत्ताधाऱ्यांना कधीच कळणार नाही. सर्व जागरुक देशभक्त आहेत. पान २ वर

## बोगस मतदार याद्या दुरुस्त करा : बाळासाहेब थोरात



मागच्या निवडणुकांवेळी असलेल्या मतदार याद्यांमध्ये अनेक बोगस मतदार आहेत. माझ्या मतदारसंघात ग्रामीण भागात साडेनऊ हजार मतदार याद्या बोगस आहेत, त्यावर हरकती घेतल्या. त्या दुरुस्त पान २ वर

## दुबार मतदारांना ठोकून काढा : राज ठाकरे



आजचा मोर्चा राग, ताकद दाखविण्याचा आहे. दिल्लीपर्यंत समजावण्याचा आणि समजावून सांगण्याचा आहे. आज शेतकरी कामगार पक्षासह राष्ट्रवादी, शिवसेना असे अनेक पक्षातील नेते मंडळी, पदाधिकारी मोठ्या ताकदीने मोर्चात सामील झाले आहेत. शेतकरी कामगार पक्षाचे नेते जयंत पाटीलदेखील या मोर्चात सहभागी झाले आहेत. दुबार मतदार यादी आहे, असे अनेकजण सांगत असताना निवडणुका घेण्याची घाई का केली जाते, असा संताप राज ठाकरे यांनी व्यक्त केला. पुढे ते म्हणाले की, दुबार मतदार याद्या साफ करा, त्यानंतर पारदर्शक याद्या तयार केल्यावर निवडणुका घ्या. यश कोणाला आणि अपयश कोणाला हे उघड होईल. सर्व लपूनछपून काम चालू आहे. कल्याण, मुरबाड भिवंडी येथील साडेचार हजार मतदार पान २ वर

## नाभिकाचा ग्राहकावर वस्ताऱ्याने वार

**पनवेल** : पैशाच्या वादातून नाभिकाने एका ग्राहकावर वस्ताऱ्याने गंभीर वार केल्याची घटना नवीन पनवेल येथे घडली आहे. नवीन पनवेल येथील मंगलमूर्ती मार्केट या ठिकाणी असलेल्या दीपक हेअर कटिंग सलून येथे रवींद्र कल्लाप्पा वाघमारे (३५, धंदा ड्रायव्हर) हा केस कापण्यासाठी गेला असता येथील कामगार सीठा रघुवीर सिंग (२९, रा. देवद) याने आधी पैसे दे, मग तुझे केस कापतो असे बोलला. यावरून फिर्यादी रवींद्र व आरोपी सिठा सिंग यांच्यात वाद झाला. दरम्यान, आरोपीने त्याच्या हातातील दाढी करण्याच्या वस्ताऱ्याने फिर्यादीच्या उजव्या डोळ्याच्या खालील पान २ वर

## भाविकांच्या बसला अपघात

### चालक ठार, अनेक भाविक जखमी

। नेरळ । प्रतिनिधी ।



कर्जत शहरातील दहिवली येथून देवदर्शन करण्यासाठी निघालेल्या भाविकांच्या बसला इगतपुरी येथे अपघात झाला. या अपघातात बसचालकाचा मृत्यू झाला आहे. हा अपघात शनिवारी सकाळच्यासुमार घडला.

कर्जत येथील दहिवलीतून शनिवारी पहाटे महिला भाविक शेगावकडे देवदर्शनासाठी जात असताना बसला अपघात झाला. या महिला भाविक शेगाव आणि त्यानंतर पंढरपूर इथे दर्शन घेऊन ही बस परत येणार होती. मात्र, दुर्दैवाने या प्रवासी गाडीला इगतपुरी येथे गंभीर अपघात झाला. या अपघातात ढाक येथील दत्ता ढाकवळ या तरुणाचा जागीच मृत्यू झाला. बसमध्ये २४ महिला होत्या, अशी प्राथमिक माहिती आहे. बसमधील इतर महिलांना किरकोळ दुखापत झाली असून, त्यांच्यावर उपचार सुरु आहेत.

देवदर्शनासाठी जाताना अशी घटना घडल्याने तालुक्यातून हळहळ व्यक्त होत आहे.कर्जत इथले स्थानिक तरुण आणि प्रवाशांचे नातेवाईक घटनास्थळी पोहोचले असून, महिलांना सुखरूप आणण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत.

## महाराष्ट्र केसरी शेखला अटक

। सोलापूर । प्रतिनिधी ।

आंतरराष्ट्रीय कुस्तीपटू आणि महाराष्ट्र केसरी विजेता पैलवान सिकंदर शेखला पंजाब पोलिसांनी अटक केले आहे. सिकंदर शेखवर अवैध शस्त्र तस्करी, राजस्थान आणि हरियाणातील कुख्यात गुर्जर टोळीशी संबंध असल्याचा आरोप पंजाब पोलिसांनी केला आहे. मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, पैलवान सिकंदर शेखचा अवैध शस्त्र तस्करीच्या रॅकेटमध्ये सहभाग असल्याचा पोलिसांचा आरोप आहे. सिकंदर शेख हा पंजाब पोलिसांच्या ताब्यात आहे. याप्रकरणी पैलवान सिकंदर शेखचे वडील रशीद शेख यांच्याशी संपर्क साधला असता, त्यांनी सर्व आरोप फेटाळून लावले आहेत. पान २ वर

## कर्जतमध्ये महायुती तुटली

। नेरळ । प्रतिनिधी ।



कर्जत विधानसभा मतदारसंघात राज्यसरकार मधील महायुती आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत दिसणार नाही. कर्जत विधानसभा मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने महायुतीमधून फारकत घेतली असून, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष अशी नवीन युती दिसणार आहे. या पक्षाकडून आगामी नगरपरिषद आणि जिल्हा परिषद पंचायत समिती यांच्या निवडणुका लढल्या जाणार आहेत, अशी घोषणा या दोन्ही पक्षाच्या नेत्यांनी दोन्ही पक्षाच्या कार्यकर्त्यांच्या बैठकीत केली.

**राष्ट्रवादी काँग्रेस-शिवसेना ठाकरे पक्षाची युती**

**स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका एकत्र लढणार**

राज्यात राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष हा महायुतीचा घटक पक्ष असतानासुद्धा कर्जत मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेना या दोन पक्षातील विस्तव जात नाही. मागील विधानसभा निवडणुकीत ही दोन्ही पक्ष एकमेकांसमोर ठाकले होते. त्यानंतर आता राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेना ठाकरे पक्षाचे सूत जुळले असून, या दोन्ही पक्षांनी आगामी काळात होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुका लढविण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार हे दोन्ही पक्ष कर्जत विधानसभा मतदारसंघात निवडणूक लढविण्यासाठी एकत्र आले आहेत. या दोन्ही पक्षांनी गेली दोन महिने सुरू असलेली गुप्त बैठकांची राजनीती आज पहिल्यांदा सर्व पान २ वर

## तरुणाचा मृत्यू

। पनवेल । प्रतिनिधी ।

मोटारसायकल स्लिप झाल्याने वीस वर्षीय तरुणाचा मृत्यू झाल्याची घटना पनवेल शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडली. सचिन राजेश पवार (२०, रा. ओवळेगाव) असे मृताचे नाव आहे. या अपघाताची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली. ३० ऑक्टोबर रोजी पहाटे चारच्या सुमारास सचिन पवार आणि विशाल संजय जाधव (रा. ओवळेगाव) हे यमाहा मोटारसायकल क्र. एमएच २१ सीबी ९८८० वरून जात होते. यावेळी सचिनने मोटारसायकल भरधाव वेगाने चालवल्याने ती स्लिप होऊन विमानतळ रोड, लोखंडी टाकीजवळ, चिंचपाडा ब्रिजकडे जाणाऱ्या मार्गावर अपघात झाला. या अपघातात सचिनच्या डोक्याला आणि पायाला गंभीर दुखापती झाल्याने त्याचा मृत्यू झाला. तर, विशाल जाधव हा जखमी झाला.

## न.पा. निवडणुकीचे बिगुल वाजणार

**मुंबई** : पुढील आठवड्यात नगरपालिका निवडणुकीची घोषणा होण्याची शक्यता आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये पहिल्या टप्प्यात राज्यातील २४६ नगरपालिका, ४२ नगरपंचायतीची निवडणूक पार पडणार आहे. २१ दिवसांत निवडणूक प्रक्रिया पार पडताना तात्काळ दुसऱ्या टप्प्यात जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकीचीसुद्धा घोषणा निवडणूक आयोगाकडून केली जाऊ शकते. तर, शेवटच्या टप्प्यात महापालिका निवडणुकीची घोषणा होण्याची शक्यता आहे. दरम्यान, महापालिका, नगरपालिका, नगर पंचायती, जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुका तीन टप्प्यांत पार पाडण्याचे नियोजन करण्यात पान २ वर

### ७० वर्षीय नराधमाचा दोन वर्षे लैंगिक अत्याचार आरोपीसह निर्दयी आईला ठोकल्या बेड्या

## पैशासाठी जन्मदातीने पोरीलाच विकले

। पनवेल । प्रतिनिधी ।

संपूर्ण पनवेल परिसराला हादरवून सोडणारी एक अत्यंत भीषण आणि हृदयद्रावक घटना तळोजा परिसरात उघडकीस आली आहे. लंडनमध्ये राहणाऱ्या एका ७० वर्षीय वृद्धाने भारतात येऊन अवघ्या दहा वर्षांच्या अल्पवयीन बालिकेवर तब्बल दोन वर्षांपासून वारंवार लैंगिक अत्याचार केल्याचा अत्यंत किळसवाणा प्रकार समोर आला आहे.

या घटनेतील सर्वात धक्कादायक आणि संतापजनक बाब म्हणजे, या संपूर्ण अत्याचाराच्या प्रकरणात त्या चिमुरडीची जन्मदाती आईच आरोपीला सक्रियपणे मदत करत असल्याचे तपासात उघडकीस आले आहे. नवी मुंबई पोलिसांच्या अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाने केलेल्या तपासात पैशांच्या लालसेपोटी हा माणुसकीला काळीमा फासणारा प्रकार घडल्याचे आढळून आले आहे. पोलिसांनी या नराधम आरोपीसह पीडित बालिकेच्या निर्दयी आईलाही अटक केली आहे.

या प्रकरणात अटक करण्यात वृद्ध मूळचा पाँडेचेरी येथील रहिवासी असून, सध्या लंडन येथे वास्तव्यास आहे. फारुक अल्लाउद्दीन शेख असे त्याचे नाव आहे. आरोपी फारुक शेख याने दोन वर्षांपूर्वी तळोजा सेक्टर-२० मधील एक फ्लॅट विकत घेतला आहे. तो या फ्लॅटवर दोन-तीन महिन्यांतून एकदा लंडन येथून दोन-तीन दिवसांसाठी येत होता. यादरम्यान पीडित पान २ वर



### अडीच लाख आणि रेशनसाठी विकले

अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्ष व तळोजा पोलिसांनी पीडित मुलीच्या आईकडे चौकशी केली असता, त्यांनाही धक्का बसला. पीडित मुलीच्या आईने आरोपी फारुक शेख याच्याकडून घर भाड्याने घेण्यासाठी अडीच लाख रुपये घेतले होते, त्याचप्रमाणे दर महिन्याचे रेशन धान्यदेखील फारुककडून मिळणाऱ्या रकमेतूनच ती खरेदी करत होती. या पैशांसाठी ती आपल्या दहा वर्षांच्या मुलीला वारंवार फारुकच्या घरी पाठवत असल्याचे तपासात उघड झाले आहे. आपल्या मुलीवर ७० वर्षाच्या व्यक्तीकडून लैंगिक अत्याचार होत असल्याची माहिती असूनही केवळ पैशांच्या मोहापायी निर्दयी आईने हे घृणास्पद कृत्य सुरु ठेवल्याचे तिच्या चौकशीत उघड झाले आहे.

### पोलीसही स्तब्ध

पैशांची लालसा आणि मायेची किंमत न करणाऱ्या जन्मदातीच्या या कृत्याने पोलीस अधिकारीही स्तब्ध झाले आहेत. याबाबत तळोजा पोलीस ठाण्यात बलात्कारासह बालकांचे लैंगिक अत्याचारापासून संरक्षण (पोक्सो) कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून, मुख्य आरोपी फारुक अल्लाउद्दीन शेख आणि त्याला साथ देणारी पीडित मुलीची जन्मदाती आई या दोघांनाही पोलिसांनी अटक केली आहे. या घटनेमुळे संपूर्ण तळोजा परिसरात तीव्र संताप व्यक्त होत आहे.



कृषीवल
। रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग
। आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७
। MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)



# सासवणे ग्रामपंचायत सरपंच, सदस्यांनी स्वीकारला पदभार

## कोकण आयुक्तांच्या निर्णयाला ग्रामविकास मंत्र्यांची स्थगिती



**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

**अलिबाग तालुक्यातील सासवणे ग्रामपंचायतीचे सरपंच, उपसरपंच आणि सहा सदस्यांना पदावरून बडतर्फ करण्याचा कोकण आयुक्तांनी दिलेल्या निर्णयाला ग्रामविकास व पंचायतराज मंत्री जयकुमार गोरे यांनी तात्पुरती स्थगिती दिली आहे. ग्रामविकास मंत्र्यांच्या या निर्णयाचे सरपंच संतोष गावंड यांच्यासह उपसरपंच, सदस्य व ग्रामस्थांनी स्वागत केले आहे.**

शुक्रवारी (दि.३१) सरपंच संतोष गावंड, उपसरपंच सुश्मा नाखवा यांच्यासह सदस्यांनी ग्रामपंचायत कार्यालयात जाऊन पदभार स्वीकारला. यावेळी आपली राजकीय कारकीर्द संपवण्याच्या दृष्टीने काहींनी प्रयत्न केला. मात्र, त्यांना या निर्णयामुळे चपराक बसली आहे. मागील सहा महिन्यांपासून गावातील रखडलेली विकासकामे पूर्ण करून, पुढील कालावधीतही गावाच्या विकासासाठी सर्वो तोपरी कार्यरत राहण्याचा विश्वास सरपंच संतोष गावंड यांनी व्यक्त केला.

सासवणे ग्रामपंचायतीत आर्थिक अनियमितता असल्याची तक्रार एका ग्रामस्थाने कोकण आयुक्तांकडे केली होती. या तक्रारी अनुषंगाने कोकण आयुक्त यांनी २९ एप्रिल २०२५ रोजी निकाल देत ग्रामपंचायत सरपंच तसेच सात सदस्यांना बडतर्फ करण्याचा निर्णय दिला होता. कोकण आयुक्तांच्या या निर्णयाविरोधात सरपंच व सदस्यांनी राज्याचे ग्राम विकास व पंचायतराज मंत्रालयाकडे दाद मागितली होती. याबाबत ग्रामविकास मंत्रालयात सुनावणी पार पडली. सुनावणीदरम्यान सरपंच व सदस्याच्या बाजूने वकिलांनी मांडलेले मुद्दे तपासून घेणे आवश्यक वाटत असल्याचे स्पष्ट करीत, कोकण आयुक्त यांनी २९ एप्रिल रोजी दिलेल्या सरपंच व सदस्य यांच्या बडतर्फी निर्णयाला तात्पुरती स्थगिती देण्यात आली असल्याचा निर्णय ग्रामविकास व पंचायतराज मंत्री जयकुमार गोरे यांनी दिला.

जयकुमार गोरे यांच्या निर्णयानंतर सरपंच, सदस्य व ग्रामस्थ शुक्रवारी ग्रामपंचायत कार्यालय परिसरात जमा झाले. यांनतर सरपंच, उपसरपंच व सदस्यांनी कार्यालयात जात पदभार स्वीकारला. ग्रामस्थांनी सर्वांचे स्वागत केले.

> कोकण आयुक्तांच्या निर्णयाला ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी स्थगिती दिली आहे. त्यामुळे आम्ही ग्रामपंचायतीचा पदभार स्वीकारून जनतेच्या सेवेत रुजू झालो आहोत. या लढ्यात शेकाप सरचिटणीस माजी आमदार जयंत पाटील, प्रवक्त्या चित्रलेखा पाटील व ग्रामस्थ यांचे सहकार्य लाभले. विकासकामे करण्यावर भर देऊन जनतेच्या मनात स्थान निर्माण करू.
> – संजना पाटील, सदस्या

> ग्रामविकास मंत्र्यांनी कोकण आयुक्तांच्या निर्णयाला स्थगिती दिली आहे. ही आम्हाला जनतेचे काम करण्याची संधी मिळाली आल्याचे मानतो. मी शेकापचा मागील २५ वर्षांपासून ग्रामपंचायत सदस्य असून, १५ वर्ष सरपंच आहे. ही कारकिर्द संपविण्याचा काहींनी प्रयत्न केला. यापुढे मागील सहा महिन्यांपासून रखडलेली विकासकामे पूर्ण करण्याचा प्रयत्न करू.
> – संतोष गावंड, सरपंच, सासवणे

> सासवणे ग्रामपंचायत सरपंच व सदस्यांवर जे आरोप झाले होते, त्यावरून कोकण आयुक्त यांनी दिलेल्या निर्णयाला ग्रामविकास मंत्री यांनी स्थगिती दिली आहे. एकप्रकारे सर्वांना गावच्या विकासासाठी ग्रामविकास मंत्र्यांनी दिलेली ही एक संधी आहे. मागील सहा महिन्यांपासून रखडलेली कामे पूर्ण करावीत ही अपेक्षा. तसेच सर्वांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा.
> – स्नेहल देवळेकर, महिला आघाडी अलिबाग तालुका संघटिका, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे)




# महाविकास आघाडी म्हणूनच निवडणुकांना लढणार : भोईर

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

आगामी काळात होणाऱ्या जिल्हा परिषदा, कर्जत पंचायत समिती तसेच नगरपरिषद यांच्या निवडणुकांना शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष महाविकास आघाडीचा घटक पक्ष म्हणून निवडणुकीला सामोरे जाणार आहे. महाविकास आघाडीमध्ये आणखी कोणता पक्ष येणार असेल तर आम्ही सर्व निवडणुका जिंकण्यासाठी एकत्र येऊ, असे मत शिवसेना ठाकरे पक्षाचे जिल्हा प्रमुख माजी आमदार मनोहर भोईर यांनी मांडले. शिवसेना ठाकरे पक्षाच्या कार्यकर्त्यांच्या कर्जत शिवालय येथील बैठकीत भोईर बोलत होते.

आगामी काळात होऊ घातलेल्या जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगरपालिका व ग्रामपंचायत निवडणुकीच्या अनुषंगाने कर्जत तालुक्यातील शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाची आढावा बैठक दि. २८ ऑक्टोबर रोजी सायंकाळी मनोहर भोईर यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. यावेळी प्रमुख पदाधिकाऱ्यांसह कार्यकर्ते उपस्थित होते.

मनोहर भोईर यांनी यावेळी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना आगामी काळात होऊ घातलेल्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सर्वच राजकीय पक्षाने मोठी मोर्चेबांधणी केली आहे.

# शेकडो तरुणांना हक्काचा रोजगार

## शेकापच्या रोजगार मेळाव्याला उत्स्फूर्त प्रतिसाद






**। नेरळ । प्रतिनिधी ।**

शेतकरी कामगार पक्षाकडून नेरळ येथे तालुक्यातील दुसरा रोजगार मेळावा आयोजित करण्यात आला होता. तालुक्यातील या दुसऱ्या रोजगार मेळाव्यात ५०० हून अधिक बेरोजगार तरुणांनी नोकरीसाठी मुलाखती दिल्या.

शेतकरी कामगार पक्ष आणि पक्षाचे नेते अतुल म्हात्रे यांच्या मध्य रोजगार मेळाव्याचे आयोजन नेरळ येथील आगरी समाज हॉल येथे केले होते. या मेळाव्याचे उद्घाटन शेतकरी कामगार पक्षाचे जिल्हा चिटणीस आणि जिल्हा बँकेचे उपाध्यक्ष सुरेश खैरे आणि खजिनदार अतुल म्हात्रे यांचे हस्ते करण्यात आले. त्यावेळी जिल्हा खजिनदार श्रीराम राणे, तालुका चिटणीस तानाजी मते, तालुका सह चिटणीस रवींद्र भोईर, जिल्हा चिटणीस मंडळ सदस्य पुंडलिक शिनारे, पक्षाचे युवक नेते राजेंद्र हजारे आदी प्रमुख उपस्थित होते.

या रोजगार मेळाव्यामध्ये अनेक कंपन्या सहभागी होऊन शेकडो विद्यार्थी सहभागी युवक सहभागी झाले. विशेष म्हणजे, या रोजगार मेळाव्यामध्ये अनेक प्रकारच्या कंपन्या सहभागी झाल्या होत्या. त्यामध्ये ब्लिंकट, एचडीएफसी बँक, एसबीआय बँक, ॲक्सिस बँक, कोटक, लाईव्ह टेक इंडिया, पनवेल प्लेसमेंट नवी मुंबई,५ ग्रुप, युनिकेअर रिमाइंडर अशा अनेक कंपन्यांचे प्रमुख, डायरेक्टर आणि सोबतच कंपन्यांमध्ये ज्या व्हॅकेंसी आहेत, त्याची पूर्तता करण्यासाठी त्यांचा कर्मचारी वर्ग आले होते.

या रोजगार मेळाव्याचे प्रास्ताविक ॲड. रोशन पाटील, तर प्रमुख मार्गदर्शन अतुल नंदकुमार म्हात्रे यांनी केले. शंभरहून अधिक युवकांना नोकरीची संधी मिळाली. त्या कार्यक्रमाचे मुख्य संयोजक राजेंद्र हजारे यांनी संपूर्ण तयारी करून युवकांना नेरळ विभागात उत्तम संधी उपलब्ध करून दिली.

## शिक्षण क्षेत्रात पोस्कोचा पुढाकार

**माणगाव** : रा. जि. प. केंद्र शाळा, जिते या शाळेचा उद्घाटन सोहळा (दि.१४) ऑक्टोबर रोजी अत्यंत उत्साहात पार पडला. या शाळेचे नुतनीकरण पोस्को महाराष्ट्र स्टील कंपनीने आपल्या सामाजिक उत्तरदायित्व उपक्रमांतर्गत केले आहे. कंपनीने विद्यार्थ्यांसाठी सुरक्षित, आधुनिक आणि आकर्षक शिक्षणाचे वातावरण निर्माण करण्याचा उद्देश ठेवून हे कार्य हाती घेतले. ही कंपनीच्या सीएसआर उपक्रमांतर्गत नूतनीकरण झालेली १५ वी शाळा आहे, ज्यामुळे शिक्षण क्षेत्रातील त्यांच्या सातत्यपूर्ण योगदानाची जाणीव होते. शाळेच्या इमारतीची दुरुस्ती, संपूर्ण रंगकाम, इलेक्ट्रिकल फिटिंग, ग्रंथालय, रंगमंच तसेच पायाभूत सुविधांचा समावेश करण्यात आला आहे.

# चोरीचा तपास क्राईम ब्रांचकडे द्यावा



**। पनवेल । प्रतिनिधी ।**

कामोठे येथील गिरीराज सोसायटी, प्रतीक जेम्समध्ये राहणाऱ्या सविता म्हस्कर यांच्याकडील दागिन्यांची चोरी होऊन ४० दिवस उलटून गेले तरीदेखील पोलिसांनी आरोपीला पकडले नसल्याने पोलिसांच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण करण्यात आला. म्हस्कर कुटुंबियांनी शेजाऱ्यांनीच दागिने चोरले असल्याचा आरोप १ नोव्हेंबर रोजी पत्रकार परिषदेत केला आहे. तरी, या चोरीचा तपास क्राईम ब्रांचकडे देण्यात यावा, अशी मागणी म्हस्कर कुटुंबियांनी केली आहे.

१६ सप्टेंबर ते २७ सप्टेंबरदरम्यान अज्ञात इसमाने म्हस्कर यांच्या घरामध्ये प्रवेश करून जवळपास २५ ते २८ लाखांचे दागिने चोरून नेले. या प्रकरणी कामोठे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. १६ सप्टेंबर रोजी यांनी शेजारच्या महिलेला सर्व दागिने दाखवले होते आणि तेच सर्व दागिने चोरीला गेलेले आहेत असे म्हस्कर यांनी सांगितले. यावेळी तपास अधिकारी हे गुन्ह्यातील संशयित आरोपींना पाठीशी घालत असून, त्यांच्या वर्तनाचा त्रास होत असल्याचे म्हस्कर कुटुंबियांनी सांगितले, तसेच तपास अधिकाऱ्यांनी संशयित व्यक्तीविरोधात कोणताही तपास केला नसल्याचे म्हस्कर यांचे म्हणणे आहे. त्यामुळे तपासात हलगर्जीपणा केल्याप्रकरणी खातेनिहाय चौकशी करण्याची मागणी केली आहे. हा गुन्हा गुन्हे शाखेकडे वर्ग करण्याची मागणी केली. याबाबत कामोठे पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक मनोहर पगार यांना विचारले असता या गुन्ह्यासंदर्भात सगळ्या बाजूने तपास सुरू असल्याचे त्यांनी सांगितले.

**■ म्हस्कर कुटुंबियांची मागणी**

# डॉ. संपदा मुंडे यांना न्यायासाठी कॅण्डल मार्च

**। चिपळूण । प्रतिनिधी ।**

फलटण येथील महिला वैद्यकीय अधिकारी डॉ. संपदा मुंडे यांच्या आत्महत्येस कारणीभूत असणाऱ्या सर्व आरोपींवर तत्काळ कठोर कारवाई करावी, तसेच या प्रकरणाचा तपास केंद्रीय गुन्हे अन्वेषण विभाग म्हणजेच सीबीआय, राज्य गुन्हे अन्वेषण विभाग म्हणजेच सीआयडी किंवा विशेष तपास पथक म्हणजेच एसआयटीकडे वर्ग करावा, या मागणीसाठी काल शुक्रवार (दि.३१) ऑक्टोबर रोजी चिपळूण शहरात कॅण्डल मार्च काढण्यात आला. महाराष्ट्र राज्य वैद्यकीय अधिकारी गट अ संघटना, इंडियन मेडिकल असोसिएशन (आयएमए) तसेच वूमन्स डॉक्टर्स विंग यांच्यावतीने हा कॅण्डल मार्च इंदिरा गांधी सांस्कृतिक केंद्र येथे काढण्यात आला. यावेळी सिव्हिल सर्जन डॉ. भास्कर जगताप, डॉ. कांचन मदार, डॉ. अमोल यादव, डॉ. असित नरवाडे, डॉ. ज्योती यादव, डॉ. मनीषा वाघमारे, डॉ. वनिता सानप, डॉ. रूपा मयेकर, डॉ. अभिजित दुधाळ, डॉ. मयेकर, डॉ. साक्षी मोहिते, अभिजीत यादव, सुनील जाणवलकर, रमेश जानवलकर, संदेश म्हटलेकर, स्वप्निल तांबे, अक्षदा पाटणकर, इकबाल चौगुले, विनोद जाधव, नरेंद्र चव्हाण, डॉ. निकिता शिर्के, यांच्यासह आरोग्य कर्मचारी, महिला आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# १५ खलाशांसाठी तो ठरला देवदूत

**■ अतिश कोळी याने जीवाची बाजी लावत वाचवला जीव**

। उरण । प्रतिनिधी ।

उरण तालुक्यातील करंजा पाडा येथील अतिश सदानंद कोळी आणि त्याच्या साथीदाराने आपल्या जीवाची बाजी लावून वादळात अडकलेल्या दोन बोटींवरील १५ खलाशांना सुखरूप करंजा येथे आणून त्यांचा जीव वाचवला आहे. तो त्या १५ खलाशांचा देवदूत ठरला आहे. त्याचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

नुकत्याच निर्माण झालेल्या चक्रीवादळाने रायगडमधील मच्छिमारीसाठी गेलेल्या अनेक मच्छिमारी बोटीचा संपर्क तुटला होता. त्यात करंजा येथील मच्छिंद्र नाखवा मालकाच्या महागौरी नमो ज्ञानेश्वरी या दोन बोटिंचाही संपर्क तुटला होता. त्या बोटिंची वायरलेस यंत्रणा जीपीएस यंत्रणाही बंद होती. त्या बोटींचे काय झाले, त्या बोटींवर १५ खलाशी आणि तांडेल कुठे आहेत हे कोणालाच ठाऊक नव्हते. बोट मालक मच्छिंद्र नाखवा याने अनेक प्रयत्न केले. कोस्टगार्डकडे ही तक्रार दाखल करण्यात आली होती. कोणताही सुगावा लागत नव्हता. फक्त मुंबईपासून आठ तास आतमध्ये त्यांचे एकदा लोकेशन मिळाले होते.

त्यानुसार बोट मालक मच्छिंद्र नाखवा याने करंजा येथील युवक अतिश सदानंद कोळी यांना या बोटीचा शोध घेण्यास पाचारण केले. समुद्र खवळलेला असताना आपल्या जीवाची पर्वा न करता अतिश कोळी याच्यासह भानुदास कोळी बोट मॅनेजर आणि तांडेल असे चौघे जण २७ ऑक्टोबरला उरणच्या करंजा येथून बचावासाठी निघाले. बोटीवरील जिपीएस बंद पडलेला असल्याने मोबाईलच्या जीपीएसच्या सहाय्याने अतिश आणि त्याचे साथीदार जवळपास आठ तासांनी जीपीएसच्या लोकेशनच्या ठिकाणी बोट घेऊन पोहोचले. परंतु त्या ठिकाणी कोणत्याही बोटी आढळून आल्या नाहीत. शोध घेत असताना रात्रीच निघण्याचा साथीदारांच्या मनात आलं होतं. मात्र, अतिशने आपण सकाळी शोध घेऊ असे सांगून बोट त्याच ठिकाणी नांगरून ठेवण्यात आली. दुसऱ्या दिवशी सकाळी बोटींचा शोध घेण्याचा प्रयत्न केला असता जवळपास आठ ते दहा किलोमीटर अंतरावर बोटी दिसून आल्या, मात्र परिस्थिती पाहता दोन्ही बोटी नादुरुस्त झालेल्या होत्या. एका बोटीचे गिअर तुटले होते तर दुसऱ्या बोटीचा पंप निकामी झाला होता. त्यामुळे त्याच ठिकाणी बोटी वादळामध्ये एकमेकांना बांधून नांगरून ठेवल्या होत्या. त्या दोन्ही बोटीवरील राजू सिंग, मनोज सरण, पंकज यादव, राजू गौतम, जगदीश, संतोष कुमार आणि आणखी ९ खलाशी चार दिवस कोणतेही अन्न न शिजवता फक्त बिस्किट आणि पाण्यावरती होते. खूप घाबरलेल्या आजारी अवस्थेत असलेले खलाशी आपला जीव मुठीत धरून होते. कोणीतरी आपला जीव वाचविण्यासाठी देवदूत आला असल्याने ते बिनधास्त झाले. अतिश आणि त्याच्या साथीदाराने बंद पडलेल्या दोन्ही बोटीं त्यांनी नेलेल्या बोटिला दोरीच्या साहाय्याने बांधून परतीच्या प्रवासाला सुरवात केली. वादळामध्ये दोन्ही बोटी एकमेकांना बांधून आणने खूप अवघड होते. आणतेवेळी अनेक अडचणी आल्या दोर ही तुटले होते. या सर्व अडचणनीवर मात करीत २४ तास प्रवास करीत १५ खलाशी आणि दोन्ही बोटी घेऊन करंजा बंदरात दाखल होऊन त्या १५ खलाशांचा जीव वाजवणारा अतिश हा देवदूत ठरला.

पान १ वरून

## मतांचा अधिकार टिकविण्यासाठी

### एक व्हा : शरद पवार

मोर्चे विशेष होते. त्यानंतर आज सगळ्यांनी जबरदस्त एकजूट दाखविली आहे. आजचा मोर्चा जुन्या गोष्टींची आठवण करून देणारा आहे. दुबार मतदार याद्या दुरुस्त होऊन निवडणुका पारदर्शक व्हाव्यात ही भूमिका आहे. त्यासाठीच आज सर्वजण एकवटले आहोत. वेगवेगळे पक्ष वेगवेगळ्या विचारांचे असले, तरी देशातील संसदीय लोकशाही टिकविण्यासाठी आज सर्वजण एक झाले आहेत, असे शरद पवार म्हणाले.

### अन्यथा रस्त्यावर उतरू : जयंत पाटील

घेऊन राज्य केले जात आहे. निवडणुका घेतल्या जात आहेत. त्याला पूर्णपणे विरोध आहे. त्यासाठीच आज मुंबईत महाविकास आघाडी, मनसेच्या वतीने मोर्चा काढण्यात आला आहे. या मोर्चाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. मतदार याद्यातील दुबार नावे, इतर ठिकाणची घुसडलेली नावे, अस्तित्वात नसलेले आणि अपूर्ण पत्ते, वय आणि लिंगातील तफावती, मतदार यादीत फोटो नसणे तसेच मागील वर्षभरापासून वयाची अठरा वर्षं पूर्ण करणाऱ्या तरुणांना सरसकट मताधिकार नाकारणे या आणि अशाप्रकारच्या अनेक दोषांनी सदोष झालेल्या मतदार याद्यांचा वापर करून, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेणे म्हणजे लोकशाहीची घोर थट्टा आहे. संविधानाने दिलेल्या अमूल्य अशा मताधिकारावर दिवसा उजेडी घातलेला दरोडा आहे. राज्य आणि केंद्रातील सत्ताधाऱ्यांनी निवडणूक यंत्रणांना हाताशी धरून ही निवडणूक एकतर्फी करण्याचा कट आखला आहे, आणि म्हणूनच मतदार याद्या दुरुस्त झाल्याशिवाय निवडणूक नको, दुबार मतदार यांद्याबाबत निवडणूक आयोग काय भूमिका घेणार याकडे लक्ष लागून राहिले आहे. त्यांच्या निर्णयाची वाट पाहिली जाईल. त्यानंतर लवकरच पुढील भूमिका महाविकास आघाडीमार्फत घेतली जाईल. दुबार मतदार याद्यांविरोधात रस्त्यावर उतरून हा गैरप्रकार थांबवावा लागणार आहे, असे शेकाप नेते जयंत पाटील म्हणाले.

### लोकशाहीसाठी मोर्चा : उद्धव ठाकरे

सर्व जागे आहेत. जागे राहा अन्यथा ॲनाकोंडा येईल. या ॲनाकोंडाला अडकावे लागणार आहे. मराठी माणसांसह हिंदुत्वासाठी ठाकरे बंधू एकत्र आले आहेत. निवडणुका होणे गरजेचे आहे. लोकशाही जिवंत ठेवण्यासाठी सर्वजण एकत्र आले आहेत. सर्वांनी मतदार यादीमधील नावे तपासा, मते चोरणारे सापडल्यास त्यांना तिथे फटकवा, असे शिवसेनेचे नेते उद्धव ठाकरे म्हणाले. ते पुढे म्हणाले की, जशा निवडणुका होतील, तशी त्यांची दडपशाही सुरु होणार आहे. निवडणूक आयोग लाचार झाला आहे. त्यामुळे सर्व पुरावे घेऊन न्यायालयात जाणार आहोत. अन्यथा जनतेचे न्यायालयच ठरवणार आहे. मतदार याद्या तपासून घ्या. महाराष्ट्राने एक वज्रमूठ आवळली आहे. मते चोरण्याचा प्रयत्न केल्या त्यांच्या टाळक्यात मूठ टाकू, असे उद्धव ठाकरे म्हणाले.

### मतदार याद्या दुरुस्त करा : थोरात

झाल्या पाहिजेत, अशी भूमिका घेतली. त्यावेळी दुरुस्त करण्याचा अधिकार नाही, असे लेखी उत्तर तहसीलदारांनी दिले आहे. हा गंभीर प्रश्न आहे. बोगस मतदार याद्या दुरुस्त झाल्यानंतरच निवडणुका घ्या, अशी मागणी काँग्रेसचे नेते बाळासाहेब थोरात यांनी केली.

### दुबार मतदारांना ठोकून काढा : ठाकरे

आहेत. त्यांनी मलबार हिल मतदार संघातदेखील केले आहे. महाराष्ट्रात लाखो मतदार या मतदानासाठी वापरले गेले आहेत. नागरिकांनी मतदार याद्या तपासून घ्या. दुबार मतदार आल्या, त्यांना चोप द्या. तरच त्यांचा कारभार वठणीवर येईल. रांगेत उभे राहून मतदान करणाऱ्या मतदारांचा अपमान केला जात आहे, अशी घणाघाती टीका राज ठाकरे यांनी सरकारसह निवडणूक आयोगावर केली.

### कर्जतमध्ये महायुती तुटली

जनतेसमोर आली आहे. कर्जत येथील रेडियन ब्लू रिसॉर्टमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेना ठाकरे पक्ष या दोन पक्षांच्या प्रमुखांची बैठक झाली. या नवीन युतीच्या बैठकीत राष्ट्रवादी काँग्रेसकडून जिल्हा अध्यक्ष सुधाकर घारे तसेच जिल्हा कार्याध्यक्ष अशोक भोपतराव, जिल्हा प्रवक्ता भरत भगत, जिल्हा उपाध्यक्ष एकनाथ धुळे, प्रदेश नेते भगवान भोईर यांच्यासह जिल्हा युवक अध्यक्ष तालुक्याच्या युवक, महिला तसेच अन्य सेलचे अध्यक्ष आणि तालुक्यातील पदाधिकारी आदी उपस्थित होते. तर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उपजिल्हा प्रमुख नितीन सावंत, प्रभारी तालुका प्रमुख बाजीराव दळवी, तालुका संघटक बाबू घारे, तालुका संपर्क प्रमुख भीमसेन बडेकर आदींसह युवासेना, महिला आघाडी तसेच तालुक्यातील पदाधिकारी उपस्थित होते. या बैठकीत कर्जत विधानसभा मतदारसंघातील कर्जत, खोपोली, माथेरान या तीन नगरपरिषद आणि खालापूर नगरपंचायत या निवडणुकीसाठी उमेदवार निश्चितीबाबत चर्चा झाल्याचे कळते. तर, तालुक्यात रायगड जिल्हा परिषदेच्या सहा आणि पंचायत समितीच्या १२ जागांसाठी ही युती निवडणुकीला सामोरे जाणार असल्याची माहिती आणि घोषणा या बैठकीत करण्यात आली.

### पैशासाठी जन्मदातीने पोरीलाच विकले

मुलीच्या आईसोबत त्याची घरकामाच्या निमित्ताने ओळख झाली होती. आरोपी फारुक शेख लंडन येथून तळोजा येथे आल्यास पीडित मुलीची आई आपल्या दहा वर्षांच्या मुलीला त्याच्या घरी खेळण्याच्या बहाण्याने सोडून निघून जात होती. यादरम्यान आरोपी पीडित मुलीला मद्य पाजून तिच्यावर अमानुषपणे लैंगिक अत्याचार करत होता. जर तिने कोणाला सांगितले, तर जीवे मारण्याची धमकी देऊन तिला गप्प बसवत होता. गेल्या दोन वर्षांपासून हा प्रकार सुरु होता. काही दिवसांपूर्वी आरोपी फारुक शेख हा लंडन येथून तळोजा येथे आपल्या फ्लॅटवर आला होता. त्यानंतर त्याने पीडित मुलीवर लैंगिक अत्याचार करण्यास सुरुवात केली होती. याबाबातची माहिती नवी मुंबई पोलिसांच्या अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाला मिळाल्यानंतर वरिष्ठ पोलीस निरीक्षक पृथ्वीराज घोरपडे, सहाय्यक पोलीस निरीक्षक योगेश देशमुख, नीलम पवार, सरिता गुडे आदींच्या पथकाने या नराधमाच्या फ्लॅटवर छापा मारला. त्यानंतर आरोपी फारूक शेख याला ताब्यात घेऊन पीडित मुलीची सुटका केली. या आरोपीच्या फ्लॅटच्या तपासणीत दारुची बॉटल, सेक्स पॉवरच्या गोळ्यांची पाकिटे, सेक्स टॉय, व्हॉब्रेटर, पॉसलीन, डिजीटल हीडीओ रेकॉर्डर, डिव्हीआर अशा अनेक संशयास्पद वस्तू आढळून आल्या असून, पोलिसांनी या सर्व वस्तू जप्त केल्या आहेत.

### महाराष्ट्र केसरी शेखला अटक

सिकंदर शेख हा सोलापूर जिल्ह्यातील मोहोळ गावचा कुस्तीपटू आहे. कोल्हापूर इथल्या गंगावेस तालीममध्ये त्यानं लहानपणापासून कुस्तीचे धडे घेतले आहेत. सिकंदर शेखनं महाराष्ट्र केसरीची गदा जिंकून कुस्तीच्या जगात विशेष स्थान निर्माण केलं. हमालाचा मुलगा असलेल्या सिकंदर शेखला महाराष्ट्र राज्यातील कुस्ती क्षेत्रात विशेष स्थान मिळालं होतं. सिकंदर शेखला शस्त्र तस्करी प्रकरणात अटक झाल्यानं त्याचे वडील रशीद शेख यांच्याशी संपर्क साधला असता, त्यांनी सर्व आरोप फेटाळून लावले आहेत. माझ्या मुलावर पंजाब पोलिसांनी खोटे आरोप लावले आहेत. या प्रकरणात त्याला अडकवण्याचा प्रयत्न होत आहे, अशी माहिती रशीद शेख यांनी दिली.

### नाभिकाचा ग्राहकावर वस्ताऱ्याने वार

बाजूपासून उजव्या गालावर ओठापर्यंत वार करून गंभीर दुखापत केली. रवींद्र वाघमारे याच्यावर एमजीएम रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या प्रकरणाचा तपास खांदेश्वर पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक स्मिता ढाकणे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक संजय पारसकर करत आहेत. या घटनेनंतर आरोपी सिठा सिंग याला अटक केली असून, दीपक हेअर कटिंग सलून, मंगलमूर्ती मार्केट नवीन पनवेल हे दुकान तपासासाठी बंद केले आहे.

### न.पा. निवडणुकीचे बिगुल वाजणार

आले आहे. नगरपालिका आणि पंचायतींच्या निवडणुकीसाठी नोव्हेंबरमध्ये मतदान होईल. नगरपालिका निवडणुकीची घोषणा सोमवारी किंवा मंगळवारी केली जाण्याची शक्यता वर्तविली जाते. यामुळे राज्यात आचारसंहिता लागू होईल. मुंबईसह राज्यातील २९ महापालिकांच्या निवडणुका १५ ते २० जानेवारी २०२६ च्या आत घेण्याचा घेण्याचा आयोगाचा प्रयत्न राहणार आहे. नगरपालिका आणि नगरपंचायतींच्या निवडणुकांसाठी नोव्हेंबरमध्ये मतदान होईल. नगरपालिका निवडणुकीची प्रक्रिया सुरू असताना किंवा मतदानानंतर लगेच जिल्हा परिषदा आणि पंचायत समितीच्या निवडणुकांचे वेळापत्रक जाहीर केले जाईल. अतिवृष्टी आणि पुरामुळे सरकारी यंत्रणा अजूनही ग्रामीण भागातील मदतकार्यात गुंतलेली आहे. त्यामुळे या निवडणुका डिसेंबरमध्ये होणार असल्याचे खात्रीलायकरित्या समजते. जिल्हा परिषद निवडणुकीची प्रक्रिया सुरु असतानाच महापालिका निवडणुकांची घोषणा होऊ शकते. सर्वोच्च न्यायालयाने राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्यासाठी ३१ जानेवारी २०२६ ची मुदत दिली आहे. निवडणुकीच्या दरम्यान किंवा नंतर न्यायालयीन प्रकरणे उद्भवण्याची शक्यता लक्षात घेऊन महापालिका निवडणुका मुदतीपूर्वी १० दिवस आधी पार पाडल्या जातील, असे सूत्रांनी सांगितले.

महाराष्ट्रात अतिवृष्टी व पुरामुळे मोठे नुकसान झाले आहे. शेतकऱ्यांसह सामान्य नागरिक त्यातून आतासे सावरत आहेत. त्यातच काही भागात गेल्या आठ-पंधरा दिवसांत मोठ्या प्रमाणात पाऊस झाला आहे. या पार्श्वभूमीवर आधी जि.प. निवडणूक घ्यावी का याबाबत जिल्हाधिकाऱ्यांनी संमिश्र मते व्यक्त केली. अतिवृष्टीग्रस्त भागातील जिल्हाधिकाऱ्यांनी लगेच जिल्हा परिषद, पंचायत समित्यांची निवडणूक घेण्यासारखी स्थिती नाही असे मत नोंदविले. या पार्श्वभूमीवर नगरपालिकांची निवडणूक आधी होईल. याबाबतची घोषणा पुढील आठवड्यात होण्याची शक्यता आहे.

# नवीन पुलाचा खर्च पाण्यात



| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |

भिलजी-रामराज येथील जुन्या पुलाच्या जागी नवीन पूल बांधून दहाहून अधिक वर्षे उलटून गेली. परंतु, अद्यापपर्यंत त्या पुलाचा वापर करण्यात आला नाही. या पुलासाठी करण्यात आलेला लाखो रुपयांचा खर्च पाण्यात गेला असल्याचे चित्र दिसून येत आहे. अजूनही जुन्या पुलाचा वापर केला जात आहे. जिल्हा परिषद बांधकाम विभागाच्या या कारभाराबाबत नाराजीचे सूर उमटत आहेत.

अलिबाग तालुक्यातील रामराज ही मोठी बाजारपेठ म्हणून ओळखळी जाते. दर शनिवारी आठवड्याचा बाजार भरला जातो. कुदे, सुडकोली, नांगरवाडी, उमटे, बोरघर, भिलजी, बापळे, फणसापूर, चिंचोटी, दिवीपारंगी, महाजने, बेलोशी, वावे, मल्याण या गावांसह महाजने दिवीवाडी, सत्यवाडी, होन्डावाडी, धनगरवाडी आदी वाड्यांमधील नागरिकांची या बाजारात खरेदीसाठी अलोट गर्दी होते. अलिबाग, रोह्याकडे जाणाऱ्या प्रवाशांसाठी रामराज हे मध्यवर्ती ठिकाण म्हणून ओळखले जाते. रामराजकडे येणाऱ्या-जाणाऱ्यांची वर्दळ कायमच असते.

■ लाखो रुपये खर्च करून बांधलेला पूल बेवारस

■ अजूनही रामराज येथील जुन्याच पुलाचा वापर

भिलजी बोरघर आणि रामराज येथील जुन्या पुलाचे कठडे तुटल्याने त्या जागी नवीन पूल बांधण्याची मागणी त्यावेळी झाली होती. त्यानुसार जिल्हा परिषद बांधकाम विभागामार्फत २०१५ पूर्वी नवीन पूल बांधण्यात आला. जुन्या पुलाच्या बाजूलाच नवीन पूल बांधण्यात आला. पावसाळ्यात नदीला पूर येत असल्याने पुलावरून पाणी जाते. त्यामुळे पुलाची उंचीदेखील वाढवण्यात आली होती. नवीन पूल बांधल्याने या मार्गावरील नागरिकांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले होते. परंतु, त्यांच्या आनंदाला विरजण पडले.

> रामराज-भिलजी येथील बांधलेल्या नवीन पुलाची पाहणी करून तो पूल वाहतुकीस कसा सुरु करता येईल याची लवकरच कार्यवाही केली जाईल.
>
> - राहुल शेळके, उपअभियंता, अलिबाग

बांधलेल्या पुलाचा अद्यापपर्यंत वापर करण्यात आला नाही. जुन्या पुलावरून वाहनांची वर्दळ होत आहे. त्यावेळी बांधण्यात आलेल्या पुलाचे योग्य नियोजन नसल्याने तो पूल वाहतुकीस मोकळा करण्यात आला नाही. आता नवीन पुलाला झुडपांनी विळखा घातला आहे. ठिकठिकाणी गवत वाढले आहे. लाखो रुपये खर्च करून तयार करण्यात आलेला पूल बेवारसस्थितीत आहे. त्याचा वापर होत नसल्याने केलेला खर्च पाण्यात जात आहे. तपासणी करून हा पूल वाहतुकीसाठी खुला करण्यात यावा, अशी मागणी होत आहे.

# लोगो, स्टीकर लावणे पडणार महागात

## रायगडच्या जिल्हा वाहतूक शाखेची कारवाई सुरु

| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |

शासनाची मान्यता नसताना बेकायदेशीररित्या काहीजण गाडीला लोगो बसवणे, पोलीस, प्रेस, ॲडव्होकेट स्टीकर लावण्याचे काम करतात. आता लोगो, स्टीकर लावणे महागात पडणार आहे. रायगडच्या जिल्हा वाहतूक शाखेने याविरोधात कारवाई सुरु केली आहे. आतापर्यंत ६६ चालकांविरोधात कारवाई करीत ३५ हजार रुपयांचा दंड वसूल केला असल्याची माहिती समोर आली आहे. या कारवाईने स्टीकर, लोगो लावणाऱ्यांना दणका मिळाला आहे.

दुचाकीसह तीन चाकी, चारचाकी व अन्य वाहनांवर स्टीकर, लोगो लावणे चुकीचे आहे. तरीदेखील काही मंडळी वाहनांवर स्टीकर, लोगो लावतात. हा गैरप्रकार टाळण्यासाठी वाहतूक पोलिसांनी कडक पावले उचलली आहेत. पोलीस, पत्रकार, प्रेस, महाराष्ट्र शासन आदी लोगो लावणाऱ्यांबरोबरच गाडीला आकर्षक चित्र लावणाऱ्यांविरोधात कारवाईची मोहीम हाती घेतली आहे.

पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक अभिजीत भुजबळ यांनी ही कारवाई सुरु केली आहे. जिल्ह्यात ९० हून अधिक वाहतूक पोलीस तैनात असून, गाडीवर बेकायदेशीर स्टीकर, लोगो दिसल्यास त्यांच्या माध्यमातून कारवाई सुरु केली आहे. आतापर्यंत ६६ चालकांविरोधात कारवाई करण्यात आली आहे. त्यामध्ये पोलीस, प्रेस, ॲडव्होकेट यांचा समावेश आहे. उपप्रादेशिक परिवहन विभागाकडून मान्यता नसतादेखील गाडीवर स्टीकर, लोगो लावणाऱ्यांना दणका देण्यात आला आहे. या मोहिमेतून वाहन चालकांसह मालकांना शिस्त लागण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

# घरकुलाचे आमिष दाखवत महिलेचे दागिने लुटले

| तळा | प्रतिनिधी |

तालुक्यातील बारपे येथे घरकुल मंजूर करून देतो असे सांगून महिलेचे दागिने घेऊन पसार झालेल्या आरोपीला तळा पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत.

याबाबत सविस्तर वृत्त असे की, तळा तालुक्यातील मौजे बारपे येथे फिर्यादी उर्मिला नाडकर यांच्या घरी घरकुल मंजूर करून देतो, अशी बतावणी करून एका इसमाने त्यांच्याकडील सोन्याचे मंगळसूत्र व कानातील कुड्या गोड बोलून काढून घेतल्या व तुमचे घरकुल मंजूर झाले की, तुमचे दागिने परत देतो असे सांगून आपला मोबाईल क्रमांक देऊन निघून गेला. त्यानंतर उर्मिला नाडकर यांनी सदर मोबाईलवर संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता तो क्रमांक वारंवार बंद असल्याचे त्यांना समजताच आपली फसवणूक झाली असल्याचे त्यांच्या लक्षात आले. त्यांनी या घटनेची माहिती गावचे पोलीस कांतीलाल कसबले यांच्या माध्यमातून तळा पोलीस ठाणे येथे दिली असता तळा पोलिसांनी युद्धपातळीवर सापळा रचून सदर आरोपीला ताब्यात घेऊन त्याच्याकडील दागिने फिर्यादी यांना परत केले. आरोपीवर तळा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला. पोलिसांनी बजावलेल्या या कामगिरीबद्दल बारपे ग्रामस्थ व पोलीस पाटील कांतीलाल कसबले यांनी आभार व्यक्त केले. याप्रसंगी सपोनि सतीश गवई, उप पो. निरीक्षक विजय पाटील, अंमलदार विकास खैरनार यांसह तळा पोलीस कर्मचारी उपस्थित होते.

# सुधागड तालुक्यात प्राचीन बौद्ध मूर्तीचा शोध

## तिवरे गावाजवळ आढळले तथागत गौतम बुद्धांचे अवशेष

| पाली/वाघोशी | प्रतिनिधी |

रायगड जिल्ह्यातील इतिहास संपन्न सुधागड तालुक्यात पुन्हा एकदा प्राचीन वारसाचे दर्शन घडले आहे. तिवरे गावाजवळील बंद पडलेल्या अल्ट्रा कंपनीच्या परिसरात तथागत गौतम बुद्ध यांच्या प्राचीन मूर्तीचे तसेच अन्य काही शिल्पांचे अवशेष आढळून आले आहेत. या अनपेक्षित शोधाने संपूर्ण परिसरात मोठी खळबळ उडाली असून, बौद्ध समाजातही उत्सुकतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

ही घटना ३१ ऑक्टोबर रोजी रात्री घडली. एका स्थानिक इन्स्टाग्राम यूजरने या मूर्तीचे छायाचित्र व व्हिडिओ सोशल मीडियावर पोस्ट केल्याने हा प्रकार प्रकाशात आला. काही तासांतच ही पोस्ट व्हायरल



झाली आणि परिसरातील बौद्ध अनुयायांसह नागरिकांची मोठी गर्दी अल्ट्रा कंपनीच्या परिसरात जमा झाली.

घटनास्थळी एक प्राचीन धम्मचक्रसदृश चाक (जाता) आणि बुद्ध मूर्तीचे अवशेष स्पष्ट दिसत होते. या दगडी मूर्तींवरील कोरीव काम व मूर्तीची मुद्रा पाहता ती बौद्ध कालखंडातील असल्याचा अंदाज वर्तविण्यात येत आहे.

घटनास्थळी आलेल्या बौद्ध अनुयायांनी पंचशील ध्वज रोवून त्या जागेचा सन्मान राखला. त्यांनी परिसर सुरक्षित ठेवण्यासाठी प्रयत्न सुरू केले असून, या ठिकाणी कोणत्याही प्रकारे विडंबन होऊ नये आणि या अवशेषांचे रक्षण व्हावे, अशी सामूहिक भावना त्यांनी व्यक्त केली. दरम्यान, गर्दी वाढत असल्याने पाली पोलीस ठाण्याच्या निरीक्षक हेमलता शेरेकर यांनी स्वतः घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. त्यांनी तहसीलदार कार्यालय व पुरातत्त्व विभागाला याबाबत माहिती दिली. सदर मूर्ती त्या ठिकाणी कशी आली, ती कुठल्या कालखंडातील आहे, तसेच आणखी काही शिल्प अथवा वास्तू अवशेष त्या परिसरात आहेत का, याबाबतचा तपास पुरातत्त्व विभागाकडून करण्यात येणार आहे.

संबंधित अधिकाऱ्यांकडून प्राथमिक तपासानंतरच मूर्तीची खरी ओळख आणि ऐतिहासिक पार्श्वभूमी स्पष्ट होणार आहे. सुधागड तालुका हा इतिहास, संस्कृती व वारसा यांचा संगम म्हणून ओळखला जातो. अशा पार्श्वभूमीवर तिवरे परिसरातील हा शोध हा केवळ धार्मिकच नव्हे तर, सांस्कृतिकदृष्ट्याही अत्यंत महत्त्वाचा ठरणार आहे.

# भातशेतीवर रानडुकरांची वक्रदृष्टी

## शेतकऱ्यांच्या नुकसानीकडे वनविभागाचे दुर्लक्ष

| चिरनेर | प्रतिनिधी |

उरण तालुक्यात गेल्या काही दिवसांपासून परतीच्या अवेळी पावसाने धुमाकूळ घातला असून, संकटात सापडलेल्या तालुक्यातील चिरनेर, कळंबुसरे, दिघाटी, साई, खारपाडा तसेच अन्य विभागातील भात खाचरातील भात पिकांकडे आता रानडुकरांची वक्रदृष्टी वळली असल्याने भातशेतीचे मोठे नुकसान होऊ लागले आहे.

भातशेती कापणीला आली असताना रानडुकरांचा हैदोस सुरू झाला असल्याने शेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. त्यातच शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी



आलेला घास कळपाने पिकांवर हल्ला करणारी रानडुकरे हिरावून नेत असल्याने रानडुकरांचा वनविभागाने बंदोबस्त करावा, अशी मागणी उरण परीसरातील शेतकरीवर्गातून होत आहे. पिकलेल्या भातशेतीची नासाडी करण्यासाठी येणाऱ्या रानडुकरांना पळवून लावण्यासाठी शेतकऱ्यांना रात्रभर शेतीची राखण करावी लागत आहे. यंदा सुरुवातीला, म्हणजे लावणीसाठी पाऊस उत्तम झाला. मात्र, त्यानंतर भातपिके पोटरीला आल्यावर व कापणीस तयार झाल्यानंतर अवेळी पावसाने रंग दाखवायला सुरुवात केली. त्यामुळे येथील शेतकऱ्यांवर गंडांतर आले आहे. ऐन कापणीच्या हंगामातच परतीच्या पावसाने हैदोस घातल्याने शेतकऱ्यांच्या तोंडचे पाणी पळाले आहे. पावसाचा लहरीपणा कायम राहिल्याने शेतकऱ्यांची शेती पूर्णपणे धोक्यात आली आहे.

एकंदरीत, पावसापासून शेती वाचविण्यासाठी शेतकऱ्यांना तारेवरची कसरत करावी लागत आहे. अशा ओढवलेल्या गंभीर संकटामुळे शेतकरी हवालदिल झाला आहे. अशा अवस्थेत जंगललगतच्या भातशेतीमधून डुकरांचा उपद्रव वाढलेला दिसून येत असून, डुकरांनी नासाडी केल्याचे दृश्य तालुक्यात सार्वत्रिकपणे पाहण्यास मिळत आहे. मात्र, वनविभागाकडून कोणतीही कार्यवाही करण्यात येत नसल्याने नाराजी व्यक्त करण्यात येत आहे.



# आगामी निवडणुकीसाठी काँग्रेस सज्ज : महेंद्र घरत

| चिरनेर | प्रतिनिधी |

रायगड जिल्ह्यातील काँग्रेस पुन्हा एकदा संघटनशक्ती उभारण्याच्या प्रयत्नात आहे. गेल्या काही वर्षांत पक्षाला आलेल्या मरगळीनंतर आता जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत यांच्या नेतृत्वाखाली पक्षात नवचैतन्य दिसून येत आहे. पनवेल येथील काँग्रेस भवन येथे शुक्रवारी झालेल्या बैठकीने या पुनरुज्जीवनाची ठोस चाहूल दिली आहे. या बैठकीत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी काँग्रेस सज्ज असल्याचे चित्र दिसले.

या बैठकीला ज्येष्ठ नेते आर.सी. घरत, अनंत पाटील, सुदाम पाटील, हरेश केणी, वसंत काठावले, नंदराज मुंगाजी, ॲड. श्रुती म्हात्रे, शंभो म्हात्रे यांच्यासह अनुभवी कार्यकर्ते उपस्थित होते. त्यांच्या उपस्थितीने पक्षातील सुसंवाद आणि एकजुटीचा संदेश दिला गेला.

पनवेलमधील बैठकीत जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीसाठी इच्छुक उमेदवारांनी मते मांडली. महेंद्र घरत यांनी यावेळी ठामपणे सांगितले की, काँग्रेस भाजपला टक्कर देण्यास सज्ज आहे; पक्षाचे वर्चस्व पुन्हा सिद्ध करून दाखवू. यावेळी ज्येष्ठ नेते आर. सी. घरत यांनी जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत यांच्या कार्यशैलीचे कौतुक करत कार्यकर्त्यांना एकजूट राखण्याचे आवाहन केले. सुदाम पाटील यांनीही वास्तववादी संदेश देत सांगितले की, हेवेदावे टाळा आणि गावागावांत सक्रिय व्हा.

स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुका या प्रत्येक पक्षासाठी तळागाळातील बळ मोजण्याची खरी परीक्षा असते आणि या परीक्षेसाठी नव्या जोमाने, नव्या नेतृत्वाच्या आत्मविश्वासाने काँग्रेस सज्ज होताना दिसत आहे. या बैठकीला काँग्रेसचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी विविध विषयांवर चर्चा करण्यात आली.

# महानगरपालिका दक्षता जनजागृती सप्ताह

| पनवेल | प्रतिनिधी |

केंद्रीय दक्षता आयोग, तसेच राज्य शासनाच्या सूचनेनुसार दक्षता जनजागृती सप्ताह साजरा केला जात आहे. या अंतर्गत महानगरपालिका आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात लाचलुचपत प्रतिबंधक विभाग ठाणे परिक्षेत्राचे पोलीस अधीक्षक शिवराज पाटील यांच्या मार्गदर्शनपर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी शिवराज पाटील म्हणाले, कोणत्याही प्रलोभनांना न भुलून जाता शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांनी समाधानाने, प्रामाणिकपणे व सचोटीने काम करावे. तसेच अधिकारी, कर्मचारी व नागरिकांमध्ये भ्रष्टाचाराबाबत जनजागृतीची आवश्यकता स्पष्ट करताना त्यांनी भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्याची माहिती सांगितली. यावेळी आपल्या प्रास्ताविकामध्ये आयुक्त मंगेश चितळे यांनी शासकीय सेवेत काम करताना अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सर्व नियमांचे पालन करत काम सचोटीने, निःस्पृह काम करायला हवे, असे प्रतिपादन केले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपायुक्त स्वरूप खारगे यांनी केले तसेच उपस्थितांचे आभार परिवहन व्यवस्थापक कैलास गावडे यांनी मानले. यावेळी मुख्य लेखाधिकारी मंगेश गावडे, मुख्य लेखा परीक्षक निलेश नलावडे आदी उपस्थित होते.

# सायबर सुरक्षेबाबत पोलिसांची जनजागृती



| पनवेल | प्रतिनिधी |

पनवेल तालुका पोलीस ठाणे हद्दीतील बालाजी रेसिडेन्सी, हेदुटणे तालुका पनवेल येथील रहिवासी व परिसरातील रहिवाशांची सायबर सुरक्षा/जनजागृतीसंदर्भात नुकतीच बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेही सायबर सुरक्षेच्या दृष्टिकोनातून सायबर गुन्हेगारी व सायबर सुरक्षाबाबतचे मानवी साखळीद्वारे जनजागृती करून प्रशिक्षण देण्यात आले.

यामध्ये मोबाईल, इंटरनेट, ऑनलाइन शॉपिंग, फेक लिंक, इंस्टाग्राम फेसबुक फ्रॉड, मालवेअर, फोन पे, गुगल पे फ्रॉड, ऑनलाइन ट्रेडिंग फ्रॉड, डिजिटल अरेस्ट फ्रॉड, एनसीसीआरपी पोर्टल व हेल्पलाइन क्रमांक १९३० बाबत माहिती देण्यात आली. तसेच नवी मुंबईच्या व्हॉट्सॲप व इंस्टाग्राम पेजची माहिती देण्यात आली. यावेळी उपस्थित नागरिकांनी पोलिसांना विविध प्रश्न विचारले. त्या प्रश्नांची समर्पक अशी उत्तरे पोलिसांकडून देण्यात आली. त्या उत्तराने नागरिकांनी समाधान व्यक्त करुन पोलिसांचे आभार मानले.

## चौथी, सातवी आणि दहावी परीक्षेत नापास | आदिवासी तरुणाच्या मेहनतीला यश

# एमपीएससी परीक्षेत नयनचे यश

| नेरळ | संतोष पेरणे |

कर्जत तालुक्यातील ऐनाची वाडीसारख्या अल्पशिक्षित आदिवासी वाडीमधील तरुणाने महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत राज्यात १५ वा क्रमांक मिळविला आहे. दरम्यान, दहावीच्या परीक्षेत नापास झालेला नयन वाघ या विद्यार्थ्याने उंच भरारी घेतली आहे. २०२० मध्ये राज्य लोकसेवा आयोगाची परीक्षा उत्तीर्ण झालेल्या नयन वाघ याचा मैदानी प्रशिक्षण घेताना अपघात झाला आणि त्याला पोलीस उपनिरीक्षक होता आले नव्हते.

नांदगाव ग्रामपंचायतीमधील ऐनाची वाडी येथील विठ्ठल वाघ या आदिवासी शेतकऱ्याचा मुलगा झुगरेवाडी येथील जिल्हा परिषद शाळेत चौथीपर्यंत शिकला. नंतर विठ्ठल वाघ यांची आर्थिक परिस्थिती बेताची असल्याने नयनला मुरबाड तालुक्यातील कान्होळ येथील शासकीय आदिवासी आश्रमशाळेत पाठवले. नयन वाघ दहावी परीक्षा उत्तीर्ण होऊ शकला नाही. मग १७ नंबर फॉर्म भरून त्याने परीक्षा दिली आणि तब्बल ९० टक्के गुण मिळवून परीक्षेत पास झाला. या काळात चौथीमध्ये तिसऱ्या प्रयत्नात पास झाला, तर सातवी आणि दहावीमध्येदेखील



हा विद्यार्थी नापास झाला होता. त्यानंतर पोलीस भरतीची तयारी सुरू केली आणि तीन-चार प्रयत्नांतही नयन सिलेक्ट होऊ शकला नाही. मात्र, जिद्द कायम ठेवत तो २०१९ पासून एमपीएससीकडे वळला.

२०२२ मध्ये नयन पोलीस उपनिरीक्षकपदाची परीक्षा उत्तीर्ण झाला. त्यावेळी मैदानी प्रशिक्षण घेत असताना नयनला मैदानात अपघात झाला आणि तेव्हापासून पोलीस उपनिरीक्षक होण्याचे आपण अर्धवट राहिले. मात्र, आपल्याला अधिकारी व्हायचे आहे या उद्देशाने नयनने पुन्हा जोरदार तयारी केली आणि २०२४ च्या राज्य लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत कमाल केली. अनुसूचित जमाती प्रवर्गात नयन राज्यात १५व्या क्रमांकावर राहिला आहे.

दरम्यान, जनरल मेरीटमध्ये १५ वा क्रमांक मिळवत त्याने यशाला गवसणी घातली आहे. सध्या स्पर्धा परीक्षा अतिशय कठीण झाली आहे. कारण, त्याचा अभ्यासक्रम बदलला असून केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या धर्तीवर अभ्यासक्रम तयार करण्यात आला आहे. झुगरे वाडी शाळेचे माजी विद्यार्थी असून काही काळ झाडपोली येथे जिजाऊ शिक्षण संस्थेच्या माध्यमातून स्पर्धा परीक्षा तयारी करून ऐनाचीवाडी झुगरे वाडी सह संपूर्ण रायगड जिल्ह्याला अभिमान वाटावा अशी कामगिरी नयन वाघ यांनी केली असून त्यांच्या या यशामुळे त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन करण्यात येत आहे.

# निवडक



## रस्त्यांच्या कामांकडे सपशेल दुर्लक्ष

**कोर्लई :** मुरुड येथील परेशनाका-मच्छिमार्केट ते खोकरी रस्त्याचे काम लेखी आश्वासन देऊनही मुदतीत न करण्यात आल्याने याविरोधात आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या होणाऱ्या निवडणुकांवर बहिष्कार टाकण्याचा व स्थगित केलेले उपोषण पुन्हा सुरु करणार असल्याचा इशारा पद्मदुर्ग व्यावसायिक कल्याणकारी मंडळाचे अध्यक्ष अरविंद गायकर यांनी दिला असून, त्यांनी आपल्या सहकाऱ्यांसमवेत सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता यांना याबाबतचे निवेदन दिले आहे. निवेदनात म्हटले आहे की, मुरुड तहसील कार्यालय परेश हॉटेल-मच्छिमार्केट ते खोकरी या खराब झालेल्या रस्त्याबाबत दि.१७ फेब्रुवारी रोजी आपणास लेखी स्वरुपात कळवून मुरूड तहसील कार्यालयासमोर आमरण उपोषणास बसलो असता,त्यादिवशी आपणाकडून १५ दिवसांची व दि. १८ फेब्रुवारी २०२५ रोजी कार्यकारी अभियंता अलिबाग सा.बां. विभाग यांच्या कार्यालयाकडून या रस्त्याचे काम एक महिन्यात सुरू करण्याचे प्रयत्न करण्याचे लेखी आश्वासन दिल्याने उपोषण तात्पुरते स्थगित करण्यात आले होते. दरम्यान, दिलेल्या आश्वासनाप्रमाणे दि.२० मार्च ते दि. ०१ एप्रिलपर्यंत सदर रस्त्याचे काम न केल्याने संबंधित अधिकारी कोणत्याही प्रकाची कारवाई न करता ठेकेदाराला पाठीशी घालून स्थानिक जनतेची दिशाभूल करत असल्याचे दिसून येत आहे.०तरी या रस्त्याचे काम दि.१२ नोव्हेंबरपर्यंत ठेकेदार व सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकरी यांनी जातीने लक्ष घालून पूर्ण न केल्यास आगामी नगरपरिषद, जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकांवर बहिष्कार टाकण्याचा इशारा देण्यात आला आहे.

## कामोठेलगत बस ट्रॅव्हल्सचा थांबा

**पनवेल :** पनवेलजवळील शीव-पनवेल महामार्गावरील कळंबोली सर्कल (मॅकडॉनल्ड हॉटेलसमोर) येथे उभ्या राहणाऱ्या खासगी आणि राज्य परिवहन महामंडळाच्या बसमुळे निर्माण होणाऱ्या वाहन कोंडीने हैराण प्रवाशांना आता दिलासा मिळणार आहे. मॅकडॉनल्डसमोरील खासगी बस थांबा कामोठे उड्डाण पुलाजवळ के. एल.ई. महाविद्यालयासमोर स्थलांतरित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.




दोन महिन्यांच्या बैठक सत्रांनंतर हा निर्णय घेण्यात आला असून, १ नोव्हेंबरपासून नवीन बसथांबा कार्यान्वित होणार आहे. नवी मुंबई वाहतूक विभागाचे पोलीस उपायुक्त तिरुपती काकडे, सहाय्यक पोलीस आयुक्त विजय चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक अजय भोसले यांनी हा निर्णय घेतला आहे. नवीन बसथांब्याची शिस्त राखण्यासाठी वाहतूक विभाग दोन स्वयंसेवक नेमणार आहेत. मुंबई बस मालक संघटनेलाही यासंबंधी सूचना दिल्या आहेत. बस चालकांनी नवीन ठिकाणीच थांबणे, हॉर्नचा गैरवापर न करणे आणि प्रवासी घेतल्यानंतर तात्काळ पुढे निघणे या अटींचे पालन करावे, असे स्पष्ट करण्यात आले आहे. कळंबोली कॉलनीजवळ पुन्हा बस थांबविल्यास कारवाई केली जाईल, असा इशाराही पोलिसांनी दिला आहे.



## तुळशी विवाहाच्या तयारीची लगबग

**पनवेल :** कार्तिकी एकादशी यंदा रविवार, दि. २ नोव्हेंबर रोजी आली आहे. कार्तिकी एकादशीपासून तुळशी विवाहाला सुरुवात होते. दरम्यान, तुळशी विवाहासाठी लागणारे साहित्य खरेदी करण्यासाठी बाजारात मोठ्या प्रमाणात ग्राहकांची गर्दी झाल्याचे पाहायला मिळाले. पनवेलच्या जुन्या बाजार परिसरात सणासुदीची लगबग पाहायला मिळाली. तुळशी विवाहासाठी लागणारे पूजासाहित्य ऊस, आवळा, बोर, आंब्याची पाने आणि सजावटीच्या वस्तू मोठ्या प्रमाणावर बाजारात आल्या आहेत. महिलावर्ग या साहित्याची खरेदी करण्यासाठी मोठ्या उत्साहाने गर्दी करत आहेत.

पाहिजेत PILOT

गेली सात दशके औद्योगिक जगतामधील अग्रगण्य - पायलट ग्रुप, यांची इंजीनियरिंग, इंडस्ट्रियल तसेच ऑफिस ऑटोमेशन उत्पादने देशात आणि देशाबाहेर देखील प्रसिद्ध आहेत. त्यांच्या खालापूर येथील प्लॅन्टसाठी खालील पदे भरणे आहे.

- टर्नर - 2 जागा, फिटर - 3 जागा - ITI प्रशिक्षित
- मशीन ऑपरेटर - 8 जागा - अर्ध कुशल व्यक्ती अपेक्षित
- तपासणी आणि गुणवत्ता साठी - 2 जागा - डिप्लोमा होल्डर
- असेंब्ली अँड टेस्टिंग साठी - 2 जागा - डिप्लोमा होल्डर
- हेल्पर - 5 जागा

त्वरित संपर्क साधा: **माणिक मशीनरी मैन्युफैक्चरर प्रा लि**
126 -1+2 खोपोली पेण रोड, होराळे गाव, तालुका: खालापूर, रायगड, महाराष्ट्र • ईमेल: admin@pilotindia.com +91 98208 44921

वॉक इन इंटरव्यू दि. 05 / 11 / 2025 रोजी दुपारी 12 ते संध्याकाळी 4 पर्यंत

multiprintindia.com

## निवडक



### संतप्त शेतकऱ्यांची कृषी अधिकारी कार्यालयावर धडक

**नेरळ** : कर्जत तालुक्यात भाताच्या पिकाचे झालेले नुकसान लक्षात घेऊन शेतकरी मदतीच्या प्रतीक्षेत आहे. मात्र शासनाकडून कोणत्याही प्रकारची मदत मिळत नसल्याने शेतीमधील पीक पाण्याखाली असल्याने संकटात असलेल्या शेतकऱ्यांनी कर्जत तालुका कृषी अधिकारी कार्यालयावर धडक दिली. तालुक्यातील भाताच्या शेतीचे मोठे नुकसान झाले आहे,त्यावेळी भाताच्या नुकसानी बद्दल शासनाने केवळ पंचनामे करण्याचे काम केले आहे. मात्र त्यावर शासनाने कार्यवाही केलेली नाही त्यामुळे नुकसान भरपाई मिळावी म्हणून शेतकरी संघटनेने कर्जत तहसील कार्यालयात जाऊन निवेदन दिले होते. त्यावेळी सरसकट पंचनामे करण्याचे आदेश दिले जात असून शेतकऱ्यांच्या शेत पिकाच्या नुकसानीचे पंचनामे गेली दहा दिवसांपासून सुरू आहेत. त्या शेतकऱ्यांच्या खात्यात मदत वाटप होण्यास सुरुवात होणार असल्याची माहिती तहसीलदार डॉ धनजंय जाधव यांनी दिली. मात्र त्यानंतर दोन दिवसांनी कर्जत तालुक्यातील शेतकरी कर्जत तालुका कृषी अधिकारी कार्यालयावर धडकले.




### आंबा बागायतदारांना प्रशिक्षण

**खारेपाट** : अलिबाग तालुक्यातील नारंगी येथे दत्त मंदिर परिसरात आत्मा अंतर्गत किसान गप्पागोष्टी कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमात आंबा उत्पादक शेतकऱ्यांना आंबा मोहर व्यवस्थापन व अल्ट्राहायडेन्सिटी प्लांटिंग्स या विषयावर सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. या कार्यक्रमास भगवान कापसे, जीवन आरेकर हे मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते. त्यांनी शेतकऱ्यांना आंबा उत्पादनातील आधुनिक तंत्रज्ञान, झाडांची योग्य छाटणी, खत व्यवस्थापन व रोग नियंत्रण या बाबींवर मार्गदर्शन केले. कार्यक्रमास सुहास आजगावकर, अधिकारी, सतीश बोराडे, प्रवीण ठिगळे, पवनकुमार नजन, तन्मय अरविंद भगत, उदय म्हात्रे, डॉ. जगन्नाथ पाटील, यांची उपस्थिती लाभली. कार्यक्रमात स्वाती नायगावकर यांनी ड्रोनद्वारे फवारणीचे प्रात्यक्षिक दाखवून शेतकऱ्यांना नव्या तंत्रज्ञानाची ओळख करून दिली. कार्यक्रमाचे आयोजन उत्कृष्टपणे पार पडले असून उपस्थित शेतकऱ्यांनी मार्गदर्शनाचा लाभ घेतला व कार्यक्रमाबद्दल समाधान व्यक्त केले. सहाय्यक कृषी अधिकारी जी. बी. पाटील, विजय कांबळे, सर्जेराव बागाव, मोहन सुर्यवंशी यांचे कार्यक्रम यशस्वी करण्यास सहकार्य लाभले.



### प्रतापगडावर दीपोत्सवाचे आयोजन

**पोलादपूर** : रायगड आणि सातारा जिल्ह्यांच्या सीमेवरील शिवप्रतापासाठी ऐतिहासिक प्रतापगड येथील श्रीभवानीमातेच्या त्रिपुरारी पौर्णिमेनिमित्त येत्या कार्तिकी पौर्णिमेला (दि.५) नोव्हेंबर रोजी दीपोत्सव श्रीमंत छत्रपती कल्पनाराजे भोसले, छत्रपती उदयनराजे भोसले आणि श्रीमंत छत्रपती राणीसाहेब दमयंतीराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली होणार असल्याने शिवभक्त व भाविकांना उपस्थित राहण्यासाठी प्रतापगडावरून सांगावा धाडण्यात आला आहे. श्रीभवानी देवी संस्थान किल्ले प्रतापगड आणि सेवेकरी ग्रामस्थ मंडळ किल्ले प्रतापगड यांच्यातर्फे दरवर्षीप्रमाणे श्रीमंत छत्रपती कल्पनाराजे भोसले, छत्रपती उदयनराजे भोसले आणि श्रीमंत छत्रपती राणीसाहेब दमयंतीराजे भोसले यांच्या वंशपरंपरेने मार्गदर्शनाखाली करण्यात येणाऱ्या त्रिपुरारी पौर्णिमा आणि दीपोत्सवाचे आयोजन बुधवार, दि. ५ नोव्हेंबर २०२५ रोजी सायंकाळी ७ वाजता करण्यात आले आहे. दरवर्षी प्रतापगड येथे सातारा, रत्नागिरी, कोल्हापूर आणि रायगड जिल्ह्यातील शिवभक्त आणि आई भवानीदेवी भक्तांची विविध उपक्रमांना आवर्जून उपस्थिती असते. या उपक्रमांमध्ये अश्विन नवरात्रौत्सवाला हजारो देवीभक्त गडावर उपस्थित असतात तर शिवप्रतापदिन आणि अन्य कार्यक्रमांनाही शिवभक्तांची प्रचंड गर्दी लाभत असते.

# समस्यांकडे नगरपरिषदेचे दुर्लक्ष

## ● अमर वार्डे यांनी वेधले प्रशासकाचे लक्ष ● नागरिकांना सोयीसुविधा पुरवण्याची मागणी

**। रायगड । प्रतिनिधी ।**

नगर परिषद निवडणूक उंबरठ्यावर येऊन ठेपली असताना शहरातील नागरी समस्यांकडे नगरपरिषदेचे झालेले दुर्लक्ष यावर माजी नगरसेवक अमर वार्डे यांनी लक्ष वेधले आहे. पर्यटनासाठी जगाच्या नकाशावर आलेल्या अलिबागनगरीमध्ये वाढणारी अस्वच्छता आणि पर्यावरणाचा होणारा ऱ्हास याकडे प्रशासक असणाऱ्या मुख्याधिकाऱ्यांचे दुर्लक्ष म्हणजे प्रशासकीय यंत्रणा डोळेझाक करीत असल्याचा आरोप अमर वार्डे यांनी केला आहे. शहरात असलेल्या नागरी समस्यांबाबत दीड वर्षांपूर्वी निवेदन देऊनही अद्याप त्या नागरी समस्या कायम राहिल्या आहेत असे अमर वार्डे यांनी दिलेल्या स्मरणपत्रात अधोरेखित केले आहे.



चेंढरे परिसरात असणारा कचरा किमान १० दिवस तरी उचलला जात नाही. त्याकरिता वारंवार नगरपरिषदेकडे संपर्क साधावा लागतो. आजही कचऱ्याचा ढीग आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्याच्या परिसरात, सतीश इंजिनिअरिंग समोरील रस्त्यावर साठणारे पाणी जाण्यासाठी नगरपरिषद कायमचा मार्ग किंवा उपाय शोधू शकली नाही.

परिणामी चार महिने घाणेरड्या पाण्याने साठलेल्या पाण्यामुळे येणाऱ्या जाणाऱ्या नागरिकांना रस्त्याच्या मधोमध चालावे लागते. वाहतुकीवर त्यांचा परिणाम होतो आहे.

अशोका शॉपिंग सेंटर या इमारतीच्या आवारात आणि बाहेर साठलेला कचरा याकडे ना संबंधित गृहनिर्माण सोसायटी लक्ष देत ना नगरपालिका लक्ष देत आहे. शहरातील डासांचे प्रमाण लक्षात घेता अशी स्वच्छता मोठ्या प्रमाणावर हाती घेणे गरजेचे आहे. असे अमर वार्डे यांनी निवेदनात म्हटले आहे. अलिबाग नगरपरिषदेत स्वच्छता निरीक्षक हे पद नसावे असे वाटते.

जिल्ह्याच्या विकासासाठी कटीबद्ध असलेल टाऊन प्लॅनिंग कार्यालय, कार्यालयाच्या शेजारीच कंपाऊंड वॉल आणि इमारत यांच्यामध्ये कचरा जाळते. खरेतर नगरपरिषदेने हे कार्यालय तेथुन काढून टाकणे गरजेचे आहे. व सदर एतिहासिक इमारत सुस्थितीत ठेवणे गरजेचे आहे. प्रचंड आर्थिक उलाढाल असलेल्या या इमारतीचा वापर करणाऱ्या नियोजन काराना पंतप्रधानांच्या स्वछ भारत अभियानाची माहिती नसावी असे वारंवार आढळून येत असल्याचे अमर वार्डे यांनी निवेदनात म्हटले आहे.

> “अलिबाग नगरपरिषदेच्या अलिबाग रेवदंडा रस्त्याकडची हद्द येथून नगरपरिषदेच्या कार्यालया पर्यंतच्या रस्त्याच्या पश्चिमेकडील भागात मोठ्या प्रमाणावर कांदळवन आहे त्या रस्त्यावर सरसकट कांदळवनावर कचरा टाकलेला आहे. कांदळवनाचा नाश करणे गुन्हा आहे.
> –अमर वार्डे”

## मुद्रे खुर्दच्या स्मशानभूमीचे लोकार्पण

**। कर्जत । प्रतिनिधी ।**

कर्जत नगरपरिषद हद्दीतील मुद्रे खुर्द गावातील स्मशानभूमीचे लोकार्पण करण्यात आले. सुमारे एक एकर जागेमध्ये ही स्मशानभूमी बांधण्यात आली आहे.

काही वर्षांपूर्वी मुद्रे खुर्द गावातील सुमारे अडीच एकर जागेवर हिंदू स्मशान भूमी तसेच लिंगायत वाणी समाजासाठी दफनभूमी आणि बोहरा समाजासाठी दफनभूमी करण्याचे ठरले होते.

त्यापैकी तीस गुंठे जागा लिंगायत वाणी समाजाच्या दफन भूमीसाठी, तीस गुंठे जागा बोहरा समाजाच्या दफन भूमीसाठी व उर्वरित एक एकर जागा मुद्रे खुर्द परिसरातील हिंदू स्मशानभूमीसाठी देण्यात आली होती. या जागांना कुंपण करण्यात आले होते. मात्र स्मशानभूमी बांधण्यात आली नव्हती.

सदर स्मशानभूमीचे आ. महेंद्र थोरवे यांच्या हस्ते लोकार्पण करण्यात आले. याप्रसंगी संतोष भोईर, भाई गायकर, संकेत भासे, कृष्णा घाडगे, अरुणा वायकर, अभिषेक सुर्वे, दिनेश कडू, उदय शिंदे, अशोक मोरे, प्रदीप वायकर, किशोर कदम, ज्ञानेश्वर करणूक, जयदीप शिंदे, अनिल मोरे, संतोष थोरवे, भारती शिंदे आदी उपस्थित होते.

## बोंबल्या विठोबा यात्रेवर पावसाची सावट

**। खोपोली । प्रतिनिधी ।**

धाकटी पंढरीतील बोंबल्या विठोबाची यात्रा एक दिवसांवर येईल ठेपली असताना मुसळधार पाऊस पडत असल्याने यात्रेत अजून दुकाने, आकाश पाळणे बांधण्याचा काम सुरू नाही. पावसामुळे यात्रेतील जनजीवन विस्कळीत होईल या चिंतेने व्यापारी असल्याने पाऊस कायम राहिल्यास मोठा आर्थिक फटका बसणार असल्याची चिंता व्यक्त होत आहे.



कार्तिकी एकादशीला येथे मोठी यात्रा भरते. कोकणातील प्रसिद्ध पंधरा दिवस चालणारी यात्रा १५ दिवस यात्रा भरते. सुखी मासळी, जिलेबी, हॉटेल, भेळपुरी, चायनिज अशी याची दुकाने असल्याने कोटीची उलाढाल होत असते तर पंधरा दिवस महाराष्ट्रातून अनेक लोक येत असतात.

ऐन दिवाळी आणि पर्यटन हंगामाच्या तोंडावर पावसाने लावलेल्या हजेरीमुळे लावल्यामुळे सर्वत्र चिखलाचे साम्राज्य पसरल्याने जनजीवन विस्कळीत झाले आहे. दोन दिवसांवर यात्रा असतानाही दुकानाचे गाळे बांधू शकले नाहीत. आकाश पाळण्यासह मनोरंजनाची खेळ चालू होतील की नाही अशी चिंता व्यक्त होत असून आर्थिक फटका बसण्याची भीतीही व्यापारी व्यक्त करीत आहे.

### आर्थिक फटका बसणार, व्यापारी चिंतेत

**प्रशासन चोख व्यवस्था**

**धाकटी पंढरीची यात्रा दोन दिवसांवर असताना अवकाळी पाऊस पडत असला तरी व्यापाऱ्यांनी चिंतेत न राहता व्यापाऱ्यांनी दुकाने सुरू करावी. पावसाची जबरदारी घेवून नगरपालिका प्रशासन चोख व्यवस्था करतील. श्री विठोबा देवस्थान कमिटीही व्यापाऱ्यांना सहकार्य करेल आणि १५ दिवसांची यात्रा मोठ्या उत्साहात होईल.**

## माजी मंत्र्यांचा ई रिक्षातून प्रवास

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

माथेरान या पर्यटन स्थळी सध्या पर्यटकांची मांदियाळी दिसून येत आहे. राज्याचे माजी आरोग्य मंत्री डॉ. दीपक सावंत सध्या माथेरानमध्ये आले असून त्यांनी माथेरान शहारत येण्यासाठी पर्यावरण पूरक ई रिक्षा यांच्या माध्यमातून प्रवास केला. दस्तुरी नाका ते हुतात्मा स्मारक या प्रवासात डॉ. सावंत यांच्याकडून पर्यावरण पूरक ई रिक्षा यांच्या वाहतुकीबाबत चर्चा केली. त्याचवेळी ई रिक्षा प्रवासामुळे माथेरान आणखी जवळ आले असल्याचे मत व्यक्त केले.



त्यांनी ई रीक्षाच्या रांगेत उभे असलेल्या पर्यटकंसोबत संवाद साधला असता ई रीक्षाची सेवा फारच सोयीची आहे परंतु रिक्षांची संख्या फारच कमी असल्यामुळे ज्येष्ठ नागरिकांना, लहान बाळ घेऊन महिलांना तासनीतास उभे रहावे लागत असल्यामुळे ई रिक्षांची संख्या वाढवाने फारच गरजेचे असल्याचे मत मांडले. माथेरानमध्ये येत असताना पर्यावरण पूरक ई रिक्षा मधून प्रवास करण्याचा योग्य आला. त्या प्रवासाबद्दल डॉ. सावंत यांनी आनंद आणि समाधान व्यक्त करताना या पर्यावरण पूरक ई रिक्षा यांच्यामुळे माथेरान हे जगाच्या आणखी जवळ आले असे ते म्हणाले.

## कर्मचाऱ्यांना एकात्मतेची शपथ

**। उरण । प्रतिनिधी ।**

भारताचे माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांची पुण्यतिथी व सरदार वल्लभभाई पटेल यांची जयंती निमित्ताने शुक्रवार (दि.३१) रोजी उरणचे तहसीलदार डॉ. उद्धव कदम यांनी प्रतिमेस पुष्पहार घालून पुण्यतिथी व जयंती तहसिल कार्यालयात साजरी केली. तसेच राष्ट्रीय एकात्मतेची शपथ घेण्यात आली. यावेळी नायब तहसिलदार नरेश पेढवी, नायब तहसिलदार रवींद्र सानप, कार्यलयातील सर्व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## काळ्या काचांचा गैरवापराचा धोका

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

चार चाकी वाहनांना काळ्या काचा लावणाऱ्यांचे प्रमाण वाढू लागलेले दिसून येत आहे. पनवेल परिसरात अनेक वाहनांवर काळ्या काचा लावलेल्या दिसत आहेत. अशा वाहनांवर कारवाई करावी अशी मागणी केली जात आहे.

पनवेल तालुका आणि पनवेल महानगर पालिका हद्दीत चार चाकी वाहनांच्या काचांना काळ्याकाचा लावलेल्या दिसत आहेत. या काळया काचामुळे गाडीमध्ये कोण बसले आहे हे देखील समजत नाही. यात पत्रकार आणि पोलीस देखील मागे नाहीत. त्यांच्या गाड्यांना देखील काळ्या काचा लावलेल्या दिसतात. आलिशान कार आणि त्याला काळ्या काचा लावून फिरण्याचा मोह वाहनचालकांना आवरत नाही. काळ्या काचांच्या वापरावर बंदी असूनही पनवेल परिसरात त्यांचा सर्रास वापर केला जात आहे. परिवहन विभागाच्या परवानगीने तसेच अतिमहत्त्वाच्या व्यक्तींना काळ्या काचा वाहनांना लावण्याची मुभा आहे. अनेकदा समाजकंटकांकडून गैरकृत्य, गुन्हे करण्याचा काळ्या काचांचा गैरवापर होण्याचा धोका असल्याने काळ्या काचा वापरण्यावर बंदी घालण्यात आली.

## सुकेळीत रामलीला

**नागोठणे** : नागोठण्याजवळील ऐनघर ग्रामपंचायत हद्दीतील सुकेळी येथील महाराष्ट्र सीमलेस लिमिटेड कंपनीच्या मैदानात जिंदल कुटुंबातर्फे श्री रामलीला मंचनचे आयोजन शुक्रवार (दि.३१) ऑक्टोबर व १ नोव्हेंबर रोजी करण्यात आले होते. या कार्यक्रमाला साकेत जिंदल, रचना जिंदल, श्रीप्रिया जिंदल, श्रीजा जिंदल, शिवकुमार सिंघल, संजीव बॅनर्जी, एस के. यादव, के. के. पांडे यांच्यासह कंपनीचे इतर अधिकारी वर्ग आणि कर्मचारी वर्ग तसेच कर्मचाऱ्यांचे कुटुंबीय मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## विद्यार्थी गुणगौरव सोहळा साजरा

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

रायगड जिल्हा वैश्य समाज संघ शिक्षण समिती व वैश्य ग्लोबल चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थी गुणगौरव सोहळा २०२५ हा कार्यक्रम उत्साहात आणि दिमाखात संपन्न झाला. यावेळी १४० विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला. या सोहळ्याचे मनोज आंग्रे, वैश्य ग्लोबल चॅरिटेबल ट्रस्ट व रायगड जिल्हा युवक अध्यक्षांनी कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

समाजातील गुणवान विद्यार्थ्यांचा सन्मान करून त्यांना प्रोत्साहन देणे, तसेच शिक्षणाबद्दल जागरूकता निर्माण करणे हा या सोहळ्याचा मुख्य हेतू होता.



कार्यक्रमाचे नियोजन शिक्षण सभापती महेश पोटे, संतोष चौधरी, वाणी सर, सुनील भोपतराव, तसेच पनवेल तालुका वैश्य समाज महिला अध्यक्षा वर्षा साखरे व त्यांच्या टीमच्या अथक परिश्रमांमुळे यशस्वीरीत्या पार पडले.

यावेळी डॉ. संतोष कामेरकर, चंद्रकांत खाडये, डॉ. अजय चौगुले, कृष्णा म्हसकर, अशोक भोपतराव, शामल आंग्रे, मीरा मनोज आंग्रे, सुनील शेटे, तसेच रायगड जिल्ह्यातील सर्व उपाध्यक्ष, सचिव, गट सभापती आणि असंख्य समाजबांधवांनी उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवली.

## अधिकृत संकेतस्थळाचे शुभारंभ

**। रेवदंडा । प्रतिनिधी ।**

मुरूड तालुक्यातील कोर्लई ग्रामपंचायतीच्या अधिकृत संकेतस्थळाचे शुभारंभ नुकताच संपन्न झाला. संकेतस्थळाचे शुभारंभ कार्यक्रम कोर्लई ग्रामपंचायतीच्या सरपंच राजश्री मिसाळ यांचे हस्ते संपन्न झाला. कोर्लई ग्रामपंचायतीच्या अधिकृत संकेतस्थळाने ग्रामस्थांना शासनाच्या विविध योजना, आवश्यक दाखले, ग्रामपंचायतीच्या कामाची माहिती तात्काळ उपलब्ध होईल, तसेच ग्रामपंचायतीच्या कारभारात पारदर्शकता वाढण्यास मदत होणार आहे. स्मार्ट ग्राम व समुध्द पंचायत अभियानाअंतर्गत डिजिटल सुविधा अत्यंत महत्वाचा ठरतात.

तसेच या संकेतस्थळामुळे ग्रामपंचायतीची संपुर्ण माहिती, महत्वाच्या सुचना, विकास कामाचा अहवाल, आवश्यक कागदपत्रे, आणि पदाधिकारी, कर्मचारीवर्गाचे संपर्क तपशील उपलब्ध राहील. कोर्लई ग्रामपंचायतीचे अधिकृत संकेतस्थळ असणे, हे गावाच्या आधुनिकरणाच्या आणि स्मार्ट ग्राम निर्मितीच्या दिशेने टाकलेले महत्वपुर्ण पाउल आहे, असे ग्रामपंचायत अधिकारी आशा बिरवाडकर-काजारे यांनी म्हटले. यावेळी कोर्लई ग्रामपंचायत सरपंच राजश्री मिसाळ, आशा बिरवाडकर-काजारे, जितेंद्र पाटील, जागृती पिटकूर,तसेच ग्रामपंचायत कर्मचारीवर्ग यांची उपस्थिती होती.



## खरेदीसाठी खवय्यांच्या उड्या | शेतातील पाणी काढून मासेमारी

# गोड्या पाण्यातील माशांची मेजवानी

**। पाली/बेणसे । प्रतिनिधी ।**

परतीचा पाऊस साध्या जोरात सुरु आहे. त्यामुळे नदी, तलाव, ओहळ शेतातील साठलेले पाणी आदी गोड्या पाण्यातील मासेमारी जोरात सुरू आहे. सध्या गोड्या पाण्यातील विविध मासे मोठ्या प्रमाणात आढळत आहेत. खवय्यांच्या उड्या आता चविष्ट गोड्या पाण्यातील माशांवर पडत आहेत. हे मासे सध्या मोठ्या प्रमाणात बाजारात उपलब्ध होत असल्याने खवय्यांना मेजवानी मिळत आहे.

नद्या, तलाव, धरण, पाणवठे, ओढे, ओहळ, शेतात साठलेले पाणी अशा गोड्या पाण्यात सापडणाऱ्या माशांची आवक देखील वाढली आहे. त्यामध्ये



मळे, कोलीम, म्हूऱ्या, शिवडा, अरलय, वाम, कोलंबी, कटला, फंटूस व खवल आदी माशांचा समावेश आहे. मळे व म्हूऱ्या हा प्रकार या दिवसांत अधिक मिळतो. त्यामुळे खवय्ये आवर्जून खरेदी करतात. काहीजण तर मुंबई, ठाणे आदी शहरात राहणाऱ्या आपल्या नातेवाईकांना देखील भेट देतात.

कोळी बांधवांबरोबरच प्रामुख्याने आदिवासी आणि गळभोई समाजातील लोक खुप मेहनतीने हे मासे व चिंबोऱ्या पकडतात. हे विकुन त्यांच्या हाती चार पैसे मिळतात. नदी, तळा, धरण येथे टायर ट्यूबवर बसून गाळाने व जाळी टाकून मासेमारी होते. तर शेतातील साठलेले पाणी काढून मासे पकडले जातात. सध्या मासे देखील खूप मिळत आहेत. त्यामुळे उदरनिर्वाह चांगला सुरू आहे.

**मळे – या वर्षी ५० ते ८० रुपये पाव तर २०० ते २५० रुपये किलो.**
**कोलीम (बारीक कोळंबी) – यावर्षी ५० ते ६० रुपये वाटा मागीलवर्षी ३० रुपये वाटा**
**म्हूऱ्या – यावर्षी ४० रुपये वाटा मागील वर्षी ३० रुपये वाटा (एका पानावर वाटा असतो)**
**शिवडा, कटला व वाम – ५०० ते ६०० रुपये किलो.**
**मोठी गोडी कोलंबी – या वर्षी १००० ते १२०० रुपये किलो.**
**फंटूस – या वर्षी ३०० ते ४०० रुपये मागीलवर्षी २०० ते २५० रुपये किलो.**

**माणगाव येथील गृहिणी प्रियांका हेमंत गोसावी यांनी सांगितले की, सध्या गोड्या पाण्यातील मासे बाजारात विक्रीसाठी मोठ्या प्रमाणात येत आहेत. शहरात असणाऱ्या नातेवाईकांना आवर्जून भेट म्हणून गोडे मासे नेले आहेत. मळे, शिवडा, कटला व म्हूऱ्या हे मासे अनेकांना खूप आवडतात.**

## गवळी समाज संघटना संकुलाचे लोकार्पण

**म्हसळा** : श्रीवर्धन विभाग गवळी समाज संघटना (रजि.) मौजे भोस्ते येथे उभारण्यात आलेल्या नूतन समाज संकुल व श्रीमती गीता दत्तात्रय तटकरे सभागृह याचे लोकार्पण सोहळा खा. तटकरे यांच्या हस्ते पार पडला. याप्रसंगी खासदारांनी समाज बांधवांना मार्गदर्शन करताना उभारण्यात आलेल्या या समाज सभागृहाचा उपयोग केवळ वार्षिक सभा किंवा हिशोब सादरीकरणासाठी न करता समाजाच्या व्यापक हितासाठी, महिला सक्षमीकरणासाठी आणि आर्थिक उन्नतीसाठी व्हावा असे आवाहन केले. या सोहळ्यास मंत्री आदिती तटकरे, माजी आ. तुकाराम सुर्वे, दर्शन विचारे, माजी सभापती चोरगे, लिलाधर रिकामे, दिलीप कांबळे, बाळकृष्ण गोरनाक, लक्ष्मण कांबळे, प्रकाश रिकामे, सुरेश तांबडे, दिगंबर महाडिक, सुनील दर्गे उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन किशोर लाड यांनी केले तर प्रस्ताविक लिलाधर रिकामे यांनी केले होते.

**अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे**

**२ नोव्हेंबर**

१) श्रीम. अनघा ज्योतिप्रकाश मुकादम., अलिबाग
दि. ०२-११-१९५०

२)श्रीम.अंजनी अर्जुन मिसाळ मु.कोळोशी, अलिबाग
दि.०२-११-१९५४

## भाजपच्या रवी मुंढेंचा शिंदे गटात प्रवेश

**तळा :** भाजप महाराष्ट्र प्रदेश सचिव रवी मुंढे यांनी आपल्या असंख्य कार्यकर्त्यांसह मंत्री भरत गोगावले यांच्या उपस्थितीत शिवसेना शिंदेगटात जाहीर पक्ष प्रवेश केला. पूर्वी शिवसैनिक असलेल्या रवी मुंढे यांनी तळा तालुक्यात शिवसेना वाढीसाठी मेहनत घेतली होती. त्यांच्यावर शिवसेना जिल्हाप्रमुख पदाची जबाबदारी सोपविण्यात आली होती. परंतु पक्षातील नेत्यांशी जुळत नसल्याने त्यांनी पदाचा राजीनामा देत भाजपमध्ये प्रवेश केला होता. मात्र, वरिष्ठ नेत्यांकडून विकासकामे करण्याबाबत लक्ष देण्यात येत नसल्यामुळे अखेर त्यांनी भाजपला रामराम ठोकला.

# मच्छिमारांचे प्रश्न तात्काळ सोडवा

## ● मार्तंड नाखवा यांचे केंद्रीय सचिवांना गाऱ्हाणे

**| उरण | प्रतिनिधी |**

मत्स्य व्यवसाय क्षेत्राच्या सर्वांगीण आणि शाश्वत विकासासाठी केंद्र सरकारने राबविलेल्या महत्त्वाकांक्षी उपक्रमाच्या पार्श्वभूमीवर भारत सरकारच्या मत्स्यव्यवसाय विभागाचे केंद्रीय सचिव डॉ. अभिलाक्ष लिखी हे रायगड जिल्ह्याच्या दौऱ्यावर आले होते. या दौऱ्यादरम्यान मत्स्य व्यवसायाशी संबंधित सर्व वरिष्ठ अधिकारी तसेच रायगड जिल्ह्याचे जिल्हाधिकारी उपस्थित होते. या कार्यक्रमात सचिव डॉ अभिलाक्ष लिखी यांच्या स्वागताचा मान वैष्णवी माता मच्छीमार सोसायटीचे चेअरमन मार्तंड नाखवा यांना देण्यात आला. नाखवा यांनी या प्रसंगी पर्ससीन नेट मच्छीमार, करंजा बंदर तसेच अधिकारी वर्गाशी संबंधित अनेक गंभीर व प्रलंबित प्रश्न तात्काळ सोडवा, असे आवाहन केले.



दरम्यान, केंद्र आणि राज्य सरकारांनी एकत्र येऊन पर्ससीन नेट मासेमारीला येत्या अधिवेशनात कायदेशीर स्वरूप देऊन अधिकृत परवानगी द्यावी, अशी ठाम मागणी नाखवा यांनी केली. करंजा बंदर येथे इतर राज्यांतून आलेल्या मत्स्य पुरवठादारांनी स्थानिक मच्छीमारांची सुमारे ४० ते ५० कोटी रुपयांची मोठ्या प्रमाणावर फसवणूक केली आहे. या गंभीर प्रकरणात केंद्र आणि राज्य सरकारांनी त्वरित संयुक्त कारवाई करून दोषींवर कठोर कारवाई करावी व मच्छीमारांचे नुकसान भरून काढावे, रायगड जिल्ह्यात मत्स्य व्यवसाय वेगाने प्रगत होत असून त्याचे श्रेय एनसीडीसी योजनेला जाते. पूर्वी या योजनेअंतर्गत दरवर्षी सुमारे २५० बोटींसाठी आर्थिक सहाय्य मिळत होते. मात्र, गेल्या दहा वर्षांपासून मान्यता मिळालेल्या सुमारे ४०० बोटींसाठी निधी रोखून धरला आहे. वाढत्या बांधणी खर्चाचा विचार करता हा निधी तातडीने वितरित करावा, करंजा बंदरात दररोज शंभराहून अधिक बोटींची ये-जा होत असून दुर्घटनेचा धोका वाढत आहे. त्यामुळे बंदरातील साचलेला गाळ तातडीने काढून मच्छीमारांच्या सुरक्षिततेची हमी देण्यात यावी, करंजा मच्छिमार बंदरात असलेला २०० टन क्षमतेचा आईस फॅक्टरी व कोल्ड स्टोरेज प्रकल्प करंजा मच्छिमार सोसायटीकडे देण्यात यावा, अशी मागणी नाखवा यांनी ठामपणे केली.

# नवीन पनवेलमध्ये दूषित पाणीपुरवठा

## ● नागरिकांचे आरोग्य धोक्यात

**| नवीन पनवेल| प्रतिनिधी |**

नवीन पनवेल सेक्टर १७ पीएल ५ येथील १ ते २४ इमारतींमध्ये मागील काही दिवसांपासून दूषित पाण्याचा पुरवठा होत असून, त्यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे.

सिडको प्रशासनाला याबाबत कल्पना देऊनही त्याकडे दुर्लक्ष केले जात असल्याचा आरोप केला जात आहे. दूषित पाणीपुरवठा थांबला नाही, तर सिडकोवर मोर्चा काढत जाब विचारला जाईल, असा इशारा येथील रहिवासींनी दिला आहे. नवीन पनवेल या भागामध्ये सतत दूषित मातीमिश्रित पाणीपुरवठा होत आहे. आधीच कमी दाबाने पाणीपुरवठा होत असताना त्यातही दूषित, गढूळ पाण्यामुळे नागरिक हैराण झाले आहेत.



नवीन पनवेल परिसरात अनेक ठिकाणी लहान मुलं व वयोवृद्ध नागरिक आजारी पडत आहेत. लहान मुलांमध्ये कॉलरा, डायरिया याची साथ पाहायला मिळत आहे. दूषित पाणीपुरवठा त्वरित थांबवावा, अन्यथा तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशारा येथील स्थानिक रहिवासींनी दिला आहे.

# खंडित वीजपुरवठ्याचा ग्राहकांना फटका

**| नवीन पनवेल | प्रतिनिधी |**

पनवेल तालुक्यातील ग्रामीण भागात होत असलेल्या वारंवार खंडित वीजपुरवठ्याचा फटका येथील वीज ग्राहकांना बसत आहे. सबस्टेशनचे काम पूर्ण न झाल्याने अनेकदा वीज खंडित होते.

तालुक्यातील नेरे या ठिकाणी सब स्टेशनचे काम सुरू आहे. मात्र, अद्यापही या सबस्टेशनचे काम पूर्ण झालेले नाही. पनवेल तालुक्यातील नेरे येथे महावितरणच्या सबस्टेशनचे काम गेल्या काही महिन्यांपासून सुरू आहे. हे काम अद्याप अपूर्ण अवस्थेत आहे. मात्र, वीज गेल्यानंतर कित्येक तास विजेचा पत्ता नसतो. फॉल्ट शोधण्यातच बराचसा वेळ निघून जातो. पावसाळ्यात तर अनेकदा वीजपुरवठा खंडित होतो. ऑक्टोबर महिन्यात तर दिवसाआड वीजपुरवठा खंडित होत आहे. याचा फटका येथील हजारो वीज ग्राहकांना बसतो. काही वेळेला रात्रभरदेखील वीज नसते. दोन दिवसांपूर्वी जवळपास सहा ते आठ तास वीज गायब होती. कनिष्ठ अभियंता कोकिटकर यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता अनेकदा त्यांचा भ्रमणध्वनी नॉटरीचेबल लागतो. त्यामुळे नागरिकांना विद्युत पुरवठा कुठे आणि कशामुळे खंडित झाला आहे, हे समजत नाही. त्यामुळे रात्रभर विद्युतपुरवठा कधी सुरळीत होईल याची वाट पाहण्याशिवाय वीज ग्राहकांकडे पर्याय नसतो.

## सुधागडमधील भाजपात गटांची गर्दी

**पाली/वाघोशी :** सुधागड तालुक्यात निवडणुकीचा बिगुल वाजताच भाजपाच्या गोटातील वातावरण एकदम गरम झाले आहे. निवडणुकीपूर्वी एकदिलाने काम करूया असा निर्धार करणारे सर्व भाऊ, दादा, ताई आणि जुन्या जाणत्यांचे गट आपाल्या उमेदवाराला तिकीट मिळवण्यासाठी मोर्चेबांधणी करताना दिसत आहेत. कोणी म्हणतंय आमचाच उमेदवार योग्य, तर कोणी म्हणतंय आम्हीच खरी निष्ठा दाखवलीय. परिणामी, पक्षात भाऊंचा, दादांचा, निष्ठावंतांचा आणि जुनेजाणते असा गटांचा महामेळावा रंगला आहे. या रस्सीखेचीत काहीजण नाराज होऊन बंडखोरीचा रियाज सुरू करतील की काय, अशी चर्चा सुरू आहे.

## शेतकऱ्याला सरसकट नुकसानभरपाई मिळावी : भोईर

**| पाताळगंगा | प्रतिनिधी |**

परतीचा पाऊस शेतकऱ्यांच्या मुळावर उठला असून, या पावसामुळे उभी पिके शेतात आडवी झाल्याचे दृश्य तालुक्याच्या ठिकाणी पाहावयास मिळत आहे. काही भाताच्या लोंब्याला अंकुर फुटले असून, त्याचबरोबर पेंढा कुजत चालला आहे. परिणामी, गुरांच्या चाऱ्यांचा प्रश्न ऐरणीवर येणार आहे. यामुळे भातशेतीच्या झालेल्या नुकसानीमुळे शेतकरी हवालदिल झाला असून, सरसकट नुकसानभरपाई मिळावी, अशी मागणी उत्तम भोईर यांनी केली आहे.



परतीच्या पावसामुळे मोठे नुकसान झाले असून, हातातोंडाशी आलेला घास वाया जात असल्याने शेतकरी पुरता हैरण झाला आहे. यामुळे यावर्षी मोठ्या अन्नधान्याचा तुटवडासमवेत गुरांच्या चाऱ्याचा प्रश्न ऐरणीवर येणार येणार आहे. यामुळे शेतकरी वर्गाला तातडीने सरसकट नुकसानभरपाई मिळावी, असे उत्तम भोईर म्हणाले.

## चौलनगरीत दत्त पौर्णिमा ग्रुपचा महाप्रसाद सोहळा

**| रेवदंडा | प्रतिनिधी |**

चौल भोवाळे येथे इतिहास आणि अध्यात्म यांचा संगम असलेल्या चौल नगरीत, श्री दत्त पौर्णिमा ग्रुपतर्फे आयोजित वार्षिक महाप्रसाद सोहळा भक्तिभावाने पार पडला. भाऊबीजेनंतरचा गुरुवार, दि.३० ऑक्टोबर रोजी महाप्रसादाचा सोहळा पार पडला.



उंच पायऱ्यांवर वसलेले हे पुरातन दत्तदेवस्थान भक्तांसाठी श्रद्धेचे शक्तिपीठ मानले जाते. येथे दर्शन घेतल्यावर भक्तांच्या मनोकामना पूर्ण होतात, असा खोल विश्वास स्थानिक आणि आगंतुक भक्तांच्या मनात आहे. पहाटेपासूनच मंदिर परिसरात दर्शनासाठी गर्दी झाली होती. दत्तगुरूंच्या जयघोषात वातावरण पवित्र झाले होते. सभोवतालचा परिसर त्या दिवशी अधिकच रमणीय भासत होता. डोंगरावर पसरलेली हिरवळ, मंद वाऱ्याने डोलणारी झाडे आणि थोड्याच अंतरावर दिसणारा रेवदंडा खाडीचा किनारा या सर्व निसर्गसंपदेमुळे भक्तीची अनुभूती अधिक गाढ झाली.

महाप्रसादात विविध पारंपरिक पदार्थांची चव सर्वांना रुचली. सर्व वयोगटातील भक्तांनी भक्तिभावाने प्रसादाचा आस्वाद घेतला. श्री दत्त पौर्णिमा ग्रुपच्या सदस्यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले. चौलचा हा सोहळा केवळ धार्मिक नाही, तर समाजातील सद्भाव, एकता आणि संस्कृती जपणारा पर्व ठरला. गुरुदेव दत्तांच्या आशीर्वादाने येणाऱ्या काळात अशा भक्तिसोहळ्यांमधून समाजात श्रद्धा आणि प्रेमाचे बंध अधिक मजबूत होतील, अशी ग्रामस्थांची भावना होती.

# साप्ताहिक राशिभविष्य ०२ ते ०८ नोव्हेंबर २०२५

ज्योतिषी : मिलिंद पाटील, सारळ-अलिबाग
मोबा.९४०४७९१७९८

## आर्थिक बाजू उत्तम राहील

**मेष :** या सप्ताहात आपली मते दुसऱ्यांवर लादू नका. आर्थिक बाजू चांगली ठेवता येईल, पण पर्यायाने खर्चाचे प्रमाणही वाढण्याची शक्यता आहे. स्वतःमधील ऊर्जा पाहा व त्याप्रमाणे काम करणे ठीक राहील. कौटुंबिक वातावरण वादासारख्या प्रसंगांनी बिघडणार नाहीत याची दक्षता घ्या. प्रकृतीची पथ्ये पाळा, विशेषतः खाण्यापिण्याची पथ्ये पाळा. मित्रांची पारख करून त्यांची मैत्री ठेवा. आपण आपल्या कार्यक्षेत्रातील कामासंबंधी प्रयत्नशील राहिल्यास आपल्या ध्येयाजवळ जाऊ शकाल. नोकरदारांनी वरिष्ठांशी मिळते-जुळते घेण्याचे धोरण स्वीकारल्यास हितकारक ठरू शकेल. व्यावसायिक क्षेत्रात मात्र तज्ज्ञांच्या सल्ल्याशिवाय आर्थिक व्यवहार करू नये. हाती घेतलेल्या कार्यात यशाची अपेक्षा ठेवू शकता. कलाक्षेत्राला चांगले प्रोत्साहन मिळेल, विशेषतः नवकलाकाराला त्यांच्या अंगभूत कलागुणांना उत्तम संधी मिळेल. प्रवास योग संभवतात. थोडा व्यायाम आवश्यक आहे. कमीत कमी सकाळी श्वसनाकडे लक्ष देणे गरजेचे आहे. योगाचा अवलंब करा. **महिलांना :** कुठल्याही गोष्टींचा अतिरेक होणार नाही याकडे लक्ष द्या. जिद्द व आत्मविश्वासाने नियोजित कामे पार पाडा. **शुभ दिनांक :** ०२,०३.

## व्यवसाय, उद्योगात लाभ

**वृषभ :** या सप्ताहातील ग्रहमान पाहता या काळात सज्जनांशी संपर्क वाढेल. व्यवसाय, उद्योगात लाभ होतील. ऐकावे जनाचे, करावे मनाचे या उक्तीप्रमाणे वागावे. आगामी आठवडा आपल्यासाठी चांगला जाईल. बौद्धिक चातुर्याच्या जोरावर अनेक काम पार पाडाल. धाडस वाढेल. गुप्त विद्या आणि अध्यात्मातील गोडी वाढेल. सट्टा, जुगारापासून लांब राहा. मनोरंजनात वेळ गेल्याने मन प्रसन्न राहील. कार्यक्षेत्रात प्रगतीचे योग आहेत. वृत्तीतील गोडवा भाग्योदयासाठी अनुकूल ठरेल. विनाकारण वादात पडू नका. प्रियकर/प्रेयसीसोबत कुटुंबातील सदस्यांना न सांगता विवाह करण्याचा प्लॅन बनवू शकतात. तथापि, आपल्यासाठी योग्य सल्ला हाच आहे की, हे करणे तुमच्यासाठी योग्य नाही. तुम्हाला विवाहाच्या आधी आपल्या घरच्यांसोबत चर्चा केली पाहिजे. मित्र, मैत्रीण यांच्याकडून लाभ संभवतो आहे. कामावर अधिकारी खुश होणार आहेत. **महिलांना :** आपल्या हातून एखादे मोठे कार्य होणार आहे. स्तुतिपाठकांपासून सावध राहा. पाळीव प्राण्यापासून लांब राहणे हिताचे ठरणार आहे. आपला प्रवासाचा बेत आता तडीस जाणार आहे. **शुभ दिनांक –** ०४,०५.

## हातातील कामे यशस्वी होतील

**मिथुन :** या सप्ताहातील ग्रहमान पाहता आपल्या करिअरला उज्ज्वल बनवण्यासाठी सतत आपली योग्यता वेळोवेळी निरखून पाहात राहणे खूप गरजेचे आहे. या कालावधीत तुम्ही ही या गोष्टीला उत्तमरित्या समजू शकतात. आपली ग्रहस्थिती पाहता थोडी फार तब्येत नरमगरम राहण्याची शक्यता आहे. पण स्वतःच घरगुती इलाज करणे टाळा. या राशीतील जातकांमध्ये उत्तम ऊर्जा आणि नेतृत्व क्षमता विकसित होऊ शकते. आपल्या याच गुणांच्या कारणाने तुमचा सहवास मित्रांना हवाहवासा वाटतो. या राशीतील जातकांना आपल्या जीवनात यश मिळवण्यासाठी तुम्हाला आपल्या व्यवहारात विनम्रता आणण्याची आवश्यकता असेल. जर तुम्ही प्रत्येक गोष्टीला घेऊन राग करत असाल, तर तुमचा व्यवहार या आठवड्यात तुमच्यापासून दूर होऊ शकतो. हातात घेतलेल्या कामांना या आठवड्यात यश लाभेल. **महिलांना :** घरातील स्थितीला उत्तम बनवण्यासाठी तुम्हाला आपल्या जीवनसाथीचा प्रत्येक गरजेच्या गोष्टीवर सल्ला घेतला पाहिजे. या राशीतील ते जातक जे कुठल्या लांब आजाराने चिंतीत आहेत, त्यांनी नियमितपणे आपले चेकअप डॉक्टरांकडून केले पाहिजे. **शुभ दिनांक –** ०६,०७

## नशिबाची साथ मिळेल

**कर्क :** या सप्ताहातील ग्रहमान पाहता सुरुवातीला आठवड्यात काही अडथळे आले तरी, त्यानंतरचा काळ ठीक असल्याने व नशिबाची साथ मिळाल्याने पुष्कळशा गोष्टी साध्य करता येतील. नोकरदारांना दिलासा मिळेल. कामाचा उत्साह वृद्धिंगत होईल. कलाक्षेत्राला चांगला वाव मिळेल एखादा चांगला प्रस्ताव कलाकारांना मिळणार आहे. स्थावर मालमत्तेसंबंधीचे प्रश्न मार्गी लागतील. कुटुंबातील काही वाद असतील तर चर्चा करण्यास हरकत नाही त्यातून मार्ग काढता येईल. कौटुंबिक प्रश्नांना सोडवण्यासाठी प्राधान्य द्या. विशेषतः मुलांच्या वैयक्तिक गरजा भागविण्याचा प्रयत्न करा. आर्थिक बाजू ठीक राहील. हातात पैसा राहणार आहे. त्यामुळे बचत होऊ शकेल. आप्तेष्टांच्या गाठीभेटीचे योग येतील. प्रवासात मौल्यवान वस्तूंची काळजी घ्या. प्रकृती जपा, खाण्यापिण्याची पथ्ये पाळा, उष्णतेच्या संबंधातील समस्यांवर उपाय करा. **महिलांना–** जोडीदाराची साथ मिळेल. आपल्या मनाप्रमाणे एखादी सुंदरशी भेट मिळणार आहे. आपला मित्र, मैत्रीण परिवार यांच्या साथीमुळे अवघड काम मार्गी लागणार आहे. चांगल्या बातमीमुळे मन प्रसन्न राहील. **शुभ दिनांक –** ०२,०८.

## कलागुणांना वाव मिळेल

**सिंह :** एकूण ग्रहमान पाहता हा आठवडा आपल्या मनात योजिलेल्या गोष्टीनुसार साजरा करता येईल. नोकरदारांना बदली, बढतीबाबत मोठा दिलासा मिळेल. वरिष्ठांची मर्जी सांभाळता येईल. स्थावर-जंगमबाबतीतील प्रश्न सोडविता येतील. खर्चाचे प्रमाण वाढणार असल्याने प्रथमपासून अनावश्यक खर्च टाळा. व्यावसायिक विस्तार करण्याचा मानस राहील. उत्कर्षाची संधी प्राप्त होईल. महत्त्वाची कागदपत्रे काळजीपूर्वक हाताळा. कुटुंबांना प्राधान्य द्या. प्रकृतीस्वास्थ्य जपा, खाण्यापिण्याची पथ्ये पाळा, रक्तदाबाच्या त्रासापासून सावध राहा. वादाची स्थिती काही वेळा आपले हात रिकामे करू शकते. आजारी व्यक्तींनी नियमित औषधांचे सेवन केले पाहिजे. नियमित सूर्योदयाच्या वेळी श्री गणेश स्तोत्र जप करा. अडचणीची स्थिती निर्माण झाली तरी या स्थितीतून बचाव करण्यासाठी कामकाजात गाफील न राहता चाणाक्षपणे कामे केल्यास हा आठवडा सर्व दृष्टीने यशदायी जाऊ शकेल. **महिलांना :** कलाक्षेत्राला चांगला काळ असून, महिलांना त्यांच्या कलागुणांना वाव मिळेल. आप्तेष्टांच्या गाठीभेटी होतील. **शुभ दिनांक :** ०४,०६

## आठवडा शुभ फलदायी

**कन्या :** हे जातक खूप कल्पनाशील असतात आणि खूप विचार करणारे असतात. यांची कल्पनाशक्तीमुळे यांच्या जीवनात चांगल्या फळांची प्राप्ती होत असतेच; परंतु, बऱ्याच वेळा अत्याधिक विचार करण्यामुळे हे आपला मूल्यवान वेळ खराब करून बसतात. या राशीतील लोकांसाठी हा आठवडा शुभ फलदायी राहण्याची पूर्ण अपेक्षा आहे. तुम्ही आपल्या करिअरमध्ये सकारात्मक परिवर्तन आणण्याचा प्रयत्न केला आहे, ज्याचे उत्तम फळ तुम्हाला या कालावधीत नक्कीच मिळेल. नोकरी व व्यवसायात तुमची प्रगती होऊ शकते आणि या सोबतच जर मोठ्या भाऊ बहिणींसोबत किवा नतेवाईकांन सोबत कुठल्या गोष्टीला घेऊन वाद चालत आहे तर, हा वाद या साप्ताहात दूर होऊ शकतो. नियमित सूर्योदयाच्या वेळी ओम नमः शिवायचा जप करा. त्याचा फायदा होऊ शकेल जीवनसाथीची आरोग्य या कालावधीत खराब होऊ शकते. **महिलांना :** एकंदर ग्रहमान पहिले असता या साप्ताहात तुमच्या आरोग्याची स्थिती खूप चांगली सांगितली जात नाही. यावेळी तुम्हाला डोळे, डोके आणि कान मध्ये समस्या होऊ शकतात. आर्थिक बाजू ठीक राहील. **शुभ दिनांक :** ०२,०४.

## समाजात नावलौकिक वाढेल

**तुळ :** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात मनाजोगता आठवडा आहे, कामाची धावपळ वाढेल. उत्तम आठवडा असला तरी आळस नको, परिश्रमाला पर्याय नाही. कौटुंबिक गोष्टींना प्राधान्य द्या, त्यामुळे घरातील वातावरण चांगले ठेवता येईल. काही संधी चालून येतील. एखादे चांगले पद मिळेल. समाजसेवेत नावलोकीक मिळेल. संधीचा लाभ घ्या. नोकरदारांनी वरिष्ठांशी मिळते-जुळते घेण्याचे धोरण स्वीकारावे. स्थावर संपत्तीतून फायदा होण्याची शक्यता आहे. शेती, वाहन, मशिनरीच्या कामकाजात प्रगतीची संधी प्राप्त होईल. धार्मिक कार्यात सहभागी होण्याची संधी मिळेल. दाम्पत्य जीवन उत्तम राहील. अचानक प्रवास योग संभवतात. आपल्या बोलण्यावर योग्य नियंत्रण ठेवावे. आर्थिक बाजू सुधारेल. नव्या उद्योग-व्यवसायासाठी इतरांवर अवलंबून राहू नये. प्रकृतीस्वास्थ्य जपा. डोळे, कानाचा त्रास संभवतो, तरी जपा. जोडीदाराची उत्तम साथ मिळेल. **महिलांना :** थोडी धावपळ झाली तरी स्थावरबाबतीतील प्रश्न सोडविता येतील. आर्थिक बाजू ठीक राहील. प्रकृतीस्वास्थ्याबाबत जागरूक राहा, विशेषतः खाण्यापिण्याची पथ्ये पाळा, डोळ्यांच्या विकारांबाबत सावध राहा. जोडीदाराची उत्तम साथ मिळेल. **शुभ दिनांक :** ०३,०५.

## नोकरदारांना दिलासा

**वृश्चिक :** आपले ग्रहमान पाहता हा सप्ताह सर्व बाबतीत यश देणारा उत्तम आठवडा म्हणून मानला जाईल. आपली आर्थिक बाजू वृद्धिंगत झाल्याचे दिसून येईल. इतरांवर विसंबण्यापेक्षा स्वबळावर पुढे जा. नोकरदारांना दिलासा मिळेल. स्थावरबाबतीतील प्रश्न सुटू लागतील अचानक आपले राहिलेले अडकलेले प्रश्न सुटू लागतील. नवीन घर, गाडी जागा याबाबत खरेदीचे बेत साध्य होतील. आपल्या जवळच्या धार्मिक कार्यात सहभागी व्हाल. लांबच्या आप्तेष्टांच्या गाठीभेटी होतील. लांबवर प्रवासाचे योग येतील. ज्यांच्या पत्रिकेमध्ये परदेशी जाण्याच्या योग आहे, अशा काही भाग्यवंतांना परदेशगमनाचे योग संभवतात. आपल्या इच्छेप्रमाणे कामे पार पाडता येतील. व्यावसायिक जीवनात एखाद्या स्पर्धेला सामोरे जावे लागण्याची शक्यता राहील. मार्केटिंग क्षेत्राला उत्तम काळ राहील. **महिलांना :** कलाक्षेत्राला, विशेषतः महिलांना त्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन मिळेल. एखादी सुखद बातमी आठवड्याच्या शेवटी मिळण्याची शक्यता राहील. प्रकृती जपा, दातदुखी यापासून सावध राहा. जोडीदाराची साथ मिळेल. **शुभ दिनांक :** ०४,०६.

## जोडीदाराची उत्तम साथ लाभेल

**धनु :** एकूण ग्रहमान पाहता आपण घेत असलेल्या परिश्रमाला योग्य न्याय दिल्याचे खरे समाधान मिळेल. नोकरदारांना काहीसा दिलासा मिळेल. तरीही नोकरदारांनी वरिष्ठांशी मिळते-जुळते घेण्याचे धोरण स्वीकारावे. सरकारी नियमांचे पालन कटाक्षाने करा. राजकीय क्षेत्रातील व्यक्तींना हा काळ उत्तम राहील. एखादे लाभाचे पद मिळेल ते घेण्यास हरकत नाही. घरगुती वातावरण बिघडणार नाही याची दक्षता घ्या. वाहनांच्या वेगावर योग्य नियंत्रण ठेवा. मिळणाऱ्या संधीचा लाभ घेण्याचा प्रयत्न करा. नवे संबंध जुळण्याची शक्यता आहे. प्रवासात सावधानता बाळगा. प्रकृतीची काळजी घ्या, मोसमी आजारांपासून सावध राहा. जोडीदाराची उत्तम साथ मिळेल. आपण प्रत्येक बाबतीत सकारात्मक दृष्टिकोन ठेवून वागल्यास हा सप्ताह लाभदायक राहू शकेल. **महिलांना :** स्थावर-जंगम मालमत्तेतील गुंतवणूक फायदेशीर ठरू शकेल. कलाक्षेत्राला प्रोत्साहन मिळेल. आर्थिक व्यवहारात मात्र सावधानता बाळगणे हितकारक ठरू शकते. विशेषतः जमिनीचे व्यवहार काळजीपूर्वक करा. फसगत होण्याची शक्यता राहील. सर्दी व उष्णता यांचा त्रास संभवतो. **शुभ दिनांक :** ०५,०७.

## व्यवसायात प्रगतीची संधी

**मकर :** आपले ग्रहमान पाहता आपण कौटुंबिक गोष्टींना प्राधान्य देऊन कामाची आखणी केल्यास आपणास समाधान मिळू शकेल. कलाक्षेत्राला, विशेषतः कलाकारांच्या कलागुणांना चांगला वाव मिळेल. एखादा चांगला प्रस्ताव घेऊ शकता, प्रवासाचे योग येतील. विद्यार्थीवर्गाला अध्ययनात प्रगती करण्याची संधी मिळेल. उद्योग-व्यवसायात प्रगती करता येईल. मुलांच्या प्रश्नांना प्राधान्य देऊन ते सोडविण्याचा प्रयत्न करा. आर्थिक बाजू ठीक राहील. प्रकृतीची काळजी घ्या, विशेष करून अपचन, तळपायाची जळजळ यांपासून सावध राहा. आपण कोणाबरोबरही स्पर्धा करण्याचे टाळल्यास हा आठवडा चांगला जाऊ शकेल. नोकरदारांना दिलासा मिळेल. शेतीविषयक व कोर्टकचेरीच्या कामांना चालना मिळेल. कौटुंबिक गोष्टींना प्राधान्य द्या. हाती घेतलेल्या कामांना सफलता मिळेल. येणाऱ्या प्रसंगांना शांततेने सामोरे जा. **महिलांना :** काही कौटुंबिक जबाबदाऱ्या पडण्याची शक्यता राहील. बोलण्यात नम्रता असणे हितकारक ठरेल. प्रकृतीस्वास्थ्य जपा. कंबरदुखी, डोळ्यांची जळजळ यांपासून सावध राहा. जोडीदाराची साथ मिळेल. **शुभ दिनांक –** ०३,०६

## विवाहेच्छुकांना उत्तम काळ

**कुंभ :** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात अनेक प्रकारच्या संधी प्राप्त होतील, त्याचा योग्य लाभ घेण्याची तयारी ठेवा. नोकरदारांना दिलासा मिळेल. स्थावरबाबतीतील प्रश्न मार्गी लावता येतील. कौटुंबिक वातावरण वादासारख्या कारणांनी बिघडणार नाही याची दक्षता घ्या. छोटे प्रवास संभवतात. मुलांच्या प्रश्नांना व कौटुंबिक गोष्टींना प्राधान्य द्या. क्रीडा व राजकीय क्षेत्रातील व्यक्तींना हा काळ उत्तम राहील. आपण सर्व बाबतीत सावधानता बाळगल्यास अपेक्षित गोष्टी साध्य होऊ शकतील. कलाक्षेत्रातील व्यक्तींना उत्तम काळ असून, त्याचा छान लाभ घेता येईल. व्यवसायात प्रगती करण्याची संधी मिळेल. विवाहेच्छुकांच्या मनोकामना पुऱ्या होण्याची संधी प्राप्त होऊ शकेल. सरकारी नियमांचे पालन कटाक्षाने करा. आपली प्रतिमा मलीन होणार नाही. याकडे लक्ष द्या. संभाषणात शब्दफेक योग्य करा. आर्थिक बाजू ठीक राहील. **महिलांना :** कौटुंबिक गोष्टींना प्राधान्य द्या. प्रकृतीस्वास्थ्य जपा. वैवाहिक जोडीदाराची उत्तम साथ मिळेल. आपल्या बोलण्यावर मात्र नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. **शुभ दिनांक –** ०५,०६.

## प्रलोभनात अडकू नका

**मीन :** या सप्ताहाचे ग्रहमान पाहता आपण प्रत्येक बाबतीत संयमाने वागल्यास व त्याप्रमाणे कृती केल्यास हा सप्ताह चांगला जाऊ शकेल. कामकाजात निर्माण होणाऱ्या प्रश्नांना शांतपणे व संयमाने हाताळल्यास पुष्कळशा गोष्टी साध्य होऊ शकतील. प्रत्येक गोष्टींचा आस्वाद घेताना त्याचा अतिरेक होणार नाही याची दक्षता घ्या. नको त्या प्रलोभनात अडकू नका. नोकरदारांना व व्यावसायिक क्षेत्राला चांगला काळ राहील. हितशत्रूंची चिंता करण्याचे कारण नाही, ते गप्प बसतील. आपण आपला आत्मविश्वास वाढविण्याचा प्रयत्न केल्यास पुष्कळशा गोष्टी साध्य करता येणे शक्य आहे. आर्थिक व्यवहारात सावधानता बाळगा. सध्या मोठी गुंतवणूक टाळावीत. साहसी कृत्ये कटाक्षाने टाळावीत. विरोधकांच्या हालचालींवर कडक नजर ठेवावी, त्यांना संधी मिळणार नाही याची दक्षता घ्या. **महिलांना :** आपल्या कामाचे कौतुक केले जाईल, पण अहंकारापासून दूर राहणेच योग्य ठरेल. काम करताना थोडी विश्रांती ही गरजेची आहे. गोडधोडाचा बेत केला जाईल. आपल्या मनातील गुपित आपल्या विश्वासाच्या व्यक्तीव्यतिरिक्त कुणास कळू देऊ नका. **शुभ दिनांक –** ०४,०८



# अवकाळीने घास हिसकावला

। महाड । प्रतिनिधी । मागील दोन आठवड्यापासून अवकाळी पावसामुळे जिल्ह्यातील भात शेती धोक्यात आली असून ९७६ गावातील. २ हजार ८०७.५२ हेक्टर क्षेत्रावरील भात शेतीचे नुकसान झाले आहे. कृषी व महसूल विभागाकडून शेतीचे नुकसानीचे पंचनामे चालू झाले असली तरी नक्की मदत कधी मिळणार अशी विचारणा होत आहे. हातात तोंडशी आलेला घास अवकाळी पावसाने हिरावून गेल्याने शेतकरी हवालदिल झाल्याचे चित्र जिल्ह्यात पाहण्यास मिळत आहे. भारताचे कोठार म्हणून गणल्या जाणाऱ्या जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे.

हातातोंडाशी आलेला घास अवकाळी पावसाने हिरावून नेल्याने वर्षभर काय करायचे या विवांचने जिल्ह्यातील शेतकरी असून शासनाने पंचनामे जरी चालू केले असले तरी नेमकी किती नुकसान भरपाई मिळणार याबाबत कोणतेही स्पष्टता नसल्याने शेतीवर झालेल्या खर्चाच्या पोटी शासनाकडून मिळणारी मदत ही तोंडाला पाणी पुसणारीच असणार असल्याचे शेतकरी वर्गातून बोलले जात आहे. जिल्ह्यात कृषी विभागामार्फत १ ऑक्टोबर पासून २६. ऑक्टोबर पर्यंत झालेल्या मोसमी पावसामुळे जिल्ह्यातील १५ तालुक्यातील ९७६. गावातील ८७१६. शेतकरी आतापर्यंत झालेल्या पंचनाम्यात बाधित असून जिल्ह्यातील दोन हजार ८०७.५२ हेक्टर क्षेत्र बाधित असल्याचे आतापर्यंत केलेल्या पंचनाम्यात स्पष्ट झाले आहे.

अवकाळी पावसाने नुकसान झाले असताना देखील शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन प्रत्यक्ष शेतकऱ्यांचे कसे नुकसान झाले आहे याचा पाहणी एकही लोकप्रतिनिधी करताना दिसत नाही. यामुळे शेतकरी वर्गातून तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे.

ओल्या दुष्काळाची मागणी जिल्ह्यासह कोकणात अवकाळी पावसाने धुमाकूळ माजवला असून संपूर्ण भात शेती बरोबर नाचणी व वरी या पिकांचे देखील मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे शासनाने सरसकट शेतीचे नुकसान धरून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना ओला दुष्काळ म्हणून नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे.

# वंदे मातरम गीताचा शतकोत्तर सुवर्णमहोत्सवाचे आयोजन

। पोलादपूर । प्रतिनिधी । वंदे मातरम गीताला दि.७ नोव्हेंबर रोजी शतकोत्तर सुवर्णमहोत्सवी वर्ष पूर्ण होत असल्याने देशव्यापी उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. याअंतर्गत राज्यसरकारनेही शासननिर्णय काढून जिल्हास्तरीय आणि तालुकास्तरीय समितीचे गठन करण्यासंदर्भात आदेश दिले आहेत. याअनुषंगाने पोलादपूर तालुकास्तरीय समिती गठित करण्यात आल्याचे समितीसचिव नरवीर तानाजी मालुसरे शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या प्राचार्य चारुलता बढीये यांनी कळविले आहे. तालुकास्तरीय समितीच्या अध्यक्षपदी कपिल घोरपडे असून गटविकास अधिकारी, कौशल्य विकास सहायक आयुक्त, गटशिक्षण अधिकारी, जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळाचे प्राधिकृत प्रशिक्षण संस्था प्रतिनिधी, स्थानिक पोलीस ठाण्याचे अधिकारी, शिक्षण संस्था प्रतिनिधी, एक संत, एक साहित्यिक, एक पत्रकार, दोन गड किल्ले संवर्धन समिती सदस्य, उद्योजक, महिला बचतगट प्रमुख, तीन स्वयंसेवी संस्थांचे प्रमुख, संबंधित औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य, अशी तालुकास्तरीय रचना आहे.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकार यांनी मौजे दहिवली तर्फे नीड, ता.कर्जत, जि.रायगड येथील खालील वर्णनाच्या मिळकतीचे मालक श्रीमती. मरीना जॉर्नीना पिंटो व श्री. फिलीक्स पिंटो यांचेकडून बिनशेती मिळकत विकत घेणेचे ठरविले आहे.

| सर्व्हे नंबर | क्षेत्रफळ चौ.मी | आकार रु. पै. |
|---|---|---|
| १३५/२/२ | ४०१-७५ | ८-०४ |

सबब सदर व्यवहाराबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झाले पासून १० दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकत हि निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून वरील मिळकतीचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक :- ०२/११/२०२५

ॲड. समीर आर.सावंत
बी.कॉम.एल.एल.बी.
पत्ता -गाळा नं.०९,कोर्ट व्हयू बिल्डींग,
तळ मजला, दिवाणी व फौजदारी
न्यायालयासमोर, कर्जत,
ता.कर्जत, जि. रायगड
मो.नं ९१५८३१३७३३

## जाहिर नोटीस

दिवाणी प्रक्रिया संहिता ऑ. १ रूल ८ नुसार
वादीतर्फे वकील - श्री. अमित म. देशमुख
रे मु.नं.१५१/२०२५

**अलिबाग येथील मे. दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर सो. यांचे न्यायालयात**

१) श्री बृहस्पती मोहन धुमाळ
२) श्री मृणाल घनश्याम धुमाळ
३) श्री.घनश्याम बाळाराम धुमाळ — वादी
४) श्री.गणेश प्रकाश टेके
५) श्री.नितीन पांडुरंग शेळके
सर्व राहाणार शहाबाज,
ता.अलिबाग, जि. रायगड.

विरूद्ध

१) श्री.समिर यशवंत पाटील
२) श्री.रोशन यशवंत पाटील
३) सुशीला यशवंत पाटील
४) श्री.दिलीप हरिश्चंद्र पाटील — प्रतिवादी
सर्व राहाणार शहाबाज़,
ता.अलिबाग, जि.रायगड.

सर्व लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळवण्यात येते की, वरील वादी यांनी मे. न्यायालयात सदरचा दावा प्रतीवादींचे विरूध्द ठरावाकरता, निरंतर व तुर्तातुर्त ताकिदीकरीता दाखल केलेला आहे. सदरचा दावा वादीने प्रतिनिधीक स्वरूपाचा दाखल केलेला असुन प्रतिवादी नं. १ ते ४ यांनी मौजे शहाबाज, ता. अलिबाग, जिल्हा रायगड येथील सि.स.नं. २६३, २६७, २६८, २७० या मिळकतीची प्रतिवादी यांनी स्वखर्चाने शासकीय मोजणी करून त्यांची हद्द निश्चीत करण्याबाबत मॅडेटरी आदेश प्रतिवादींचे विरूध्द व्हावेत. प्रतिवादी यांनी स्वत: अगर त्यांचे वालीवारस, असानीज, ॲडमिनीस्ट्रेटर्स, ॲटर्नीज ठेकेदार, मजुर यांचेमार्फत दाव्याचा विषय असलेल्या मौजे शहाबाज, ता. अलिबाग येथील येथील सि.स.नं. २२८, २२६, २३१, २३२, २३३ या मिळकतींचे पूर्वदिशेला आणि सि.स.नं. २७०, २६८, २६७, २६३ या मिळकतींचे पश्चिम दिशेला असलेला रहदारीचा पूर्वापार रस्त्याची रूंदी कमी होईल, बंद होईल असे कृत्य करू नये व वादींचे रहदारीस कोणत्याही प्रकारे अडथळा करू नये असा निरंतर ताकिदीचा आदेश व्हावा व इतर अनुशंगिक मागण्या सदर दाव्यामध्ये केल्या आहेत.

सदरहु दाव्याचे कामी कोणासही वादीपणात अथवा प्रतिवादीपणात सामील व्हायची इच्छा असल्यास त्याने मे. तिसरे दिवाणी न्यायाधिश व. स्तर सो. अलिबाग यांचे न्यायालयात दि. ७/११/२०२५ रोजी स्वतः किंवा त्यांचे वकिलांमार्फत हजर राहावे व तसा अर्ज मे. कोर्टात दाखल करावा.

आज दि. २९.१०.२०२५ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्याने दिली.

सही/-
व.लि.
दि. न्या. व. स्तर अलिबाग

सही/-
अधिक्षक
दि. न्या. व. स्तर अलिबाग

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल हे खालील वर्णनाच्या शेत मिळकती मिळकतींचे विद्यमान मालकांकडून कायम खरेदी करणार असून, तशी बोलणी आमचे अशिल व मिळकतींचे मालक यांचेमध्ये सुरू आहे.

मिळकत मालकांनी सदरहु मिळकती अन्य कुणासही भाडेकरार, साठेकरार, फरोक्त, वारसा, गहाण, दान, बक्षीस, वहीवाट पोटगी, मृत्यूपत्रान्वये अथवा अन्य हक्काने दिलेल्या नसल्याची आमचे अशिलांस खात्री दिली असून सदरहु मिळकतींचे मालकी हक्काबाबत कोणाचीही हरकत, तक्रार, हक्क अधिकार असल्यास अशा व्यक्तींनी त्यांच्या लेखी हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ (चौदा) दिवसांचे आत कळवाव्यात. सदर मुदतीमध्ये कोणाचीही हरकत प्राप्त न झाल्यास मिळकती निर्वेध आहेत असे समजून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून आलेल्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

**परिशिष्ट १**
**मिळकतींचे वर्णन**
**मौजे-हरनेरी, ता. सुधागड, जि. रायगड**

| मिळकत मालक | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर. | आकार रू.पैसे |
|---|---|---|---|---|
| गौरव मोहन ओसवाल | १८ | १ | ०-२०-०० | ०.१४ |
| देवाशिष विनोद पडवळ | १८ | १ | ०-२०-०० | ०.१४ |
| गौरव मोहन ओसवाल | १८ | २ | ०-२०-०० | ०.१४ |
| देवाशिष विनोद पडवळ | १८ | २ | ०-२०-०० | ०.१४ |
| गौरव मोहन ओसवाल | १८ | ३ | ०-६७-०० | ०.४५ |
| देवाशिष विनोद पडवळ | १८ | ३ | ०-६७-०० | ०.४० |
| गौरव मोहन ओसवाल | १८ | ५ | ०-४६-५० | ०.०२ |
| देवाशिष विनोद पडवळ | १८ | ५ | ०-४६-५० | ०.२७ |
| गौरव मोहन ओसवाल | १८ | ८ | ०-४०-५० | ०.२५ |
| देवाशिष विनोद पडवळ | १८ | ८ | ०-४०-५० | ०.२५ |
| गौरव मोहन ओसवाल | १८ | ९ | ०-४०-५० | ०.२५ |
| देवाशिष विनोद पडवळ | १८ | ९ | ०-४०-५० | ०.२५ |
| गौरव मोहन ओसवाल | १८ | १० | ०-४०-५० | ०.२५ |
| देवाशिष विनोद पडवळ | १८ | १० | ०-४०-५० | ०.२५ |
| गौरव मोहन ओसवाल | १८ | ११ | ०-४०-५० | ०.२५ |
| देवाशिष विनोद पडवळ | १८ | ११ | ०-४०-५० | ०.२५ |
| गौरव मोहन ओसवाल | १८ | १२ | ०-४०-५० | ०.२५ |
| देवाशिष विनोद पडवळ | १८ | १२ | ०-४०-५० | ०.२५ |
| गौरव मोहन ओसवाल | १९ | ६ | ०-५२-५० | ०.२६ |
| देवाशिष विनोद पडवळ | १९ | ६ | ०-५२-५० | ०.१८ |
| गौरव मोहन ओसवाल | १९ | १०/१ | १-६४-०० | १.०७ |
| देवाशिष विनोद पडवळ | १९ | १०/१ | १-६४-०० | ०.८३ |
| गौरव मोहन ओसवाल | १९ | १०/२ | ०-७६-५० | ०.४० |
| देवाशिष विनोद पडवळ | १९ | १०/२ | ०-७६-५० | ०.३९ |
| गौरव मोहन ओसवाल | १९ | १३/अ | ०-८५-५० | ०.४८ |
| देवाशिष विनोद पडवळ | १९ | १३/अ | ०-८५-५० | ०.१५ |
| गौरव मोहन ओसवाल | १९ | १४ | ०-२४-५० | ०.१२ |
| देवाशिष विनोद पडवळ | १९ | १४ | ०-२४-५० | ०.०३ |
| गौरव मोहन ओसवाल व १ | ३० | १ | ०-१४-६० | ०.०५ |
| गौरव मोहन ओसवाल व १ | ३२ | ३ | ०-४४-५० | ७.८१ |

पाली
दिनांक : ०२/११/२०२५

सही /-
नितीन मोरेश्वर शेवाळे
ॲडव्होकेट
संतकृपा, मु. पो. पाली
ता.सुधागड, जि.रायगड पिन ४१०२०५
मोबा नं. ९०२८७२३८७३

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे जांमरुंग, ता.कर्जत, जि.रायगड येथील खालील वर्णनाची जमीन मिळकत तिचे मालक श्री. विजय कानडे यांजकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविले आहे :-

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्रफळ (हे.आर) | आकार (रू. पै.) |
|---|---|---|---|
| १४६ | ४/अ | ०-३२-५० | १=६० |

वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा साठे करार, ताबा कब्जा, कुळवहीवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, फरोक्त, चार्ज, लिज, अटॅचमेंट, वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास आणि त्याची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हांस ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसांत लेखी पुराव्यासह खाली नमूद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्कहितसंबंध नाही. असे समजण्यात येवून आमचे अशिल वरील मिळकतीच्या खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

दिनांक : ०१/११/२०२५

ॲड. महेश मोतीराम घारे
मु. सांगवी, ता. कर्जत, जि. रायगड
मो. ९८८१८५८६५४
E Mail - advmaheshghare@gmail.com

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे धोकवडे ता.अलिबाग, जि.रायगड येथील खालील वर्णनाची भातशेती मिळकत, त्या मिळकतीच्या विद्यमान मालक श्रीमती पुष्पा सहदेव गावंड, यांच्याकडून आमच्या अशिलांनी कायमस्वरूपी खरेदी करण्याचे ठरविले आहे. तसा साठेकरारदेखील उभयपक्षीयांमध्ये स्वाक्षरीत झालेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नं. | क्षेत्र (हे.आर) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| धोकवडे | ८७४ | ०-३५-२० | ३.२५ |
| | | पो.ख ०-०१-५० | |
| | | ०-३६-७० | |

सदरची मिळकत ही त्यांचे निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून ती विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क, अदलाबदल, कुळवहिवाट, कसवणुक या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध असल्यास अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरूपात आणून द्याव्यात. मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडून दिला आहे, तसेच सदर मिळकत खरेदी घेणेस योग्य आहे, असे गृहित धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणाऱ्या तक्रारी अगर हरकती आमचे अशिलांवर कोणत्याही व कसल्याही प्रकारे बंधनकारक राहणार नाहीत व सदर हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत. तसेच संबंधितांनी आपापल्या तथाकथित हरकती, तक्रारी कायमच्या सोडुन दिल्या आहेत, असे समजणेत येईल, हे सर्वांस कळावे.

ता. २/११/२०२५

सही /-
ॲड. माधवी नारायण ठाकूर.
सी-३०१, 'क्लिफ हेवन'
को.ऑप.हा.सोसायटी,
स्टेट बँक ऑफ इंडियाच्या बाजूला,
कोर्ट रोड, अलिबाग, रायगड, ४०२ २०१.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे दहिगाव, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची जमीन मिळकत तिचे मालक श्रीम. सुनिता हरिश्चंद्र कराळे यांजकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविले आहे :-

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्रफळ (हे. आर) | आकार (रू. पै.) |
|---|---|---|---|
| २८ | ३ | ०-०७-३० | ०=०५ |

वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा साठेकरार, ताबा कब्जा, कुळवहीवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, फरोक्त, चार्ज, लिज, अटॅचमेंट, वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास आणि त्याची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हांस ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसांत लेखी पुराव्यासह खाली नमूद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्कहितसंबंध नाही. असे समजण्यात येवून आमचे अशिल वरील मिळकतीच्या खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

दिनांक : ०१/११/२०२५

ॲड. महेश मोतीराम घारे
मु. सांगवी, ता. कर्जत, जि. रायगड
मो. ९८८१८५८६५४/९२७१८६९२०२

दिनांक : ०१/११/२०२५

## नोटीस

सर्व जनतेस या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालीप्रमाणे नमुद मौजे चिकणी, ता.मुरूड, जि. रायगड येथील मिळकत आमचे अशिल यांनी विद्यमान मालक श्री. सुभाष दामोदर मोहिते व श्री. संकेत सुभाष मोहिते, यांचेकडून कायमस्वरूपी खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदरहू मिळकत ही निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीच्या विद्यमान मालकांनी दिलेला असला तरी, या खरेदी-विक्री व्यवहाराबाबत कोणाचीही कोणतीही हर हरकत दावा, लिज, पोटगी, बक्षिसपत्र, मृत्युपत्र, तारण, ताबा/गहाण इ. स्वरूपाचे हक्क व हितसंबंध असल्यास ते योग्य त्या लेखी पुराव्यासह निम्न स्वाक्षांकीत खरेदीदार यांच्या वकीलांकडे ही जाहिर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत कळवावे. मुदतीत हरकत न आल्यास सदरहू मिळकत ही निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल खरेदी व्यवहार पूर्ण करतील व तदनंतर येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही व अशा हरकतींचा विचार केला जाणार नाही व अशा हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत हे सर्वांस कळावे.

**मौजे चिकणी, ता. मुरुड, जि. रायगड**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्रफळ (हे.आर.) | आकार (रू.पैसे) |
|---|---|---|---|
| चिकणी ता.मुरूड | १२/१/अ | ०-१९-००<br>पो.ख. ०-०१-५०<br>एकूण क्षेत्र ०-२०-५० | ४.६२ |

दिनांक : ०१/११/२०२५
अशिलांची सही

ॲड. समीर सुरेश नाईक
जिल्हा न्यायालय रायगड-अलिबाग
ऑफिस पत्ता : फ्लॅट नं.१०३, पहिला मजला,
बी विंग, मोरेश्वर अपार्टमेंट
जे.एस.एम कॉलेज जवळ, अलिबाग-रायगड
मोबा. ९७६७०१०९०२

## जाहीर नोटीस

सर्व जनतेस कळविण्यात येते की, आमच्या अशिलांनी मौजे वरसोली, ता. अलिबाग जि. रायगड येथील खालील वर्णन केलेली बिनशेती मिळकत, मिळकतीचे विद्यमान मालक १. प्रियांका प्रितम लोटणकर, २. प्रितम केशव लोटणकर रा. ३ बी, ६०३, उमियानगर, विश्वेश्वर रोड, गोरेगांव (ईस्ट) मुंबई ४०००६३, यांच्याकडून विकत घेण्याचे ठरविले आहे. तसा करार आमचे अशिल व विद्यमान मालक यांच्यामध्ये झालेला आहे. सदरची मिळकत निर्वेध व बोजाविरहित असल्याचा भरवसा आमचे अशिलांस विद्यमान मालकांनी दिलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (आर.चौ.मी) | आकार (रु.पैसे) |
|---|---|---|---|
| वरसोली, ता.अलिबाग, जि.रायगड | १८४/४/ब/३/४ | ३-००-०० | ३०-०० |

तरी वरील मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, लीज, फरोक्त, साठेकरार, कोर्टात दावा, मृत्यूपत्र, वारसा हक्क, वहिवाटीचे जाण्यायेण्याचा मार्ग आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ दिवसांच्या मुदतीत खालील सही करणार खरेदीदारांतर्फे ॲडव्होकेट यांजकडे लेखी कळवावी. येणेप्रमाणे विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
दि. ०२.११.२०२५

ॲड. मच्छिंद्र एस. म्हात्रे
शॉप नं.२, दुय्यम निबंधक
कार्यालय अलिबागच्या समोर
अलिबाग, जि. रायगड

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल अनिल उद्धव आवळकर वरील वर्णनाची बिनशेती मिळकत कायमस्वरूपी खरेदीखताने विकण्याचे ठरविले आहे. तीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**जमिन मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र | आकार |
|---|---|---|---|
| वरसोली | ३१/२/९ | २.८०.०० | २८.०० |

**सदर मिळकतीच्या चतुः सिमा :-**
पूर्वेस : सर्वे नं. ३१ पैकी मिळकत
पश्चिमेस : याच प्लॉटींगचा अंतर्गत रस्ता
दक्षिणेस : माणिक मकरंद पातपवार यांची मिळकत.
उत्तरेस : स्वप्निला श्रीकांत शेरे यांची मिळकत.

वरिल वर्णनाचे मिळकतीचे बाबत कोणा व्यक्तीचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध दान, गहाण, बोजा, लीज, फरोक्तखत असल्यास तसेच त्यांची मूळ मालकांबरोबरच्या व्यवहारास हरकत असल्यास संबंधीत इसमांनी अगर संस्थांनी सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांचे आत लेखी स्वरूपात व पुराव्यासह खालील सही करणार यांचेकडे त्यांचे नमूद पत्त्यावर कळवावी.

वरिल मुदतीत कोणीही कसल्याही प्रकारची हरकत खालील सही करणार यांचेकडे लेखी स्वरूपात न कळविल्यास वरिल वर्णनाचे मिळकतीशी कोणीही व्यक्ती अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क अगर हितसंबंध नाही, तसेच आमचे अशिलांना विक्री व्यवहारास कोणत्याही प्रकारची हरकत नाही व असल्यास ती त्यांनी सोडून दिली आहे, असे समजण्यात येवून आमचे अशिल वरील वर्णनाच्या मिळकतीचा विक्री व्यवहार पूर्ण करेन व व्यवहारानंतर कोणी कुठल्या प्रकारची हरकत घेतल्यास ती आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाही.
कळावे.

दि. ३१/१०/२०२५

सही/-
सौ. मानसी संतोष म्हात्रे
ॲडव्होकेट
''देवगिरी'', कामत आळी,
अलिबाग रायगड.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली रापड जमिन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकाकडून आमचे अशिल इनामुल्लाह फैजुल्लाह चौधरी यांनी कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन २१ (एकवीस) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचाही हरकत न आल्यास आमचे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या रापड जमिन मिळकत मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**मौजे :- शेलु, ता. कर्जत, जि. रायगड येथील मिळकत :-**

| मालकांचे नाव | स.नं./ हिस्सा नं. | क्षेत्रः हे.आर.प्रति | आकार |
|---|---|---|---|
| गुरूनाथ सदानंद मसणे | १५/१ | ०-१४-९०<br>पोटखराबा ०-००-८०<br>०-१५-७०<br>या मिळकतीपैकी जमीन मालक यांनी विकसनासाठी दिलेले क्षेत्र वगळुन उर्वरीत क्षेत्राची जाहीर पेपर नोटीस | ०.८७ |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

कार्यालयीन पत्ता सदनिका क्रं.१०८.
पहिला मजला, विंग बी. लक्ष्मी अपार्टमेंट
बांधिवली, ता. कर्जत, जि. रायगड.
ठिकाण: कर्जत

सही/-
ॲड.सुर्यकांत भाऊ मसणे,
दिनांक : ०२/११/२०२५
मो.नं. ९९२२१५५१५३

## जाहीर प्रकटन

ज्याअर्थी खराब रस्ते व रस्त्यांवरील खड्डे यांमुळे होणारे अपघात व मृत्यू याबाबत मा. मुंबई उच्च न्यायालयात जनहित याचिका क्र.७१/२०१३ ची सुनावणी दि. १३/१०/२०२५ रोजी संपन्न झाली असून, सदर सुनावणी दरम्यान मा. उच्च न्यायालयाने आदेश पारित केले आहेत. त्यानुसार नगरपरिषद क्षेत्रात रस्त्यांवरील खड्ड्यांबाबत प्राप्त होणाऱ्या तक्रारींवर कार्यवाही करण्यासाठी तत्तेम खड्ड्यांमुळे मृत्युमुखी अथवा अपघातग्रस्त नागरिकांना नुकसान भरपाई देणेबाबत कार्यवाही करण्याच्या दृष्टीने समितीची स्थापना करणेबाबत निर्देश दिले आहेत. त्यानुसार अलिबाग नगरपरिषद, अलिबाग, जि. रायगड हद्दीतील नगरपरिषद मालकीचे व अखत्यारीत रस्त्यावरील खड्ड्यांमुळे मृत्युमुखी पडलेल्या अथवा अपघातग्रस्त नागरिकांना नुकसान भरपाई देणेबाबत कार्यवाही करण्याच्या दृष्टीने जनहित याचिका क्र.७१/२०१३ च्या अनुषंगाने मा. मुंबई उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशांनुसार खालील प्रमाणे समिती गठीत करण्यात आली आहे.

| अ.क्र. | पदनाम | पद |
|---|---|---|
| १ | मुख्याधिकारी, अलिबाग नगरपरिषद, अलिबाग | सदस्य |
| २ | सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, रायगड अलिबाग | सदस्य |

तरी अलिबाग नगरपरिषद, जि. रायगड हद्दीतील नगरपरिषद मालकीचे व अखत्यारीत रस्त्यावरील खड्ड्यांबाबत अलिबाग नगरपरिषद कार्यालयात तसेच nagarparishadalibag@gmail.com या ई-मेल आयडीवर तक्रार दाखल करता येईल.

सही/-
मुख्याधिकारी,
अलिबाग नगरपरिषद.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस कळविण्यात येते की, माझे अशिल बाफणा होम्स तर्फे भागीदार सौ.लिना विशाल बाफणा रा. महावीर मार्ग, बाजारपेठ, पेण, तालुका-पेण, जिल्हा- रायगड यांनी खालील वर्णनाची बिनशेती भुखंड मिळकत सदर जमिनीचे विद्यमान मालकांकडून रजिस्टर्ड विकसन कराराने विकसित करण्यास घेण्याचे ठरविले आहे.

मिळकतीचे वर्णन - जिल्हा रायगड, पोट तुकडी पेण, जिल्हा परिषद रायगड, पंचायत समिती पेण, नगर परिषद पेण, तलाठी सजा-पेण, मे. दुय्यम निबंधक पेण यांचे कार्यक्षेत्रातील मौजे-पेण ग्रामीण (कापुर बाग) येथील बिनशेती भुखंड मिळकतीचे ७/१२ वरुन वर्णन खालील प्रमाणे -

| जमिन मालक | सर्व्हे गट क्र. | क्षेत्र आर.चौ.मी. | आकार रू.पैसे |
|---|---|---|---|
| मंगेश विठ्ठल चव्हाण<br>नंदकुमार विठ्ठल चव्हाण<br>कांचन रुपेश कदम<br>प्रितम प्रदीप चव्हाण<br>आकाश प्रदीप चव्हाण<br>जुईली राहुल मोरे | २७०/१ | ३२-४०--० | ४९२४-८० |

सदरची बिनशेती भुखंड मिळकत ही या जाहीर नोटीसीचा विषय आहे.

तरी वरील मिळकती संदर्भात जर कोणाचा साठेकरार, गहाण, दान, जप्ती, लिन, लीज, चार्ज, जामिनकी, कब्जा, वारसाहक्क अगर कायदेशीर हित संबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह ही नोटीस प्रसिद्ध झाले दिवशी पासून २१ (एकविस) दिवसांचे आंत खाली सही करणार ॲडव्होकेट यांचे पत्त्यावर रजिस्टर्ड पोस्टाने कळवाव्यात.

जर सदर जाहीर नोटीसीस वरील मुदतीत कोणाचीही लेखी हर-हरकत न आल्यास सदरची बिनशेती भुखंड मिळकत ही निर्वेध व बोजा विरहित आहे असे समजुन माझे अशिल विद्यमान मालकांबरोबर रजिस्टर्ड विकसन करार करतील व वरील मुदती नंतर येणारी कोणतीही हरकत ही माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

पेण- रायगड.
दि. ०२/११/२०२५.

सही/-
ॲड. संजय भास्कर पाटील.
परमार प्लाझा, शॉप नं. १६.
तळ मजला. शिवाजी पथ,
पेण- रायगड. ४०२१०७.
मोबा. ९८८१९१५२१९.

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

\- मुख्य संपादक

## ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५

## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- सहारा ट्रॅव्हल्स अलिबागमध्ये स्थानिक ड्रायव्हर पाहिजे. वय २५ ते ४५ संपर्क :९२७०५६०४५६
- अलिबागमध्ये दुकानात कामासाठी मुलगा पाहिजे. संपर्क- ७९७२९३३७०, ९८२२४६१७६१
- अलिबागमधील नामांकित हॉस्पिटलसाठी नर्स, वॉर्डबॉय, बहुउद्देशीय कार्यकारी महिला पाहिजेत. मो. ९९२३५०६७७९/८३९०४५५५६५/७५०६३२९९११
- अकाउंटट पाहिजे- पात्रता B com, Tally अनुभव ५ वर्षे ठिकाण- बामणसुरे, चोंढी, पगार - २५००० महिना Contanct - 9823585321

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१




## राशीभविष्य

- **मेष** : प्रक्रिया उद्योगात अनुकूलता राहील. कौटुंबिक मतभेद वेळीच टाळावे. आर्थिक बाबतीत ताण राहील.
- **वृषभ** : मनाविरूध्द घटना संभवतात. भागीदारी व्यवसायात काळजी घ्यावी. मुलांची चिंता वाटत राहील.
- **मिथुन** : दिवसाची सुरूवात उत्साहात होईल. महत्त्वाच्या भेटी होतील. उपजत कला-गुणांचा विकास होईल.
- **कर्क** : व्यावसायिक पातळीवर यश मिळेल. दूरच्या प्रवासाचे बेत आखाल. हातून एखादं चांगलं कार्य घडेल.
- **सिंह** : भाग्य वृद्धिंगत करणाऱ्या घटना घडतील. हितशत्रूंच्या कारवायांवर मात कराल. प्रगती साधता येईल.
- **कन्या** : व्यावसायिक वाटाघाटी विचारानं कराव्या. आर्थिक बाबतीत फसवणूक संभवते. विचारानं रहावं.
- **तूळ** : महत्त्वाच्या भेटी लांबणीवर पडतील. गेलेल्या संधी पुन्हा लाभतील. सरकारी काम विलंबानं होतील.
- **वृश्चिक** : परिश्रम, चिकाटी कायम ठेवावी. अपेक्षित ध्येयपूर्तीचं समाधान लाभेल. उसनवारी टाळायला हवी.
- **धनु** : कौटुंबिक मतभेद संभवतात. नेत्रविकाराबाबत काळजी घ्या. प्रवास लांबणीवर टाकावेत.
- **मकर** : अप्रिय घटनांनी चिंता वाढीस लागेल. विवाहाची बोलणी लांबणीवर पडतील. विद्यार्थ्यांना यश मिळेल.
- **कुंभ** : जमा-खर्चाचा योग्य ताळमेळ घालावा. महत्त्वाच्या प्रयत्नात अडचणी येतील. प्रकृतीची काळजी घ्या.
- **मीन** : कार्याचं योग्य मोल मिळेल. वरिष्ठांची मर्जी राहील. रक्तदाबाच्या विकाराबाबत काळजी घ्यावी.

ब्युटी सिक्रेट्स

## ‘क’ जीवनसत्त्वयुक्त फेस पॅक

हिवाळ्यात त्वचेची जरा जास्तच काळजी घ्यावी लागते. या दिवसात विविध मॉईश्चरायझर्स आणि कोल्ड क्रीमचा वापर आपण करतो. यासोबतच ‘क’ जीवनसत्त्वाने युक्त असे फेस पॅक त्वचेला आवश्यक ते पोषण देतात. हे फेस पॅक तुम्ही घरच्या घरी तयार करू शकता. दिवाळी पार्टीला जाताना किंवा कोणत्याही समारंभाआधी तुम्ही हे फेस पॅक लावू शकता. यामुळे तुमचा चेहरा खुलेल. शिवाय थंडीच्या दृष्टीने त्वचेचा बचावही होईल.

* संत्र्यामध्ये ‘क’ जीवनसत्त्व असतं. संत्र्याच्या गराप्रमाणे त्याची सालंही खूप उपयुक्त असतात. या सालींपासून आपण फेस पॅक बनवू शकतो. यासाठी संत्र्याच्या साली उन्हात वाळवून घ्या. त्याची पूड करून घ्या. फेस पॅक बनवण्यासाठी चमचाभर पूड घ्या. त्यात दोन मोठे चमचे दही किंवा दूध घाला. तेलकट त्वचा असेल तर दही घाला. कोरडी त्वचा असल्यास दूध घाला. आता हा पॅक चेहरा आणि मानेवर लावा. वाळल्यावर धुवून टाका. हा पॅक तुम्ही दररोज वापरू शकता. (क्रमश:)

## २ नोव्हेंबर

दिनविशेष

- १९५० : आयरिश लेखक जॉर्ज बर्नार्ड शॉ यांचं निधन.
- १९६५ : अभिनेता शाहरुख खान याचा जन्म.
- १९८१ : पाकिस्तानी क्रिकेटपटू इरफान फझील याचा जन्म.
- १९९० : गरवारे उद्योग समुहाचे संस्थापक आबासाहेब गरवारे यांचं निधन.
- २००० : आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकात पहिले रहिवासी पोहोचले.
- २०१४ : अमेरिकन गायक, गीतकार मायकेल कोलमन यांचं निधन.

फन टाईम

## स्टिपलचेज आणि ट्रॅम्पोलिन

स्टिपलचेज म्हणजे एकप्रकारची अडथळ्यांची शर्यत. या खेळाचा उगम आयर्लंडचा. ऑलिम्पिकमध्ये ३००० मीटर स्टिपलचेज स्पर्धेचं आयोजन केलं जातं. ऑलिम्पिकमधली ही सर्वात लांब अंतराची क्रीडास्पर्धा आहे. यात अडथळ्यांवरून उड्या मारून स्पर्धकांना धावायचं असतं. स्टिपलचेजमध्ये स्पर्धकांना पाण्यातूनही धावायचं असतं. ३००० मीटर स्टिपलचेजमध्ये २८ अडथळे असतात. तर सातवेळा पाण्यातून धावायचं असतं. २००० मीटर स्टिपलचेज स्पर्धेत १८ अडथळे आणि पाचवेळा पाण्यातून धावायचं असतं. २००८ च्या बीजिंग ऑलिम्पिकपासून महिलांसाठीची ३००० मीटर स्टिपलचेज स्पर्धा सुरू झाली.

ट्रॅम्पोलिन हा क्रीडाप्रकार जिमनॅस्टिक्सचा एक भाग आहे. हा अत्यंत धोकादायक असा क्रीडाप्रकार आहे. यात तुम्हाला हवेत उडावं लागतं. २००० सालच्या सिडनी ऑलिम्पिकमध्ये ट्रॅम्पोलिनचा पहिल्यांदा समावेश करण्यात आला. त्यानंतर कॅनडाच्या खेळाडूंनी या क्रीडाप्रकारावर वर्चस्व गाजवलं. त्यानंतर आजवरच्या ऑलिम्पिकमध्ये ट्रॅम्पोलिनमध्ये कॅनडाच्या पुरूषांना दोन पदकं मिळाली आहेत. तर महिलांनी चार पदकं पटकावली आहेत.

### पंचांग

**रविवार २ नोव्हेंबर २०२५**
विश्वावसूनाम संवत्सर, शके १९४७, कार्तिक शुद्ध ११/१२, चंद्रराशी : कुंभ, नक्षत्र : पू. भाद्रपदा, योग : व्याघात, सूर्योदय ६.४१, सूर्यास्त ६.०३

### फॉरवर्डस

**वक़्त सें आँख मिलानें क़ी हिमाक़त ना कऱ ...**

**वक़्त इन्सान क़ो नीलाम भीं क़र देता हैं...!**

आरोग्यमंत्र

## पांढरं विष... मैदा

खरं म्हणजे मैदा गव्हापासूनच तयार केला जातो; पण त्यावर प्रक्रिया केली जाते. या प्रक्रियेदरम्यान गव्हातील सर्व पोषक तत्त्वं निघून जातात. साठवण क्षमता वाढवण्यासाठी मैद्यापासून तयार केलेल्या बहुतेक पदार्थांमध्ये रसायनांचा वापर केला जातो. उदाहरणार्थ, बहुतेक सर्व बेकरी उत्पादनं मैद्यापासून तयार केली जातात किंवा हॉटेलमध्ये मिळणाऱ्या रोटीमध्येदेखील मैद्याचं प्रमाण अधिक असतं. यांच्या सेवनानं शरीराचं मोठं नुकसान होतं. मैद्याला ‘ग्लू ऑफ गटस्’ म्हणतात. त्यात फायबर किंवा तंतुमय घटकांचे प्रमाण शून्य असतं. त्यामुळे पचनसंस्था मंदावते आणि पोट जड होतं.



पचन मंदावल्यामुळे चयापचयाच्या प्रक्रियेवर परिणाम होतो. भूक मंदावते. ॲसिडिटी, डोकेदुखी आणि मायग्रेनच्या समस्या निर्माण होतात. मैद्यामुळे रक्तातील वाईट कोलेस्टेरॉलची पातळी वाढते आणि मधुमेह, उच्च रक्तदाब यासारख्या आरोग्याच्या अनेक समस्या उत्पन्न होतात. कधी तरी बदल म्हणून कमी प्रमाणात मैद्याचे पदार्थ खायला हरकत नाही. पण अतिसेवन मात्र टाळायला हवं. त्याऐवजी आरोग्यदायी काही पर्याय निवडावेत. सामोसा करताना मैदाऐवजी कणकेचा वापर करावा. एक भाग गव्हाचं पीठ, एक भाग ज्वारीचं पीठ आणि एक भाग बाजरीचं पीठ एकत्र करून नान करावा. गव्हाच्या पीठाचा ब्रेड, नूडल्स आणि पास्ता, मॅक्रोनीचं सेवन करावं. हल्ली बाजारातही गव्हापासून केलेले हे सर्व पदार्थ मिळतात. त्यांचा वापर केला तर अनारोग्याचे संभाव्य धोके टाळता येतील.

### फिटनेस फंडा

कॉलेजचे दिवस हा आयुष्यातला जादुई काळ असतो. कॉलेजमध्ये भरपूर अभ्यास करावा लागतो. पण मित्रमंडळींसोबत मजाही करता येते. असाइनमेंट्स, प्रॅक्टिकल्स, परीक्षेचा ताण असतो. यासोबतच आपल्या कौशल्यांनाही इथे वाव मिळतो. अर्थात सगळा ताणतणाव आणि अभ्यासाचा विचार केला तर थोड्या प्रयत्नांनी तुम्ही या काळात फिटनेसही राखू शकता.

* पोटात फुगण्याची समस्या असेल तर थोड्या थोड्या वेळाने थोडं थोडं खा. दिवसभरात पाच ते सहा वेळा खा. दोन वेळच्या खाण्यात दोन तासांचं अंतर ठेवा. फार वेळ उपाशी राहू नका.

करिअरवाटा

## फॅशनविश्वात प्रवेश करताना...

फॅशन उद्योग हे एव्हरग्रीन विश्व आहे. या रंगीबेरंगी विश्वात चंचुप्रवेश करण्याचा सर्वात सुकर मार्ग म्हणजे चांगला पोर्टफोलिओ तयार करणं. पोर्टफोलिओ बोलका हवा. फॅशन, टेक्सटाईल डिझाईन, फोटोग्राफी, मॉडेलिंग, मेक अप पार्टीज किंवा विंडो डिस्प्ले डिझाईनमध्ये कारकिर्द घडवण्याची इच्छा असेल तर पोर्टफोलिओ उत्तम सजवा. फॅशनविषयी लिहिणाऱ्या लेखकांकडे तुमची माहिती पोहोचवा. रायटिंग सॅंपल्स पोर्टफोलिओला जोडा. यामध्ये तुमचे १२ ते १५ नमुने असायला हवेत. कारण एक-दोन नमुन्यावरून कामाची कल्पना येणार नाही. हे नमुने स्टायलिश आणि आकर्षक असल्याची खात्री करुन घ्या.



फोटोग्राफर असाल तर ब्लॅक अँड व्हाईटमधील कामाबरोबरच ब्राईट आणि रंगीत छायाचित्रणातील करामतीही दिसायला हव्यात. भविष्याचा अंदाज घेता लोक कुठलं डिझाईन पसंत करतील याचा विचार करुन स्केचेस अपडेट करा. तुमचा अर्जही तेवढाच आकर्षक असायला हवा. तुम्हीच संबंधित जॉबसाठी कसे योग्य आहात हे समोरच्या व्यक्तीच्या मनावर ठसवा. आपली उपयुक्तता सिद्ध करणं म्हणजेच स्वत:चं मार्केटिंग करण्यासारखं आहे. अर्थातच तुमचं व्यक्तिमत्त्वही साजेसं असायला हवं.

खेचाखेची

### डबल अपमान

**बायको** : तुम्ही लग्नाच्या आधी तुम्ही उपवास करत होता का
**नवरा** : नाही.
**बायको** : तरीच मी विचार करतेय, काही न करता तुम्हाला एवढी चांगली बायको कशी मिळाली
**नवरा** : काय गं, लग्नाच्या आधी तु १६ सोमवार करत होतीस. मग आता का बंद केले ?
**बायको** : काही नाही हो, तुमच्याशी लग्न झाले आणी माझा १६ सोमवार वरचा विश्वासच उडाला

### वेगळं काही

कॅनडामधल्या सेक्रे कोइर भागतलं जंगल अचानक श्वास घेऊ लागलं. झाडंझुडुपं हलू लागली. हे सगळं एका व्हिडिओमध्ये रेकॉर्ड झालं. जंगलाला अशाप्रकारे श्वास घेताना बघून सर्वांना आश्चर्याचा धक्काच बसला. जंगलाखालची जमीन हलत असल्याचं या व्हिडिओमध्ये दिसून येत आहे. यामुळे झालं श्वास घेत असल्याचा भास आपल्याला होतो. हा व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर शास्त्रज्ञांची टीम याठिकाणी रवाना झाली. त्यांनी शोध घेतला. त्यांच्या असं लक्षात आलं की सोसाट्याच्या वाऱ्यामुळे जंगल श्वास घेत असल्याचा भास होत आहे. सोसाट्याचा वारा सुटल्यानंतर झाडाचा वरचा भाग हलू लागला. त्यामुळे जंगल श्वास घेत असल्याचा भास होतो, असा खुलासा शास्त्रज्ञांनी केला आहे.

सौंदर्यसाधना

## टवटवीत त्वचेसाठी

तुळशीचं लग्न पार पडलं की लग्नाचा हंगाम सुरू होतो. या लग्नसराईत विवाह आयोजित असणाऱ्या वधू-वरांची पूर्वतयारी आता अंतिम टप्प्यात आली असेल. लग्नमंडपात आपणच सर्वात सुंदर दिसावं या दृष्टीने वधूची तयारीसुरू असते. लग्नाच्या दिवशी मुलायम, सतेज त्वचा हवी असेल तर एक आठवडा आधीपासून संत्र्याचा वापर सुरू करायला हवा. संत्र्याचा गर चेहऱ्याला लावता येईल. यामुळे चेहरा नितळ आणि चमकदार दिसेल. संत्र्याची साल



वाळवून, पूड करून चेहऱ्याला लावता येईल. दोन चमचे संत्र्याचा रस, एक चमचा लिंबाचा रस आणि थोडं मध यांचं मिश्रण तयार करून चेहऱ्याला लावल्यासही कांती उजळ होईल. त्वचेवरील बारीक सुरकुत्या टाळण्यासाठीही काही उपाय योजता येतील. हा उपाय वयाने मोठ्या स्त्री नातेवाईकांनी अवश्य अवलंबावा. यासाठी त्वचेचं नियमित स्क्रबिंग करा. दररोज मॉईश्चरायझर लावा. अंडरआय क्रीमचा नियमित वापर करा. अँटी एजिंग किंवा रेटिनोल क्रीमचा नियमित वापर करा. घराबाहेर पडण्यापूर्वी सनस्क्रीन लावा. लिंबाच्या रसाने त्वचेला मसाज करा. यामुळे काळपटपणा दूर होतो. भरपूर पाणी प्यायल्याने त्वचा टवटवीत राहते.

## सुडोकू २३


| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ५ | | | ६ | २ | | ८ | १ | ४ |
| | | | | ९ | | | ३ | |
| १ | | २ | | ८ | | ९ | | |
| २ | | | ९ | ३ | | ५ | | |
| | | | | | | | | |
| | | ७ | | १ | ५ | | | ८ |
| | | १ | | ५ | | २ | | ७ |
| | २ | | | ४ | | | | |
| | | ४ | | ७ | ८ | | | ३ |

टीप -
* या चौकटीमध्ये सर्व रिकाम्या घरांमध्ये १ ते ९ पैकी अंक वापरून चौकट पूर्ण करायची आहे. यामध्ये प्रत्येक आडव्या ओळीत, उभ्या ओळीत व ३ ह्न ३ लहान चौकटीमध्ये १ ते ९ पैकी प्रत्येक अंक एकदा आणि एकदाच आला पाहिजे.
* आधी छापून दिलेले अंक बदलता येणार नाहीत.
* अशा तऱ्हेने पूर्ण झालेले उत्तर नेहमी एकच असते. पर्यायी उत्तरे असू शकत नाहीत.

## सुडोकू २२ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ७ | ९ | ४ | २ | ५ | ८ | १ | ६ | ३ |
| ३ | ८ | ५ | ९ | ६ | १ | ७ | ४ | २ |
| २ | ६ | १ | ७ | ३ | ४ | ९ | ८ | ५ |
| ९ | ७ | ८ | ६ | १ | २ | ३ | ५ | ४ |
| ४ | ३ | २ | ८ | ९ | ५ | ६ | ७ | १ |
| ५ | १ | ६ | ४ | ७ | ३ | २ | ९ | ८ |
| १ | २ | ९ | ५ | ४ | ७ | ८ | ३ | ६ |
| ८ | ५ | ७ | ३ | २ | ६ | ४ | १ | ९ |
| ६ | ४ | ३ | १ | ८ | ९ | ५ | २ | ७ |

## शब्दकोडे क्रमांक २३



**आडवे शब्द :-**
१) अतिशय भूक लगल्याचे एका पक्ष्याने सांगणे
७) काळ्या तोंडाचे माकड
१०) अंगरखा
१२) वेळ (हिं.)
१३) पाटस्थळ, पाण्यावर केलेला भाजीपाला, फळे इ
१६) पतीपत्नी
१७) हिमालयातील एक केसाळ प्राणी
१९) एकाग्र नजर
२०) जैन वा बौद्ध साधू
२३) जंगलाचा राजा, सिंह
२६) कोपरा
२७) पैंजण
२८) वसुंधरा
३०) सूट
३१) ढीग
३३) वांती
३४) नेत्र
३५) प्राणांतिक वेदना
३८) जन्म-मृत्यू
४१) शूर, पराक्रमी ४३) अंधार
४५) पाप
४७) कबूतर
४८) सरस्वतीचे एक नाव
५०) परमेश्वर
५१) सैलसर झालेले वस्त्र
५२) तोटी
५३) चिंतन
५५) मुलीचा नवरा
५७) अंडी घालावयास आलेली कोंबडी
५९) राजाची पत्नी
६०) चांदी
६२) अटीच्या भाषेतील एक शब्द
६५) पती
६७) दणकट
६८) मंदवासर
६९) चाकर, पायदळातील शिपाई

**उभे शब्द :-**
१) मुले, लेकरे
२) शेतकऱ्यांना सरकारने दिलेले कर्ज
३) वेखंड
४) निर्जन, रिकामे
५) दात
६) बेडकाचे ओरडणे
८) अत्यंत श्रीमंत माणूस
९) शरीरातील पातळसर लाल घटक
११) हत्तीवर बसण्याचे एक साधन
१४) युवक
१५) चेहेऱ्यावरील तेज
१८) मिठी
२०) ऱ्हास, उतरती कळा, नाश, एक रोग
२१) सैन्याचे पथक
२२) लाकूड कापण्याचे एक हत्यार
२४) धमनी
२५) पाण्यावरील वाहतुकीचे साधन, उदा जहाज, नौका इ.
२७) दिल्लीच्या विमानतळाचे नाव
२९) सामन्यातील पराक्रमी
३२) वर्ष, साल
३४) मऊ
३६) प्रजा
३७) प्रवास (हिं.), जत्रा
३९) नवस करणारा
४०) मत नोंदविण्याची क्रिया ४२) पाठवणी
४४) विरक्त पुरुष, दत्तात्रयाचा एक अवतार
४५) प्राजक्ताचे फूल
४६) दोन कानांचे तळण्याचे पात्र
४७) हालचालीवर ठेवलेली नजर
४९) रम्य
५४) मवाळ धोरण
५६) बिना फोडणीची आमटी
५८) रावण, लंकाधिपती
६१) सीतेच्या वडिलांचे नाव
६३) वजन, बोजा
६४) मत्सर
६६) जास्वंद.

(उत्तर उद्याच्या अंकात)

### मागील शब्दकोड्याचे उत्तर



देशभरात किरकोळ बाजारपेठांमध्ये दिवाळीच्या लक्ष्मीपूजनापर्यंतच्या कालावधीमध्ये सुमारे ६.०५ लाख कोटी रुपयांच्या विक्रमी उलाढालीचा टप्पा ओलांडला गेला. देशात या वर्षी जीएसटी सुधारणेनंतर बाजारात मागणीची लाट आली. भांडवली बाजार आणि बाजारातील खरेदीमुळे 'लक्ष्मी आली घरा' असे चित्र पहायला मिळाले. बाजारपेठेतील या उलाढालीचा नेमका अर्थ काय?

# सणकाळातील शुभसंकेत



**हेमंत देसाई**

सणासुदीच्या काळात किरकोळ बाजारपेठांमध्ये मोठ्या प्रमाणात व्यवहार झाले. संपूर्ण देशाचा विचार करता, 'कॅट'च्या अनुमानानुसार हे व्यवहार ६.०५ लाख कोटी रुपयांवर पोहोचले आहेत. यामध्ये ५.४० लाख कोटी रूपयांच्या वस्तू आणि ६५ हजार कोटी रूपयांच्या सेवांचा समावेश आहे. केंद्र सरकारने अलीकडेच केलेल्या वस्तू आणि सेवा कर सुधारणांमुळे आणि मजबूत ग्राहक भावनांमुळे मागणी वाढली असल्याचे 'कॅट'ने म्हटले. 'कॅट' ही देशभरातील किरकोळ विक्रेत्यांची संघटना आहे. तिचा अहवाल बाजारातील 'फिल गुड'वर शिक्कामोर्तब करतो. दिवाळीकाळातील उलाढालीच्या समोर आलेल्या आकड्यांमध्ये गोवर्धन पूजा, छठपूजा आणि तुळशी विवाह या सणांच्या काळातील उलाढालीचा समावेश नव्हता. या काळात उलाढालीमध्ये आणखी ५० हजार कोटी रुपयांची भर एकूण पडेल, असे 'कॅट'ने म्हटले आहे. संघटनेच्या मते या वेळी स्वदेशी उत्पादनांची मागणी आणि विक्री मोठ्या प्रमाणात दिसून आली. 'कॅट'ने प्रत्येक राज्याची राजधानी तसेच टियर २ आणि ३ शहरांसह ६० प्रमुख वितरण केंद्रांमध्ये केलेल्या देशव्यापी सर्वेक्षणावर हे निष्कर्ष बेतले होते. गेल्या वर्षी दिवाळीमध्ये ४.२५ लाख कोटी रुपयांची उलाढाल झाली होती. मुख्यत: किरकोळ विक्री, विशेषतः बिगर-कॉर्पोरेट आणि पारंपरिक बाजारपेठांनी एकूण व्यापारात ८५ टक्के योगदान दिले, जे देशाच्या बाजारपेठा आणि लहान व्यापाऱ्यांच्या शक्तिशाली पुनरागमनाला अधोरेखित करत आहे.

उत्सवकाळातील प्रमुख वस्तूंच्या विक्रीच्या क्षेत्रनिहाय टक्केवारीमध्ये किराणा आणि ग्राहकोपयोगी वस्तू बारा टक्के, सोने आणि दागिने दहा टक्के, इलेक्ट्रिकल वस्तू आठ टक्के, ग्राहकोपयोगी वस्तू सात टक्के, तयार कपडे सात टक्के, भेटवस्तू सात टक्के, गृहसजावट पाच टक्के, फर्निचर पाच टक्के, मिठाई आणि नमकीन पाच टक्के, कापड आणि चार टक्के, पूजा वस्तू तीन टक्के, फळे आणि सुकामेवा तीन टक्के अशी आकडेवारी समोर आली. याबाबत 'कॅट'चे राष्ट्रीय अध्यक्ष बी. सी. भरतिया म्हणाले की पॅकेजिंग, हॉस्पिटॅलिटी, कॅब सेवा, प्रवास, कार्यक्रम व्यवस्थापन, सजावट, मनुष्यबळ आणि डिलिव्हरी यासारख्या क्षेत्रांमधून सेवा क्षेत्राने विक्रीमध्ये ६५ हजार कोटी रुपयांची भर घातली. सर्वेक्षणामध्ये सहभाग घेणाऱ्या ७२ टक्के व्यापाऱ्यांनी दैनंदिन वापराच्या वस्तू, पादत्राणे, कपडे, मिठाई, गृहसजावट आणि ग्राहकोपयोगी वस्तूंवरील कमी झालेल्या जीएसटी दरांमुळे फायदा झाला, असे मत व्यक्त केले. ग्राहकांनीही स्थिर किमतींबद्दल अधिक समाधान व्यक्त केले. यामुळे उत्सवी खर्चाला प्रोत्साहन मिळाले. आगामी वर्षात जानेवारीच्या मध्यापासून सुरू होणाऱ्या लग्नसराई आणि येणाऱ्या सणासुदीच्या हंगामात खरेदीची ही लाट कायम राहील, असे दिसते.

इतर अनेक देशांच्या तुलनेत भारताच्या विकासाची गती समाधानकारक असून दिवाळीनिमित्त आलेला तेजीचा बहर त्याचेच संकेत देतो. गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा मोठ्या प्रमाणावर वाहनखरेदी झाली असून दिवाळीनिमित्त दुचाकी आणि चारचाकींचा खपही बराच झाला. कार्सच्या किमतींमध्ये ५० हजार ते दीड लाख रुपयांपर्यंत आणि स्कूटर्स-मोटर सायकल्सच्या किमतीत दहा ते पंधरा हजारांपर्यंत घट झाली आहे. संवत्सर २०८१ला तेजीनेच ओवाळले आहे. अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने हा शुभशकुन मानता येतो. गेल्या सोमवारी खुल्या झालेल्या आशियाई बाजारांमध्ये दक्षिण कोरियाचा कोस्पी, जपानचा निक्केई २२५, शांघायचा एसएसई कंपोझिट आणि हाँगकाँगचा हँगसेंग असे सर्व प्रमुख निर्देशांक वधारले आहेत. युरोपमधील बाजारपेठांमध्ये उत्साह होता आणि अमेरिकी बाजारातही तेजी होती. हिंदू पंचांगानुसार, २०८२ या नव्या संवत्सराची सुरुवात २१ ऑक्टोबर रोजी झाली. मागील दिवाळी ते यंदाची दिवाळी अशा वर्षभराच्या काळात सेन्सेक्स आणि निफ्टी निर्देशांकाने प्रत्येकी सहा टक्क्यांची कमाई केली. एका टप्प्यावर सेन्सेक्स ८४ हजारांवर जाऊन पोहोचला. वस्तू आणि सेवाकरात करण्यात आलेल्या कपातीचा फायदा ग्राहकापर्यंत पोहोचत असल्यामुळे मागणीतील वाढ दहा टक्क्यांपेक्षा अधिक होईल. यावेळी सुमारे २० लाख कोटी रुपयांची अतिरिक्त खरेदी होईल, असे उद्गार केंद्रीय माहिती आणि तंत्रज्ञानमंत्री अश्विनी वैष्णव यांनी काढले आहेत. खरेदीतील ही वाढ सुरूच राहील, असा विश्वास केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनीही व्यक्त केला आहे.

जीएसटी कपातीनंतर दैनंदिन वापरातल्या ५४ पैकी ३० वस्तूंच्या किंमतीमध्ये अपेक्षेपक्षा घट झाली असून २४ वस्तूंच्या किंमतींमध्ये अंदाजापेक्षा कमी घट नोंदवण्यात आली. गेल्या तिमाहीत भारतीय अर्थव्यवस्थेने ७.८ टक्के इतका विकासदर नोंदवला. हा दर अन्य तिमाहींमधील आर्थिक विकासापेक्षा जास्त आहे. मात्र गेल्या तीन आर्थिक वर्षांमधील पहिल्या तिमाहींमधील वेगापेक्षा तो कमी आहे. मुख्यत्वे उपभोगकेंद्रित क्षेत्रातील समभागांमुळे बाजारात तेजी आली आहे. अमेरिकेने वाढीव आयात शुल्काची कुऱ्हाड चालवली असली, तरीदखील भारताची देशांतर्गत बाजारपेठच विशाल आहे. केंद्र सरकारने तातडीने अनुकूल करधोरणे राबवल्यामुळे देशांतर्गत मागणीमध्ये उत्साह संचारला. त्यामुळे निर्यातीचे नुकसान भरून निघत आहे. बँकांकडून मिळणारे उत्पन्न आणि मालमत्तेच्या गुणवत्तेवरील ताण कमी होण्याच्या आशेने बँकिंग क्षेत्राच्या अपेक्षा उंचावल्या आहेत.

व्यापारयुद्ध आणि जागतिक आर्थिक अडथळ्यांमुळे एकीकडे गुंतवणूकदार काळजीत पडले आहेत, तर दुसरीकडे देशांतर्गत आर्थिक कामगिरीमुळे काही गुंतवणूकदारांमध्ये चैतन्यही पहायला मिळत आहे. बाजार भांडवलाच्या दृष्टीने देशातील सर्वात मोठी कंपनी असलेल्या रिलायन्स इंडस्ट्रीजने सरलेल्या तिमाहीत ९.६ टक्क्यांची वाढ नोंदवत १८,१६५ कोटी रुपयांचा एकत्रित निव्वळ नफा कमावला. गुगल कंपनीने आंध्र प्रदेशमध्ये १५०० कोटी अमेरिकी डॉलरची गुंतवणूक करून कृत्रिम प्रज्ञेचे पायाभूत केंद्र उभारायचे ठरवले. त्या ठिकाणीच अदानी समूहाशी भागीदारी करून एक गिगावॅट डेटा सेंटरचीही उभारणी केली जाणार आहे.धनत्रयोदशीच्या दिवशी बाजारात एक लाख कोटी रुपयांहून अधिक उलाढाल झाली असावी, असा अंदाज आहे. त्यात सोने-चांदीचा वाटा ६० हजार कोटी रुपयांहून अधिक होता, असे 'कॉन्फेडरेशन ऑफ ऑल इंडिया ट्रेडर्स'ने म्हटले आहे. चांदीची नाणी, विटा, बिस्किटे आदींची जोरदार खरेदी झाली. मौल्यवान धातूंमधील तेजी कायम राहण्याची अपेक्षा असून विद्यमान वर्षात आतापर्यंत परताव्याच्या बाबतीत चांदीने सोन्यापेक्षा चांगली कामगिरी केली आहे. चांदीचे भाव प्रति औंस सध्याच्या ५१-५२ वरून ७५ डॉलरपर्यंत वाढणे अपेक्षित असल्याचा अंदाज मोतीलाल ओसवाल फायनॅन्शियल सर्व्हिसेस लिमिटेडच्या अहवालाने व्यक्त केला आहे. २०२५ मध्ये सोन्याच्या किमती ५० टक्क्यांहून अधिक वाढल्या. त्यांनी प्रति औंस चार हजार डॉलरची पातळी ओलांडली आहे. जागतिक मध्यवर्ती बँकांकडून होत असलेली सोन्याची खरेदी, सततचे भूराजकीय तणाव आणि आशियाई देशांमधील सोन्याला असलेली मजबूत मागणी यामुळे सोन्यातील तेजी वाढली आहे. अमेरिकी फेडरल रिझर्व्हकडून लवकरच व्याजदरकपातीची अपेक्षा असून जगभरच्या मध्यवर्ती बँकांकडून वाढत्या प्रमाणात सुवर्णसंचय केला जात आहे. रिझर्व्ह बँकेकडील सुवर्णसाठ्याचे मूल्य शंभर अब्ज डॉलर्सच्या वर जाऊन पोहोचले आहे. जगातील मध्यवर्ती बँकांमधील एकूण सुवर्णसाठ्यांमध्ये भारताचा वाटा १४.७ टक्के झाला आहे. गेल्या ३५ वर्षांमधले हे सर्वाधिक प्रमाण आहे. यंदा सोन्याचे भाव ६० टक्क्यांनी, तर चांदीचे भाव ५५ टक्क्यांनी वधारले आहेत.

दिवाळीच्या सुमारास दर वर्षी या दिवशी सोने, त्यापाठोपाठ चांदी, तांबे, पितळ आणि स्टेनलेस स्टीलच्या वस्तूंच्या खरेदीकडे ग्राहकांचा कल असतो. यावेळी सोन्याचा दर प्रचंड वाढल्यामुळे ग्राहकांनी तुलनेने चांदीला अधिक पसंती दिली. लक्ष्मीपूजनानिमित्त समभाग, रोखे यांचीदेखील खरेदी झाली. मात्र केवळ सोन्या-चांदीची वा दागदागिन्यांची खरेदी हे विकासाचे खरे लक्षण नव्हे. देशातील कारखानदारीचा जोमदार विकास झाल्यासच रोजगार वाढेल. शेतीत संरचनात्मक सुधारणा झाली, तर ग्रामीण भागात खरे परिवर्तन येईल. सध्या नवनव्या कंपन्यांनी निधीउभारणीसाठी प्राथमिक बाजारात तुफान गर्दी केली आहे. येत्या काही महिन्यांमध्ये आणखी डझनभराहून अधिक कंपन्या अडीच लाख कोटी रुपयांच्या 'आयपीओ'च्या तयारीत आहेत. येत्या काही महिन्यांमध्येच भारतात ५० हजार कोटी रुपयांची विदेशी गुंतवणूक होणार असल्याची आश्वासक घोषणा केंद्रीय वाणिज्यमंत्री पीयूष गोयल यांनीदेखील केली आहे. तेजीचे हे शुभसंकेतच आहेत. **



# असे येणार मरण

**निलेश साठे**

जन्माला आलेला प्रत्येक जण मरणार आहे. आणि हेच शाश्वत सत्य आहे. असं असूनही बहुतेक जण याच भ्रमात जगत आहेत की मला कधीही मृत्यू येणार नाही. मी कायम अमर राहणार आहे. असे होणे शक्य नाही. मनुष्य मृत्यूला घाबरत नाही. परंतु मरताना होणाऱ्या वेदनांच्या कल्पनेनेच अर्धमेला होऊन जातो. प्रत्येकाला वेदना रहित मरण हवे आहे. पण हे कसं शक्य आहे भाऊ. जेव्हा तुम्ही जन्माला आला तेव्हा त्या जन्मदात्रीला किती वेदना झाल्या. म्हणजे तुम्ही जन्माला येताना जर वेदना झाल्या आहेत तर जाताना सुद्धा नक्कीच वेदना होणार. कोण कुठे कधी आणि कसा जाईल याचा काही नेम नाही. कोणाचा मृत्यू कसा होईल हे सांगणारं तंत्रज्ञान अजून तरी विकसित झालेलं नाही.

मृत्यूच्या बाबतीत प्रत्येकाच्या मनात एक अनामिक भीती आहे. की आपला मृत्यू कसा होईल. वृद्धापकाळ आजारपण अकस्मात आणि अपघाती याशिवाय दुसऱ्या कुठल्याही प्रकारे मृत्यू येत नाही. मरताना कुठल्याही प्रकारच्या वेदना होऊ नयेत असं माणसाला मनोमन वाटते. झोपेतच एखादा मृत्यू पावला काहीही तकलीफ न होता तर त्याला पुण्यवान समजले जाते. आपला मृत्यू कसा होईल हे कुणाला सांगता येत नसले तरी आपण मारणार आहोत हे निश्चित आहे. पण मग मृत्यू कसा होईल याची चिंता मात्र माणसाला नक्की सतावते. म्हणून मग मी म्हटलं चला आपण आपल्या स्वत:वरच विचार करावा. कसा बरे होईल माझा मृत्यू? एखादी गाडी पाठीमागून येऊन मला चिरडून जाईल कि मी धावत्या लोकल खाली पडेन. कि अचानकच छातीमध्ये तीव्र वेदना होतील आणि माझा खेळ खल्लास होईल. कि मी वृद्ध होईल आणि जर्जर जर्जर होऊन मरेल. की एखाद्या बॉम्बस्फोटांमध्ये माझ्या शरीराच्या चिंधड्या चिंधड्या उडतील.कि आजारपण मला भयंकर छळेल.ते काहीही असेल मरण हेच नक्की आहे. ते कसंही येईल. आणि ते येईल तेव्हा येईल ते आपल्या हातामध्ये नाही. त्याचा विचार करण्यात काही अर्थ नाही. प्रत्येकाची एक इच्छा लात्र नक्की असते मरण आलं तर चटकन यावं. आपण कोणावरही अवलंबून राहू नये. आपला त्रास कोणाला म्हणजे आपल्या कुटुंबीयांना होऊ नये. जोपर्यंत धडधाकट आहोत, जोपर्यंत जिवंत आहोत तोपर्यंत मौज मजा करून जगून घेऊया. धरतीवरचं सगळं सुख उपभोगायचं आणि मगच कल्टी मारायची असं मी ठरवलं आहे. बघूया तो जन्मदाता मरणदाता म्हणून कधी आपल्या दारात येतो.



# 'अवकाळी पावसाने शेतकऱ्याच्या स्वप्नांचा विध्वंस'

**धनंजय शेटये**

कोकणची लाल माती, जिथे निसर्गाची माया आणि मानवी कष्टाचा सुगंध दरवळतो, आज तीच माती आसमानी संकटाने भयभीत झाली आहे. गेल्या अनेक महिन्यांपासून या मातीत राबणाऱ्या शेतकऱ्यांच्या जीवनाचा आधारच जणू अवकाळी पावसाने हिरावून घेतला आहे. हा निव्वळ पिकाचा नाश नाही, तर त्यामागे दडलेल्या असंख्य स्वप्नांचा आणि अफाट मेहनतीचा विध्वंस आहे.

कष्टाची कहाणी, कुटुंबाचा त्याग आणि समर्पण या शेतकऱ्याच्या श्रमाचे मोल शब्दांत मांडणे अशक्य आहे. गेल्या पाच-सहा महिन्यांपासून तो भल्या पहाटे, जेव्हा सारे जग निद्रेच्या अधीन असते, तेव्हा आपल्या शेतात पाऊल ठेवतो. त्यांच्या कष्टाला वेळेचं बंधन नसतं, कुठल्याही 'ऑफिस टाईम'सारखी १० ते ५ ची ड्यूटी नसते. पहाटेचे ५-साडेपाच वाजल्यापासून ते सायंकाळच्या तिन्ही सांजेपर्यंत, जेव्हा अंधार दाटून येतो, तेव्हाही त्याचे कुटुंब शेतात राबत असते. म्हातारे आई-वडील, पत्नी आणि मुले, सारे जण शेतकरी बांधवांना सर्वतोपरी मदत करतात. भातशेताची मशागत, पेरणी, लावणी या प्रत्येक टप्प्यावर हे अख्खं कुटुंब आपल्या वावराची काळजी एखाद्या लहान मुलाच्या संगोपनाप्रमाणे घेत असते.

'शेतकरी केवळ पीक पेरत नाही, तो आपल्या येणाऱ्या भविष्याची स्वप्ने त्या मातीत रुजवत असतो.'

नियतीचा निर्दयी घाव: हाता-तोंडाशी आलेला घास हिरावला आहे.

यावर्षीचा निसर्गाचा कोप तर अभूतपूर्व आहे. मे महिन्याच्या मध्यापासून सुरू झालेला पाऊस दिवाळीच्या सणापर्यंतही पाठ सोडायला तयार नाही. भाजीपाल्याचे झालेले प्रचंड नुकसान पचवून शेतकरी पुन्हा उभा राहण्याचा प्रयत्न करत होता. पण आता तर हाता-तोंडाशी आलेला भाताचा घास जणू या पावसाने क्रूरपणे हिरावून घेतला आहे.

तळकोकणचा शेतकरी हा पावसाच्या पाण्यावर आधारित शेती करतो. याच पिकावर



त्याचे पुढचे वर्षभराचे जीवन अवलंबून असते. आपली मर्यादित स्वप्ने उराशी बाळगून, अंथरुण पाहून पाय पसरण्याची वृत्ती आयुष्यभर जपणाऱ्या या कोकणी माणसाला कुठल्याही मदतीची भीक नको असते. तो या संकटाला स्वतःच्या नशिबाचा भाग समजून, सरकार दरबारी गाऱ्हाणं न मांडता, पुन्हा जोमाने कामास सुरुवात करतो.

**कोकणी माणसाचं रक्त**

आत्महत्येचा भ्याडपणा कोकणी माणसांच्या रक्तात नाही. असले पुळचट मार्ग ते कधीच अवलंबत नाहीत. त्यांना त्यांच्या मनगटातल्या शक्तीवर आणि हिंमतीवर प्रचंड विश्वास आहे. मदतीची भीक सुद्धा त्यांना नको आहे, पण...

आपल्या कष्टाच्या घामावर मिळवलेल्या पिकाच्या झालेल्या नुकसानीची भरपाई हा त्यांचा हक्क नाही का? या न्याय्य हक्कांसाठी त्यांनी आवाज उठवू नये का?

**स्वप्नांचा चक्काचूर भाताला फुटलेले कोंब.**

पावसाच्या थैमानामुळे कापणी झालेली शेते आज पाण्यावर तरंगत आहेत. कापणी करून सुकत ठेवलेल्या भातावर या न थांबणाऱ्या पावसाने जणू वरवंटाच फिरवला आहे. पाण्याचे तासनतास साचून राहिल्यामुळे भाताच्या दाण्यांना कोंब फुटून धान्याची पूर्णतः नासधूस झाली आहे.

याच धान्याची विक्री करून तो आपल्या मुलाबाळांच्या शिक्षणाचा खर्च पेलणार होता, म्हाताऱ्या आई-वडिलांच्या औषध-पाण्यासाठी चार पैसे गाठीला बांधणार होता, लोकांचे उसणे-पासनं देणार होता आणि आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करणार होता. पण ऐन दिवाळीच्या तोंडावर कोसळणाऱ्या या अवकाळी पावसाने त्याच्या सर्व स्वप्नांचा निर्दयीपणे चक्काचूर केला आहे.

**एक कळकळीची विनंती मदतीचा हात हवाच!**

आज माझ्या कोकणच्या या हवालदील शेतकऱ्याला खरी आर्थिक सहकार्याची नितांत गरज आहे. उभ्या जगाचा पोशिंदा असलेल्या या शेतकरी बांधवांचे अश्रू पाहून मन हेलावून जाते.

शासनाने त्वरित लक्ष घालून, पंचनाम्यांच्या साखळदंडात न अडकवता, थेट आणि भरीव आर्थिक मदत जाहीर करावी.

सामान्य जनतेनेही कोकणच्या या स्वाभिमानी शेतकऱ्यांसाठी उदार मनाने सहकार्याचा हात पुढे करावा.

खेडोपाडी असलेल्या गरजू आणि सामान्य शेतकऱ्यांपर्यंत ही मदत त्वरित आणि थेट पोहोचायला हवी.

'वरुण राजा' तुलाही एक कळकळीची विनंती आहे... आतातरी थोडी उसंत घे, हे जलदान थांबव. एवढा कठोर नको होऊस!

# छोट्या टोकांचे हिमनग

प्रतिक कोळी

आपण मोठ्या गोष्टींत रमतो. ''ग्रीन एनर्जी'', ''सस्टेनेबल डेवलपमेंट'' असे शब्द वापरताना आपण स्वतःला नोबेलप्राप्त समजतो. पण ते शब्द तेव्हाच अर्थपूर्ण होतात, जेव्हा आपण दूधाचं टोक इतरत्र फेकून देतो. छोट्या सवयींचा बदल हीच मोठ्या क्रांतीची बीजं आहेत. थोरले छत्रपती श्रीशिवाजी महाराजांनी रयतेला स्वराज्य दिले; आता त्या स्वराज्याचे पाईक म्हणून आपल्याला ''स्वच्छराज्य'' घडवायची गरज आहे. कारण स्वच्छता म्हणजे आधुनिक देशभक्तीचे एक रूप आहे.

''आई, थांब ना जरा!''

सहा वर्षांचा विवेक हातात दूधाचं पाकीट धरून ओरडतो.

आई म्हणते, ''काय झालं आता?''

''तू दरवेळी हे टोक कापून जमिनीवरच टाकतेस ते छोटं असलं तरी नंतर मीच पायात चिकटवून फिरतो!''

आई चिडून हसते, ''अरे बाळा, एवढ्याने काय फरक पडतो?''

विवेक निरागसपणे म्हणतो, ''मग सगळेच असं म्हणाले, तर फरक कोण करणार?''

क्षणभर शांतता. दूध उकळतं, आणि विचारांची वाफ हवेत मिसळते.

आपल्या देशात एक विलक्षण विचारधारा रुजलेली आहे ''एवढ्यानं काय होणार?'' ही विचारधारा इतकी खोल रुजलीय की ती आता राष्ट्रीय स्वभावाचा भाग झालीय. दूधाचं पाकीट उघडताना आपण जे छोटं टोक कापतो, ते डस्टबिनऐवजी इतरत्र टाकणं, हा आता कुणाच्याही विवेकबुद्धीला टोचत नाही. चिप्स संपले की त्याचा रॅपर सहज वाऱ्यावर सोडला जातो, चॉकलेटची वेस्टन, कोणत्याही प्रोसेंड पॅकेजिंगची पाकिटे मनआपण सहज इथे तिथे कुठेही फेकून देतो. त्यातही आपण शांतीनं म्हणतो ''एवढं छोटं तर आहे!'' पण हेच छोटं, जेव्हा लाखोंनी रोज घडतं, तेव्हा तेच मोठं होतं आणि मग आपण आश्चर्याने म्हणतो, ''अरे हे सगळं कुठून आलं?''

माणूस कितीही शिकला, तरी त्याच्या मनातला ''फेकायचा मोह'' सुटत नाही. एकेकाळी आपण कचरा अंगणात फेकायचो, मग गल्लीत, आता समुद्रात थोडक्यात प्रगतशील माणसाची प्रगती झाली म्हणायची! आणि यामुळे आज आपण ''फेकायच्या संस्कृती''चे वारसदार झालो आहोत. फेकणं म्हणजेच आधुनिक जीवनशैली. या ''फेकण्याच्या प्रगतीला'' खरंतर नोबेल पारितोषिक मिळायला हवे. आपल्या लेखी, फेकायचं म्हणजे सुटायचं. पण निसर्गाकडे फेकलेली कोणतीही गोष्ट गायब होत नाही ती फक्त रूप बदलते. प्लास्टिकचं टोक आता झाडाच्या मुळाशी अडकलंय, बाटलीच झाकण पावसाच्या पाण्यात तरंगतोय, आणि मोबाईलचा ई-कचरा जमिनीत विष ओकत बसलाय. हे सगळं



मिळून आपणच तयार करत आहोत एक स्मशानासारखी पृथ्वी.

स्वच्छतेबद्दल बोलताना आपण इतके भावनिक होतो की जणू प्रत्येक जण गांधींचा थेट वंशज आहे. भाषणं जोमदार, परंतु कृती? चहा घेतल्यानंतर पेपरकप कुठे गेला हे विचारलं, तर नजर छताकडे वळते. ''एवढं छोटं तर आहे,'' आपण म्हणतो. पण हेच ''छोटं'' जेव्हा हजारो लोक रोज करतात, तेव्हा ते ''मोठं'' होतं. आपण विसरतो, की मोठ्या समस्यांचे मूळ नेहमी छोट्या सवयींत असतं.

वास्तव पाहायला गेलो तर आपण आपल्या सोयीला देव मानतो आणि जबाबदारीला शत्रू. ''सरकार काही करत नाही'' असं म्हणणारा नागरिक स्वतः मात्र दूधाचे टोक फेकतो. घरातली कचरा पेटी भरली की तो रस्त्यावर ठेवतो आणि म्हणतो, ''मी माझं केलं.'' पण निसर्गाला तुमच्याची सीमा माहीत नसते त्याचं सर्व काही एकच आहे.

आपल्याला ''मोठ्या'' गोष्टींचा मोह. मोठे प्रकल्प, मोठे रस्ते, मोठ्या घोषणा. पण छोटं मन, छोटा डबा, आणि त्यात भरपूर कचरा. स्वच्छता ही मोठी मोहिम नाही ती छोट्या सवयींचा योग आहे. दूधाच्या पाकिटाचं टोक डब्यात टाकणं, प्लास्टिकचा तुकडा वेगळा साठवणं, किंवा रस्त्यावर चालताना दुसऱ्याचा फेकलेला कचरा उचलणं या छोट्या गोष्टी आपल्या संस्कृतीतून गायब झाल्या आहेत.

आजची पिढी ''रीसायकल'' शब्दावर इतकी खूश आहे की तो इंस्टाग्राम बायोमध्ये टाकते, पण मोबाईल चार्जर खराब झाला की थेट कचरापेटीत फेकते. ई-कचरा म्हणजे ''इलेक्ट्रॉनिक आत्मा'' त्यात जड धातू, रसायने, आणि विषारी घटक असतात. तो जमिनीत गेला की पाण्याला विष लागतो, झाडं कोमेजतात, आणि शेवटी आपणच त्याच विषारी पाण्याचा वापर करून ''हेल्दी लाइफस्टाइल'' म्हणत स्मूदी पितो!

पर्यावरण हा विषय आता ''फॅशन'' झाला आहे. झाडांच्या पार्श्वभूमीवर फोटो काढायचे, पृथ्वी दिनी एक स्टोरी टाकायची झालं योगदान. पण खरा पर्यावरणप्रेमी तोच जो आपली सवय बदलतो. झाड लावणं सोपं आहे, पण त्याच्याभोवती प्लास्टिक न टाकणं कठीण आहे. कारण सवय बदलायला धैर्य लागतं, आणि आपल्याकडे धैर्य आहे, पण दुसऱ्याला उपदेश करण्याचं!

स्वच्छता दूत रोज आपल्यामागे झाडू फिरवतात. त्यांच्या हातातली झाडू म्हणजे खरी ''देशसेवा''. पण आपण त्यांच्याकडे बघताना जणू एखादं कामगारवर्गीय चित्रपट दृश्य पाहतो. आपण म्हणतो, ''अरे हे त्यांचं काम आहे.'' खरं म्हणजे, त्यांचे काम आपण टाळलेलं कर्तव्य आहे. ते झाडतात कारण आपण फेकतो. एक दिवस तेही स्वप्न बघतील जिथे नागरिक स्वतःचा कचरा स्वतः उचलतील. त्या दिवशी त्यांचा झाडू विश्रांती घेईल, आणि शहर खरंच स्वच्छ होईल.

लहान मुलं घरात शिकतात ''कचरा डब्यात टाका.'' पण मोठे झाल्यावर आपण शिकवतो ''वेळ नाही रे बाबा!'' वेळ नाही म्हणूनच आपण वेळेआधी त्रास भोगतो. पाण्याचे तुंबे, नाले बंद, डेंग्यू-मलेरियाचा कहर हे सगळं त्या छोट्या दूधाच्या टोकात दडलेलं असतं. हसण्यासारखं वाटेल, पण हाच तो छोटा तुकडा जो शेवटी मोठ्या आपत्तीला निमंत्रण देतो.

आपल्याला स्वच्छतेबद्दल एक भीषण गैरसमज आहे की ती ''दुसऱ्याची जबाबदारी'' आहे. पण प्रत्येक व्यक्तीचा कचरा हा त्याचं व्यक्तिमत्व सांगतो. घर स्वच्छ आणि रस्ता घाण असेल, तर ते घर नाही तो एक नाटकाचा सेट आहे. खऱ्या अर्थाने स्वच्छ माणूस तोच जो स्वतःमागचं घाण स्वतः साफ करतो.

पर्यावरणविषयक भाषणं आणि मोहिमा आपल्याला क्षणभर हलवतात, पण सवयी मात्र हलत नाहीत. आपण रस्त्यावर पडलेला कचरा पाहून म्हणतो, ''घाण झालीय'', पण तो टाकणारा आपणच असतो. घरातील आरशासमोर आपण दररोज स्वतःकडे पाहतो, पण समाजाचा आरसा रस्त्याचा चेहरा पाहायची हिंमत होत नाही.

खरी क्रांती झाड लावण्यात नाही, झाडाभोवती कचरा न टाकण्यात आहे. खरी देशभक्ती घोषणेत नाही, तर हातातल्या रॅपरला खिशात ठेवण्यात आहे. आणि खरं पर्यावरणसंवर्धन निसर्गाला ''त्याचं होऊ दे'' म्हणण्यात नाही, तर ''आपलं बदलू या'' म्हणण्यात आहे. पण या सगळ्या उदासीनतेला शेवटी मर्यादा असते. पृथ्वी आजही शांत आहे, पण ती गप्प नाही. तिच्या शांततेच्या मागे एक भयानक तयारी सुरू आहे. आपण समुद्रात प्लास्टिक टाकलं, तर तो परत पुरासारखा येतो. आपण हवा घाण केली, तर तीच हवा श्वासात विष पेरते. आपण जंगलं तोडलं, तर तीच जमीन कोरडी पडते. एक दिवस असा येईल पाणी उरेल, पण पिण्यासाठी नव्हे; हवा उरेल, पण श्वासासाठी नव्हे; आणि झाडं दिसतील, पण कागदावर. त्या दिवशी, जेव्हा आपण नाल्यात अडकलो, पुरात वाहिलो, किंवा उन्हात भाजलो, तेव्हा पृथ्वीच हसून म्हणेल, ''अरे एवढ्यानं काय झालं?''

**

## सर्वांसाठी मोलाचा संदेश

# आधुनिक जंगल बुक

पुस्तक परीक्षण
प्रा. शाम जोगळेकर
मो. ९२७३३४३१७७

आधुनिक जंगल बुक, हे ज्योती देशपांडे यांचे पहिले, बालकवितांचे पुस्तक, पुण्याच्या उत्कर्ष प्रकाशनने अतिशय देखण्या रूपात प्रकाशित केले आहे. या पुस्तकाचे स्वागत करणारी, प्रस्तावना, पुण्याच्या मृणालिनी कानिटकर-जोशी यांची आहे. त्यांच्यामते, जंगलातले प्राणी आणि त्यांचे मानवी जीवनाशी साधर्म्य दाखवणारे भावविश्व या कल्पनेतून, या संग्रहातल्या सर्व कविता साकार झाल्या आहेत. या कविता संग्रहातील पहिल्या भागात जंगलातील शाळा, जंगलातील सर्कस, दिवाळी अशा विविध विषयांवरच्या कविता ज्योती यांनी लिहिल्या आहेत. कवितांमधील कल्पनारम्यता बालकांचे निश्चितच रंजन करील. कवितांमधून मनोरंजनाबरोबरच मुलांच्या भावनिक आणि बौद्धिक विकासालाही चालना मिळू शकेल. ज्योतीताईंनी काही गोष्टींनाही काव्यरूप दिले आहे. जंगल हीच मध्यवर्ती कल्पना घेऊन लिहिलेल्या, या बालकविता मोठ्यांनाही आवडतील अशाच आहेत. दुसऱ्या भागात प्राण्यांसंबंधीच्या प्रचलित गोष्टींना काव्यरूप दिले आहे. कवयित्री ज्योती देशपांडे यांनी सुरुवातीला आपले 'मनोगत' मांडले आहे. या पुस्तकाचे सुंदर, रंगीत मुखपृष्ठ आणि मलपृष्ठ अशोक बोकील यांचे आहे. कवितेनुरूप काढलेली सुंदर चित्रे आकर्षक ठरतील अशीच आहेत. या कवितासंग्रहात एकूण सत्तावीस कविता समाविष्ट करण्यात आल्या आहेत. यापैकी काही कविता विविध वृत्तपत्रांच्या बाल पुरवण्यांमध्ये, प्रकाशित झाल्या आहेत.




जंगलातील शाळा, या पहिल्या कवितेत जंगलात एक नवीन शाळा सुरू होते. त्यामध्ये विविध प्राणी गोळा होतात. कोल्होबा गुरुजी होतात. इतर प्राणी विद्यार्थी. मात्र या कवितेचा शेवट कसा होतो पहा,

वाघोबाने मारली
एक डरकाळी विद्यार्थ्यांची झाली मग पळापळी
अशीच गंमत झाली बाळा
कसचा अभ्यास अन् कसची शाळा.

जंगलातील सर्कस, या कवितेत प्राणी विविध खेळ करून दाखवतात. त्यांच्या सर्कशीत माणसंही विविध खेळ करून दाखवत होती, याची मोठी गंमत वाटते.

**नागोबा वाजवत होता पुंगी छान**
**गारुडी डोलवत होता मस्त मान.**

जंगलातील दूरदर्शन, या कवितेत, वेगवेगळे कार्यक्रम, पशुपक्षी पहात आहेत, अशी कल्पना केली आहे. तसेच जंगलातील प्राणी माणसांप्रमाणे दिवाळीही साजरी करतात. प्राण्यांच्या दिवाळीत झाडाझाडांतून दिवे लावण्याचे काम काजवे करतात.

माणसांच्या अनुकरणातून जंगलात हॉटेल सुरू होते. प्राण्यांची एकदा अंगतपंगतही बसते. जंगलातील निवडणूक, या कवितेत निवडणुकीच्या शेवटी सिंह, जरा माघार घेऊन विचारपूर्वक आश्वासन देतो,

''करणार नाही
मी उगाच शिकार,
कारणाशिवाय
ना मारणार कुणाला
ठार.''

जंगलातील सारेगम या कवितेत, प्राण्यांची अंताक्षरी ऐकायला मिळते. यामध्ये विविध प्राण्यांची वैशिष्ट्ये समजून येतात. कोकिळेला अर्थातच गोड आवाजामुळे पहिला क्रमांक मिळतो.जंगलातील करोडपती, या कवितेत वाघ प्रश्न विचारतो आणि कोल्होबा उत्तरे देतात. शेवटी कोल्होबा जनतेच्या कल पाहून उत्तर देतो आणि जिंकतो! वाघाची छान स्तुतीही करतो. जंगलातही आले इंटरनेट, या कवितेत आधुनिक काळातील मानवाप्रमाणे, जंगलातील प्राण्यांचाही इंटरनेटचा वापर वाढल्याचे सांगितले आहे. मानवाने जंगलांची मोठी हानी केली आहे, त्यामुळे जंगलातील प्राण्यांना सुखाने राहता येत नाही. शेवटी प्राणी नवा संदेश देतात आणि आपल्या मागण्यांसाठी माणसांविरुद्ध मोर्चा काढतात. माणसांप्रमाणे जंगलातही ऑलिंपिक स्पर्धा होतात. त्याचेही वर्णन जंगलातील ऑलिंपिक या कवितेत सविस्तरपणे आले आहे. या सर्व कवितांतून माणसांचा प्राण्यांवर झालेला परिणाम, खरे तर दुष्परिणाम, दाखविला आहे.

यानंतरच्या विविध बारा कवितांतून लहानपणापासून, प्रौढांनी ऐकलेल्या विविध गोष्टींचे कवितांमध्ये सुंदर रूपांतर केले आहे. या कविता मुलांना छान संदेश देतात. उंदीर अन् मांजर, या कवितेत उंदीर मांजरांपासून मुक्ती मिळवण्यासाठी, मांजरांच्या गळ्यात घंटा बांधल्यास, घंटानादामुळे उंदीर पळून जातील आणि सुरक्षित राहू शकतील, अशी सूचना एक धिटुकला उंदीर मांडतो. सर्व जण आनंदाने मान डोलावून पाठिंबा देतात. शेवटी प्रौढ आजोबा उंदीर म्हणाला,

घंटा गळ्यात जो बांधील
मांजराच्या पायावर डोके मी
ठेवीन त्याच्या.

म्हणूनच म्हणतात ना!

''मांजराच्या गळ्यात घंटा बांधणार कोण?''

ससा आणि कासव, गाढवाची फजिती, कोल्हा आणि करकोचा, आंबट द्राक्षे या विविध कविता, त्यांच्याशी संबंधित विविध गोष्टी मुलांना कवितांतून समजावून देतात. या छोट्याछोट्या कविता शिक्षकांनी, मोठ्यांनी, किंवा मुलांच्या आजी-आजोबांनी मुलांना रोज वाचून दाखवल्यास हळूहळू या कविता मुलांच्या पाठही होतील. या कविता, मुले अन्य मुलांनाही केव्हाही ऐकवू शकतील, हेच या पुस्तकाचे यश आहे.

मात्र त्यासाठी मुलांच्या पालकांनी मुलांना सर्कस, जंगलातील प्राणी यांचे दर्शन वेळोवेळी घडविले पाहिजे.(परंतु विविध प्राण्यांचा सहभाग असलेली सर्कस आणि उत्तम जादूचे प्रयोग हे आता दुर्मीळ आहेत.) तरच या पुस्तकाचा सर्वांना, विशेषतः मुलांना आनंद घेता येईल आणि या पुस्तकाचा हेतूही साध्य होईल. पुस्तकाच्या मलपृष्ठावर कवयित्री ज्योती देशपांडे यांचा सचित्र परिचय करून दिला आहे.

**

**पुस्तकाचे नाव : आधुनिक जंगल बुक**
**कवयित्री : ज्योती देशपांडे**
**प्रकाशक : उत्कर्ष प्रकाशन, पुणे- ४.**
**संपर्क : ९८२२४१००३७**
**प्रथमावृत्ती : २६ जानेवारी २०२५**
**पृष्ठे : ५९, मूल्य रुपये : रु.१००/-**

# ज्ञानदेवें रचिला पाया

विठ्ठल वळसे पाटील

आषाढी एकादशी नंतर महाराष्ट्रात कार्तिकी एकादशीला महत्त्वपूर्ण असे स्थान आहे. वारकरी या एकादशीला संत ज्ञानेश्वरांचे दर्शनासाठी आळंदी तीर्थक्षेत्री एकत्र येतात. आज संत ज्ञानेश्वरांचा संजीवन समाधी सोहळा पार पडत आहे, त्यामुळे कानाकोपऱ्यातून भाविक आळंदीत दाखल होतात. कार्तिकी एकादशीला प्रबोधिनी, देवशयनी एकादशी असेही मानले जाते. या दिवशी भगवान विष्णूची पूजा केली जाते. राज्यात कार्तिकी एकादशीला आळंदीची यात्रा म्हणून ओळखली जाते. विठ्ठल नामाने आळंदी नगरी जयघोषाने न्हावून निघते.

**संत कृपा झाली। इमारत फळा आली।**
**ज्ञानदेवें रचिला पाया। उभारिले देवालया।**
**नामा तयाचा किंकर। तेणे विस्तरिले आवार।**
**जनी जनार्दन एकनाथ। स्तंभ दिला भागवत।**
**तुका झालासे कळस। भजन करा सावकाश।**
**बहिणा फडकती ध्वजा। तेणे रूप केले ओजा।।**

संतकृपा झाली या अभंगात संत बहिणाबाई वारकरी संप्रदायाच्या उभारणीतील संत ज्ञानेश्वरांचे योगदान वर्णन करतात. संतांच्या कृपेमुळे वारकरी संप्रदायाच्या इमारतीची जडणघडण झाली. यात संतांनी केलेल्या योगदानाचे महत्त्व विशद केले आहे. ज्ञानेश्वरांनी भक्कम पाया घातल्यानंतर त्यावर संत नामदेव महाराज यांनी भागवत धर्म महाराष्ट्राबाहेर नेला. संत एकनाथ महाराज यांनी उभा केला तर जगद्गुरु संत तुकाराम महाराजांनी त्याचा कळस चढवला. बाराव्या शतकापासून भारत स्वातंत्र्या पर्यंत महाराष्ट्राच्या जडणघडणीत अनेक प्रकारचे सांप्रदाय होते. अघोरी विद्या, कर्मकांड, अज्ञान, अंधश्रद्धा, जातीभेद, वर्णभेद, अस्पृश्यता, रूढी परंपरा या गोष्टींनी अंगभूत झालेले होते, त्यातून सर्वसामान्यांना भक्तीचा सोपा मार्ग व जीवनाचा सोपा मार्ग संत ज्ञानेश्वरांनी, संत एकनाथ, संत नामदेव, संत एकनाथ, संत तुकाराम ते संत गाडगेबाबा, संत तुकडोजी महाराज या संतांनी भागवत धर्माच्या माध्यमातून समाजाला शहाणे करण्याचे काम केले यामुळे वारकरी संप्रदायाचे देवालय भक्कम झाले.

**ज्ञानाचा सागर ।**
**सखा माझा ज्ञानेश्वर ।।१।।**
**मरोनियां जावें ।**
**बा माझ्याच्या पोटा यावें ।।२।।**
**ऐसें करी माझ्या भावा ।**
**सख्या माझ्या ज्ञानदेवा ।।३।।**
**जावें वोवाळुनी ।**
**जन्मोजन्मीं दासी जनी ।।४।।**

संत जनाबाईंनी आपल्या अभंगातून संत ज्ञानेश्वरांचे वर्णन हे ज्ञानाचा सागर असे करतात. खरोखरच संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज यांनी संस्कृत भाषेतून जनसामान्यांना समजेल अश्या प्राकृत भाषेत ज्ञानेश्वरीच्या १८ अध्यायांतून माहात्म्य व विश्वकल्याण साधिले आहे. संत जनाबाई म्हणतात ज्ञानदेवाने माझ्या पोटी जन्मा यावे. जीव ओवाळून टाकावा. जन्मोजन्मीचे दास व्हावे. ज्ञानेश्वरांनी पसायदानातून विश्वकल्याण व विश्वशांतीचा जगात १२ व्या शतकात प्रथम संकल्प मांडला. माउलींनी मागितलेले पसायदान हे जगाला दिलेली संत साहित्याची सर्वात मोठी देणगी आहे. .

संत ज्ञानेश्वरांनी बालवयात विश्वाच्या कल्याणाचा संदेश दिला. त्यांनी रचलेल्या ज्ञानेश्वरी ग्रंथाने सामान्यांना गीता समजू लागली यावर संत एकनाथ महाराज आपल्या अभंगातून ज्ञानेश्वरी चे माहात्म्य विशद करताना म्हणतात

**भाव धरुनियां वाची ज्ञानेश्वरी ।**
**कृपा करी हरी तयावरी ।।१।।**

ज्ञानेश्वरीचे वाचन पारायण केल्याने कलीकालचे भय राहत नाही. इतके सामर्थ्य या ज्ञाश्वरीतील ओव्यांत आहे. जीवन समृद्ध करण्याचा मार्ग ज्ञानेश्वरी दाखवते. मनात ज्ञानाचा प्रकाश पडतो. मनातून विकार अंधश्रद्धा नाहीश्या होतात. भुकेलेल्या तहानलेल्या याचकाला ज्ञानरूपी अमृत देण्याचे एवढे सामर्थ्य ज्ञानेश्वरी ने जगाला दिले.

**दुरितांचे तिमिर जावो । विश्व स्वधर्मसूर्ये पाहो।**
**जो जे वांछील तो ते लाहो । प्राणिजात ।।**

दुरित म्हणजे पापी, समाजकंटक, दुष्ट, दुर्जन होय. तर तिमिर म्हणजे अंधार, अज्ञान, अंधश्रद्धा अशा पापरुपी अंधाराचा नाश होऊन सगळ्या जगाने सुधर्मरूप सूर्याच्या प्रकाशात पाहावे, माणूस लोभ, मद, माया, मोहो, मत्सर याने तो बांधला जातो. याने शत्रू बलवान होतात व समाजात त्राही त्राही निर्माण करतात. जो धर्म निष्कामवृत्ती शिकवतो, त्या निष्काम वृत्तीने कर्म केल्यास स्वधर्म आचरणाच्या प्रकाशात सर्वांना ज्ञानरूपी प्रकाश मिळेल.असे संत ज्ञानेश्वर त्या विश्वात्म्याकडे मागणे मागतात. पसायदानातून विश्व कल्याणाचा व्यापक संदेश दिला असून तो संदेश आचरणात आणणे म्हणजेच मनाचा दीपोत्सव साजरा करणे होय.

संत ज्ञानेश्वर व त्यांच्या भावंडानी सामाजिक हालअपेष्टा सोसून पिचलेल्या सामाज्याला त्यांनी ज्ञानेश्वरी, अमृतानुभव, चांगदेव पाषष्टी व हरिपाठ यातून समाजाला समजेल असा ज्ञानरूपी वारसा निर्माण करून दिला. ती वारी आज सातशे वर्षांपासून अविरतपणे चालू आहे. हीच संत विचारांची ताकद आहे.

**

# भगवंतप्राप्तीचे सुख देणारी वारी

सौ. मोक्षदा घाणेकर

महाराष्ट्रातील सर्वात मोठा लोकोत्सव म्हणजे पंढरीची वारी. दरवर्षी आषाढी-कार्तिकी एकादशीच्या निमित्ताने देशभरातून लाखो वारकरी पंढरपुरात दाखल होतात. शेकडो किलोमीटरचा पायी प्रवास केल्यानंतर विठुरायाचे झालेले मुखदर्शन साक्षात भगवंतप्राप्ती झाल्याचे सुख त्यांना देते. **आधी रचिली पंढरी, नंतर वैकुंठ नगरी । संत नामदेव महाराजही आपल्या अभंगात सांगतात, जेव्हा नव्हते चराचर, तेव्हा होते पंढरपूर !** पृथ्वीवरील केवळ दोनच तीर्थक्षेत्रे नाश न पावणारी आहेत. एक म्हणजे काशी आणि दुसरे म्हणजे पंढरपूर, कारण या क्षेत्रांचा अविनाशी तत्त्व असा महिमा भगवान शंकर आणि विष्णु यांनी आपल्या अखंड वास्तव्याने कथन केला आहे. काशीमध्ये शंकराचे आणि पंढरपूरमध्ये विष्णूचे स्थूल रूपात अस्तित्व आहे; म्हणूनच प्रत्येक हिंदू इहलोकाची यात्रा संपवण्यापूर्वी एकदा तरी काशीस अथवा पंढरपूरला जावे, अशी इच्छा बाळगून असतो. अशी थोरवी प्राप्त झालेले हे पंढरपूर तीर्थक्षेत्र आहे. **पृथ्वीवरी तीर्थे असती अपार । परी पंढरीची सर । एकाही नाही ।। असा दाखला संत नामदेव महाराज देतात, तर न करी आळस । जाय पंढरीशी । अवघी सुखराशी । तेथे आहे ।।**, असे संत चोखामेळा यांनी म्हटले आहे. काशीच्या पाच यात्रा, द्वारकेला तीन वेळा जाणे, या दोन्ही यात्रांनी जेवढे पुण्य मिळते, तेवढेच पुण्य एका पंढरपूरच्या वारीने मिळते. सर्व सुखाचे आगर आणि संत मंडळींचे माहेरघर असल्यानेच **'अवघी दुमदुमली पंढरी । भगव्या पताका खांद्यावरी । तुळशी वृंदावन डोक्यावरी । भाव भुकेल्यांची ही वारी ।,'** असे म्हटले जाते. संत ज्ञानेश्वरांनी वारी या व्रताचा प्रारंभ केला. तेव्हापासून चालू असलेल्या वारीमुळे पंढरपुरातील श्री विठ्ठलाची मूर्ती जागृतावस्थेत आली आहे. वारकरी राम कृष्ण हरी । असे नामसंकीर्तन सतत करत पंढरीस जातात. कलियुगात ईश्वराची कृपा संपादन करणाऱ्या एका व्यक्तीपेक्षा सर्व मिळून जेव्हा कृपा संपादनाचा प्रयत्न करतात, तेव्हा ती समष्टी साधना होते. वारीमध्ये व्यष्टीसह समष्टी साधनाही होते आणि सर्व जिवांच्या उद्धारासाठी विठ्ठलाला पंढरपुरात भूतलावर यावेच लागते. या तीर्थाचा महिमाच असा आहे. येथील भक्तांच्या तळमळीमुळे विठ्ठलाला पंढरपुरात यावेच लागते. पंढरपूरच्या वारीने आपल्या जीवनात भक्तीचा अखंड झरा पाझरू लागतो. भावभक्तीचे बीज प्रत्येकाच्या अंतर्मनात रुजवणारी ही वारी पृथ्वीच्या अंतापर्यंत अशीच चालू रहाणार आहे. भक्तांच्या संकटसमयी धावून येण्यासाठी, आपल्या भक्तांची इच्छा पूर्ण करण्यासाठी विठ्ठल पंढरपुरात उभा आहे. देव भावाचा भुकेला आहे, याची प्रचीती घ्यायची असल्यास पंढरपूरला जावे. शिस्तीचे दर्शन हे पालख्यांचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणावे लागेल. प्रत्येक दिंडीची रचना ठरलेली आहे. प्रारंभी भगवे ध्वजधारी वारकरी, मग तुळशी-वृंदावन घेतलेल्या महिला, त्यामागे टाळकरी,



नंतर विणेकरी अशीच सर्व दिंड्यांची रचना असते. टाळ वाजवणाऱ्या वारकऱ्यांचा पदन्यासही लयबद्ध असतो. भले टाळकरी-वारकरी शेकडोंच्या संख्येने का असेना ! वैयक्तिक जीवनातील अभिनिवेष बाजूला ठेवून ईश्वराच्या नामस्मरणात देहभान विसरायला लावणारा आध्यात्मिक सोहळा म्हणजे पंढरपूरची वारी !

पांडुरंग हे सामान्यांचे दैवत आहे. पांडुरंगाचा रंग सावळा आहे आणि कृष्णही सावळाच आहे. काळा रंग हा अद्वैताचा आहे. वृंदावनातील गोपी कृष्णाला म्हणत, ''अरे कृष्णा, तू अमावास्येला अंगावर काळी घोंगडी घेऊन यमुनाकाठी कदंब वृक्षावर बसलास की, तू आम्हाला दिसतच नाहीस; कारण रात्र काळी, यमुना काळी, तू काळा आणि घोंगडीही काळीच! अशा वेळी हे सर्व अद्वैत होऊन जाते.'' संत ज्ञानदेव म्हणतात, **'तुज सगुण म्हणों कीं निर्गुण रे । सगुण निर्गुण एकु गोविंदु रे ।'** म्हणजेच तो सगुण आहे आणि निर्गुणही आहे. त्याचे सगुण स्वरूप हे निर्गुणच आहे. तो स्वच्छ म्हणजे निर्मळ आहे. त्याची इंद्रिये विकाररहित आणि स्वच्छ आहेत. तो आत-बाहेर स्वच्छ आहे; म्हणून तो 'पांडुरंग' आहे. एकदा लहानपणी संत ज्ञानेश्वर आणि मुक्ताबाई खेळत असतांना मुक्ताबाई ज्ञानदेवांना म्हणाली, ''अरे दादा, तू या पांडुरंगाला निर्गुण म्हणतोस; परंतु हा तर सगुण स्वरूपात येथे कटीवर हात ठेवून उभा आहे.'' त्यावर संत ज्ञानेश्वर महाराज म्हणतात, ''मुक्ता, मी तुला गुरुमुखातून सांगतो. अगं, हा निर्गुणी बुंद (बिंदु) सगुणी उतरला आहे.'' एकूणच हा निर्गुणच सगुण स्वरूपात इथे दिसत आहे. तो कष्टकरी, शेतकरी, सामान्यजन आणि अनाथ यांचा कैवारी आहे; म्हणून तो (उन्हात कष्ट करून रापलेला असा) काळ्या रंगाचा झाला आहे. असा हा सगुण-निर्गुण रूपी पांडुरंग आहे. पांडुरंग हा शैव आणि वैष्णव दोघांचाही देव आहे. याला शैव आणि वैष्णव दोघेही भजतात. शैव पंथीय पांडुरंगाला 'वीरभद्र' म्हणजेच 'विठ्ठल' म्हणतात, तर वैष्णव त्याला 'गोपाळकृष्ण' असे म्हणतात. तो विष्णु आणि शिव यांचा अवतार आहे; म्हणूनच तो 'हरिहर' आहे. असा हा पांडुरंग श्रीकृष्णाचाच अवतार आहे. काही जण 'विठ्ठल हा भगवंताचा नववा अवतार बुद्ध आहे', असेही म्हणतात. (आद्यशंकराचार्यांच्या काळात भारतात काही नवीन धार्मिक प्रवृत्तींचा उदय होऊन जैन, बौद्ध इत्यादी धर्मपंथ उदयास आले होते. महाराष्ट्रातही बौद्ध धर्माचा प्रभाव असल्याचे दिसून येते; कारण कोकण किनारपट्टी, घाटमाथा, मराठवाडा येथील सह्याद्री पर्वताच्या रांगांमध्ये बुद्धाच्या कलाकृती असलेल्या गुंफा दिसतात.) जैन विठ्ठलाला 'तो बाविसावा तीर्थंकर नेमीनाथ आहे', असे मानतात. नेमीनाथ आणि कृष्ण हे दोघेही गोपाळच होते. ते यदुकुलोत्पन्नच होते. नेमीनाथ हाही विठ्ठलासारखा वर्णाने सावळा होता. नेमीनाथांचे शंख हे चिन्ह विठ्ठलानेही धारण केले आहे. त्यामुळे या सर्व लक्षणांवरून 'विठ्ठल हा दिगंबर नेमीनाथ असावा', असे जैनांचे मत आहे.

**

# निवडक

## खोपोलीत रन फॉर युनिटी उपक्रम

**खोपोली :** राष्ट्रीय एकता दिनानिमित्त (दि.३१) ऑक्टोबर रोजी रन फॉर युनिटी अर्थात एकता दौड या उपक्रमाचे आयोजन खोपोली पोलीस ठाण्याच्या वतीने करण्यात आले होते. या उपक्रमाचा आरंभ खोपोली पोलीस ठाणे येथून झाला. शहरातील विविध भागांतून एकता दौडेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. नागरिकांनी ठिकठिकाणी दौडचे स्वागत करून सर्वांचा उत्साह अधिकच वृद्धिंगत केला. अखेरीस या दौडची पोलीस ठाण्याच्या आवारात सांगता झाली. या प्रसंगी खालापूर उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. विशाल नेहुल यांनी दौडमध्ये सहभागींचे झालेल्यांचे आभार मानत कौतुक केले. त्यांनी राष्ट्रीय एकतेचे महत्त्व अधोरेखित करत समाजातील सर्व घटकांनी परस्पर सलोखा आणि बंधुतेचा संदेश जनमानसात पोहोचवावा, असे आवाहन केले. रायगड जिल्ह्याच्या पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांच्या मार्गदर्शनाखाली या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. खोपोली पोलीस ठाण्याचे निरीक्षक सचिन हिरे यांच्या पुढाकाराने संपूर्ण कार्यक्रम अत्यंत शिस्तबद्ध आणि प्रभावीपणे पार पडला. पोलीस अधिकारी आणि कर्मचारी यांनी देखील या उपक्रमात उत्साहाने सहभाग घेत समाजात एकतेचा संदेश दिला.

## म्हसळ्यात मॅरेथॉन स्पर्धा संपन्न



**। म्हसळा । प्रतिनिधी ।**

म्हसळा पोलीस स्टेशन व तहसील कार्यालयच्या वतीने म्हसळा बायपास ते अंजुमन इस्लाम हायस्कुल पर्यंत भारताचे लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल जयंतीनिमित्त राष्ट्रीय एकता दिवसाच्या निमित्ताने मिनी मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत शासकीय तसेच स्थानिक तरुणांनी या स्पर्धेत सहभाग नोंदवला. यावेळी तहसीलदार सचिन खाडे, सहायक पोलीस निरीक्षक रवींद्र पारखे, ज्ञानेश्वर एडवले, मयूर बनकर, सागर चितारे, आणी प्रशासकीय कर्मचारी उपस्थीत होते. या उपक्रमाद्वारे राष्ट्रीय एकतेचा संदेश देत समाजातील सर्व घटकांनी एकत्र येऊन देशाच्या ऐक्याचा संकल्प दृढ करावा असे तहसीलदार सचिन खाडे यांनी या कार्यक्रम प्रसंगी सांगितले.

## श्रेयस अय्यरला रुग्णालयातून डिस्चार्ज

**नवी दिल्ली :** भारतीय उपकर्णधार श्रेयसला रुग्णालयातून डिस्चार्ज देण्यात आला आहे. २५ ऑक्टोबर रोजी सिडनी येथे खेळल्या गेलेल्या तिसऱ्या एकदिवसीय सामन्यात अय्यरला दुखापत झाली होती. तेव्हापासून त्याच्यावर सिडनीतील रुग्णालयात उपचार सुरू होते. पूर्णपणे फिट असल्याचे डॉक्टरांनी सांगितल्यानंतरच तो भारतात परत येईल. ऑस्ट्रेलियाच्या डावातील ३४ व्या ओव्हरमध्ये हर्षित राणाच्या चेंडूवर ॲलेक्स कॅरीने फटका मारला. श्रेयसने पॉईंटवरून थर्डमॅनच्या दिशेने धावत जाऊन झेल पकडला, पण झेल घेताना त्याचा तोल गेला आणि त्याच्या डाव्या बरगडीला दुखापत झाली होती.



## भारत-पाकिस्तान पुन्हा भिडणार

**नवी दिल्ली :** आशिया चषक २०२५ च विजेतेपद पटकावल्यानंतर भारतीय क्रिकेट संघाला अद्याप ट्रॉफी मिळालेली नाही, दरम्यान आशियाई क्रिकेट परिषदेने रायझिंग स्टार्स आशिया चषकाचे वेळापत्रक जाहीर केले आहे. यामध्ये एकूण ८ संघ सहभागी होणार असून त्यांची ४-४ अशा दोन गटात विभागणी करण्यात आली आहे. भारत आणि पाकिस्तानच्या 'अ' संघांना 'अ' गटात स्थान मिळाले असून, या दोन्ही संघांमध्ये चुरशीची लढत पाहायला मिळणार आहे. ही स्पर्धा १४ नोव्हेंबरपासून सुरु होणार आहे. आशियाई क्रिकेट परिषदेने जाहीर केलेल्या रायझिंग स्टार्स चॅम्पियनशिपच्या वेळापत्रकानुसार, स्पर्धेतील पहिला सामना पाकिस्तान-अ आणि ओमान संघांमध्ये १४ नोव्हेंबर रोजी दोहा क्रिकेट मैदानावर खेळवला जाईल. भारत आणि पाकिस्तान अ संघ यांच्यात १६ नोव्हेंबरला सामना होणार आहे. हा सामना भारतीय वेळेनुसार रात्री ८ वाजता सुरु होईल. या सामन्यापूर्वी भारतीय संघाला १४ नोव्हेंबरला यूएई संघाविरुद्ध पहिला सामना खेळायचा आहे. रायझिंग स्टार्स चॅम्पियनशिपमधील दोन्ही संघांच्या गटांबद्दल बोलायचं झाल्यास, भारत आणि पाकिस्तान व्यतिरिक्त, यूएई आणि ओमानचा समावेश 'अ' गटात आहे.

# महिला क्रिकेटला मिळणार नवा 'विश्वविजेता'

## ■ भारताचा विश्व विक्रमी विजय ■ आफ्रिका संघ पहिल्यांदाच अंतिम फेरीत

**। नवी मुंबई । प्रतिनिधी ।**

अखेर आयसीसी महिला विश्वचषक २०२५ च्या अंतिम फेरीत रविवार, २ नोव्हेंबर रोजी नवी मुंबईच्या डीवाय पाटील स्टेडियमवर होणाऱ्या या महाअंतिम सामन्यात भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यात विश्वचषकाच्या किताबासाठी कडवी झुंज पाहायला मिळणार आहे.

गुरुवारी (दि. ३०) भारतीय संघाने दुसऱ्या उपांत्य फेरीत गतविजेत्या ऑस्ट्रेलियावर ऐतिहासिक आणि विश्वविक्रमी विजय मिळवला. यासह निकालासह हे निश्चित झाले की, २५ वर्षांच्या प्रदीर्घ प्रतीक्षेनंतर महिला क्रिकेटला एक नवा विश्वविजेता संघ मिळणार. भारताचा विश्व विक्रमी विजय आणि अंतिम फेरीतील धडक विश्वचषक स्पर्धेची सुरुवात ३० सप्टेंबर रोजी गुवाहाटी येथे भारत आणि श्रीलंका यांच्यातील सामन्याने झाली होती आणि आता ३० ऑक्टोबरला डीवाय पाटील स्टेडियमवर स्पर्धेचा दुसरा उपांत्य सामना खेळला गेला. या सामन्यात ऑस्ट्रेलियाने प्रथम फलंदाजी करताना ३३८ धावांचा विशाल डोंगर उभा केला. मात्र, जेमिमा रॉड्रिग्जच्या विक्रमी शतकाच्या आणि कर्णधार हरमनप्रीतच्या अविस्मरणीय खेळीच्या बळावर भारतीय संघाने हा सामना ५ गडी राखून जिंकला आणि दिमाखात अंतिम फेरीत स्थान मिळवले.



### आफ्रिकेने केला इंग्लंडचा पराभव

**महिला वनडे विश्वचषकाचा पहिला उपांत्य सामना दक्षिण आफ्रिका आणि इंग्लंड महिला क्रिकेट संघात झाला. दक्षिण आफ्रिकेने हा सामना १२५ धावांनी जिंकला. या विजयासह आफ्रिकन संघाने प्रथमच अंतिम फेरीत स्थान निश्चित केले आहे. तर इंग्लंडच्या यशाचा शेवट झाला. सामन्यात प्रथम फलंदाजी करताना दक्षिण आफ्रिकेनं ५० षटकांत ७ गडी गमावून ३१९ धावा केल्या. प्रत्युत्तरादाखल इंग्लंडला पूर्ण ५० षटकही फलंदाजी करता आली नाही आणि ४२.३ षटकांत १९४ धावांवर सर्वबाद झाले. दक्षिण आफ्रिकेने पहिल्यांदाच विश्वचषकाच्या अंतिम फेरीत प्रवेश मिळवला आहे.**

आता महाअंतिम सामन्यात भारतीय संघाचा सामना दक्षिण आफ्रिकेविरुद्ध होईल. आफ्रिकन संघाने पहिल्या उपांत्य सामन्यात इंग्लंडला पराभूत करून अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. भारत तिसऱ्यांदा तर द. आफ्रिका पहिल्यांदा अंतिम फेरीतभारतीय संघ तिसऱ्यांदा विश्वचषकाच्या अंतिम फेरीत पोहोचला आहे. यापूर्वी, संघाने २०१७ मध्ये आपला शेवटचा अंतिम सामना खेळला होता, तर सर्वप्रथम २००५ मध्ये भारतीय संघ विश्वचषक जिंकण्याच्या अगदी जवळ पोहोचला होता. मात्र, मागील दोन्ही अंतिम सामन्यांमध्ये भारतीय संघाला पराभवाचे दुःख सहन करावे लागले आहे. २००५ मध्ये ऑस्ट्रेलियाने, तर २०१७ मध्ये विजय अगदी हातातोंडाशी आलेला असतानाही, इंग्लंडने भारतीय संघाला पराभूत केले होते.

याउलट, दक्षिण आफ्रिका संघ पहिल्यांदाच विश्वचषकाच्या अंतिम फेरीत दाखल झाला आहे. यापूर्वी २०१७ आणि २०२२ मध्ये, दोन्ही वेळा त्यांना उपांत्य फेरीत पराभवाचा सामना करावा लागला होता. पण या वेळी लॉरा वोल्वार्टच्या नेतृत्वाखालील आफ्रिकी संघाने आपला मागील हिशेब चुकता केला आहे. २५ वर्षांनंतर नवा इतिहासमहिला विश्वचषक २०२५ च्या स्पर्धेचा अंतिम सामना विशेष महत्त्वाचा आहे, कारण महिला क्रिकेटला नवीन विश्वविजेता मिळणार आहे.

तब्बल २५ वर्षांच्या दीर्घ कालावधीनंतर महिला विश्वचषक स्पर्धेच्या अंतिम फेरीत एका नवीन विजेत्याचा फैसला होणार आहे. यापूर्वी विश्वचषक २००० मध्ये असे घडले होते, जेव्हा न्यूझीलंडने अंतिम सामन्यात ऑस्ट्रेलियाला पराभूत करून पहिला आणि एकमेव किताब जिंकला होता. त्यापूर्वी आणि त्यानंतरही केवळ ऑस्ट्रेलिया आणि इंग्लंड या संघांचे वर्चस्व राहिले आहे. दरम्यान, यंदाच्या ऐतिहासिक अशा अंतिम सामन्यातून महिला क्रिकेटला चौथी विश्वविजेती टीम गवसणार आहे. भारत-द. आफ्रिका क्रिकेटमधील तिसरा विश्वचषक अंतिम सामनाभारत आणि द. आफ्रिका यांच्यातील वरिष्ठ क्रिकेटमधील हा केवळ दुसराच विश्वचषक अंतिम सामना असेल. यापूर्वीचा अंतिम सामना २०२४ मध्ये पुरुषांच्या टी-२० विश्वचषकात खेळला गेला होता, ज्यात भारताने खिताब जिंकला होता. महिला क्रिकेटचा विचार केल्यास, याच वर्षी १९ वर्षांखालील टी-२० विश्वचषकात भारत आणि द. आफ्रिका यांच्यात लढत झाली होती, ज्यात भारताने बाजी मारली होती. सुमारे दीड वर्षांच्या कालावधीत भारत-द. आफ्रिका यांच्यातील हा तिसरा विश्वचषक अंतिम सामना असणार आहे. या विश्वचषकाचा विचार केल्यास, दोन्ही संघांमध्ये लीग स्टेजमध्ये लढत झाली होती, ज्यात द. आफ्रिकेने थरारक विजय मिळवला होता. त्यामुळे अंतिम सामना अधिक रोमांचक होणार यात शंकाच नाही.

## एकता दौडला उत्स्फूर्त प्रतिसाद



**। उरण । प्रतिनिधी ।**

सरदार वल्लभाई पटेल यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त उरण पोलीस ठाणे व मोरा सागरी पोलीस ठाण्याच्या वतीने उरण शहरात आयोजित करण्यात आलेल्या एकता दौड RUN FOR UNITY / W-LK-THON ला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला आहे .

पोलीसांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या एकता दौड उरण शहरातील पेन्शन पार्क या ठिकाणाहून सुरू होऊन पुढे स्वामी विवेकानंद चौक, गांधी पुतळ्या समोरून गणपती चौक, राजपाल नाका मार्गाने पालवी हॉस्पिटल समोरून कामठा मार्गे एनआय हायस्कूलमार्गे पुन्हा स्वामी विवेकानंद चौक मार्गाने पेन्शन पार्क, उरण या ठिकाणी संपन्न झाली आहे.

यावेळी उरण पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक हनीफ मुलानी यांनी मार्गदर्शन केले. सदर एकता दौड मध्ये पोनि संजय जोशी, उरण पोलीस ठाण्याचे सपोनि/पोउपनि ५, अंमलदार ४५, तसेच मोरा सागरी पोलीस ठाण्याचे सपोनि/पोउपनि २, अंमलदार २० सह मोठ्या संख्येने नागरिक, माजी नगरसेवक, पोलीस पाटील, सागर रक्षक दल सदस्य, विद्यार्थी सहभागी झाले होते.

## कर्जतमध्ये पोलीसांचा सहभाग



**। कर्जत । प्रतिनिधी ।**

कर्जत पोलीस ठाणे हद्दीत शुक्रवार (दि.३१) ऑक्टोबर रोजी सरदार वल्लभभाई पटेल यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त राष्ट्रीय एकता दिवस अनुषंगाने राष्ट्रीय एकता दौडचे आयोजन करण्यात आले होते.

सदर एकता दौड श्री विठ्ठल मूर्ती कर्जत येथून श्रीरामपूर, महावीर पेठ, मुख्य बाजारपेठ, जकात नाका- रेल्वे स्टेशन येथे समाप्त झाली आहे.

सदर राष्ट्रीय एकता दौडमध्ये उपविभागीय पोलीस अधिकारी राहुल गायकवाड, कर्जत पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संदीप भोसले, तसेच कर्जत पोलीस ठाण्यामधील ३ अधिकारी, १५ अंमलदार, आर सी पी प्लाटून २५ अंमलदार व प्रहार अकॅडमी, देवा अकॅडमी, कोकण ज्ञानपीठ महाविद्यालयातील ३५० ते ४०० विद्यार्थी विद्यार्थिनींनी या राष्ट्रीय एकता दौडमध्ये सहभाग घेतला होता.

## फिडे विश्वकरंडकाचा गोव्यात महोत्सव

**। पणजी । वृत्तसंस्था ।**

फिडे विश्वकरंडक स्पर्धेचे यजमानपदम्हणजेभारतीयबुद्धिमत्ता, संयम आणि सांस्कृतिक वारसा यांचा गौरव महोत्सव असल्याचे मत केंद्रीय क्रीडामंत्री डॉ. मनसुख मांडविय यांनी शुक्रवारी व्यक्त केले. फिडे विश्वकरंडक बुद्धिबळ स्पर्धे चे उद्‌घाटन शुक्रवारी ताळगाव पठारावरील डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी इनडोअर स्टेडियममध्ये झाले. तब्बल २३ वर्षांनंतर पुन्हा एकदा विश्वकरंडकाचे यजमानपद सांभाळणे हे भारतासाठी गौरवास्पद आहे. हा नवा भारत आहे. भारतीय बुद्धीच्या युद्धभूमीतही बाजी मारत आहेत. बुद्धिबळातून भारतीय संस्कृती प्रतिबिंबित होत आहे.

## मुष्टियुद्धात चंद्रिकाची सुवर्ण कामगिरी

**। पुणे । प्रतिनिधी ।**

मातोश्री रमाबाई आंबेडकर रस्ता परिसरातील वस्तीमध्ये राहून प्रतिकूल परिस्थितीवर मात करत चंद्रिका पुजारीने युवा खेळाडूने बहरीन येथे सुरू असलेल्या तिसऱ्या आशियाई युवा क्रीडा स्पर्धा २०२५ मध्ये सुवर्णपदकावर आपले नाव कोरले आहे. चंद्रिकाने मुष्टियुद्ध प्रकारात ५४ किलो वजनी गटामध्ये उझबेकिस्तानच्या खेळाडूवर मात करत सुवर्णपदक पटकाविले आहे. चंद्रिकाने सुवर्णपदकास गवसणी घातल्यानंतर तिच्या कुटुंबीयांसह ताडीवाला रस्ता परिसरातील रहिवाशांनी जल्लोष केला.

अतिशय प्रतिकूल परिस्थितीही चंद्रिकाला चांगले शिक्षण मिळावे, यासाठी आई-वडिलांनी प्रयत्न केले. याबरोबरच तिच्यातील मुष्टियुद्ध या खेळातील आवड कायम राहावी, यासाठीही तिला प्रोत्साहन दिले. तेथील सजनाबाई भंडारी विद्यालयात मुष्टियुद्ध खेळाची आवड निर्माण झाल्यानंतर चंद्रिकाला नालंदा बुद्ध विहारात मुलांना मुष्टियुद्ध खेळाचे प्रशिक्षण देणाऱ्या जयंत शिंदे यांनी प्रशिक्षण देण्यास सुरुवात केली. पुढे सचिन शिंदे यांच्या अकॅडमीमध्ये तिला पुढील प्रशिक्षण मिळाले.

## रसायनीत रन फॉर युनिटी कार्यक्रम



**। रसायनी । प्रतिनिधी ।**

भारताचे पहिले उपपंतप्रधान तथा गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त संपूर्ण देशात ३१ ऑक्टोंबर हा दिवस राष्ट्रीय एकता दिवस साजरा करण्यात आला. यांच्या जयंती दिनानिमित्त संपूर्ण देशामध्ये गृह खात्यामार्फत राष्ट्रीय एकता दिवस साजरा करण्यात आला.

रायगडजिल्हापोलीसअधीक्षक आंचल दलाल यांच्या निर्देशानुसार रसायनी पोलीस स्टेशन मार्फत एकता दौडचे आयोजन करण्यात आले होते. एकता दौडचा प्रारंभ सकाळी ७:३० वाजता मोहोपाडा येथील एनआयएसएम (सेबी)च्या मुख्य प्रवेशद्वारापासून करण्यात आला. या एकता दौडमध्ये रसायनी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय बांगर, पोलीस उपनिरीक्षक प्रमोद हंबीर, महिला पोलीस उपनिरीक्षक अनुसया ढोणे तसेच पोलीस अधिकारी कर्मचारी यांच्यासह जय प्रेझेशन कंपनीच्या महिला अधिकारी कर्मचारी, श्री करिअर अकॅडमीचे विद्यार्थी विद्यार्थिनी, पोलीस पाटील, महिला दक्षता समितीच्या महिला पदाधिकारी तसेच प्रतिष्ठित नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. एकता दौडमध्ये सहभागी झालेल्या सर्वांचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय बांगर यांनी स्वागत करून आभार मानले.

## पोलिसच्या वतीने एकता दौड

**। नागोठणे । प्रतिनिधी ।**

नागोठणे पोलीस ठाण्याचे वतीने नागोठणे विभागातील सुकेळी येथील जिंदाल माऊंट लिटेरा झी स्कूलमध्ये शुक्रवारी (दि.३१) एकता दौडला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या एकता दौडमध्ये रोहाचे पोलीस उपअधीक्षक प्रसाद गोकुळे, नागोठणे पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी सचिन कुलकर्णी, उपनिरीक्षक नरेश थळकर, मनोहर सुटे, सोपान जांबेकर, निखिल मढवी, स्वागतिका साहू, के.के. पांडे, सूर्यकांत वर्मा, जयेश गुप्ता, संदीप पाटील, परेश पाटील, धनंजय महाडिक, चंद्रकांत पाटील, अथर्व पाटील, स्वप्नील भालेराव, किरण ठाकूर, एस.एन. महाले, साक्षी पाटील, वृषाली मांटे, रोहिदास लाड, श्रेया कुंटे, आनंद लाड, शेखर गोळे, निवृत्ती जंगले, धनराज उमाळे, तिरथ पोलिसानी, ज्ञानेश्वर शिर्के, जितेंद्र धामणसे, राजू कोकळे, जगन कोकळे आदींसह विद्यार्थी व शिक्षक या एकता दौडमध्ये सहभागी झाले होते.



## मुरुडमध्ये विविध स्पर्धांचे आयोजन



**। मुरुड जंजिरा । प्रतिनिधी ।**

भारताचे पहिले गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त रायगड पोलीस दलाच्या वतीने मुरुड पोलीस ठाणेतर्फे मुरुड शहरात मुरुड पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरक्षक परशुराम कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली एकता दौडचे आयोजन मुरुड शहरात करण्यात आले होते.

शुक्रवार (दि.३१) ऑक्टोबर रोजी सरदार वल्लभभाई पटेल यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त राष्ट्रीय एकता दिवस अनुषंगाने राष्ट्रीय एकता दौडचे आयोजन करण्यात आले होते. मुरुड तालुक्यांतील धावपटू व क्रीडाप्रेमी तसेच युवा वर्ग मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

पहाटे पोलीस मैदानात वरिष्ठ पोलीस निरीक्षक परशुराम कांबळे यांनी सहभागी धावपटुंना पटेल यांच्या दूरदृष्टी, राष्ट्राची एकता, अखंडता अबाधित राखण्यासाठीची शपथ दिली.

त्यानंतर दौडचे प्रस्थान पी .के आरेकर यांनी केले

पोलीस ठाण्यापासून परेश हॉटेल-दस्तुरी नाका -विठ्ठल रखुमाई मंदीर, गोल बंगला, लक्ष्मी नारायण मंदीर, आझाद चौक, श्रीराम भवन, एकदरा पुल, मच्छिमार्केट या मार्गावर सुमारे ५ कि.मी अंतरावर युवावर्गाने धावून एकतेचा संदेश दिला. समुद्रकिना री या दौडचा समारोप करण्यात आला. यामध्ये प्रथम क्रमांक प्राप्त समीर माळी, द्वितीय क्रमांक सौरभ पाटील, तर तृतीय क्रमांक सर्वेश काबुकर यांना चषक देऊन गौरविण्यात आले.

## पुणेरी पलटणलाचा दुसऱ्यांदा पराभव | दिल्लीला दुसऱ्यांदा पीकेएलचे जेतेपद

# प्रो-कबड्डीत दिल्लीची दबंगाई

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

दोन महिन्यांच्या उत्साह आणि दमदार सामन्यांनंतर, प्रो-कबड्डी लीगच्या १२ व्या हंगामाचा अंतिम सामना ३१ ऑक्टोबर रोजी खेळवण्यात आला. दिल्लीच्या त्यागराज स्टेडियमवर खेळवण्यात आलेल्या या सामन्यात, दबंग दिल्लीने पुणेरी पलटनचा ३०-२८ असा पराभव केला. दोन्ही संघांनी संपूर्ण हंगामात असाधारण कामगिरी केली आणि आता त्यांना इतिहास घडवण्याची संधी होती आणि यात दबंग दिल्ली विजयी झाली. चार वर्षांनंतर हे दबंग दिल्लीचे दुसरे पीकेएल जेतेपद आहे.

दोन्ही संघांनी पहिल्या हाफची सुरुवात दमदार केली, परंतु दबंग दिल्लीने पुणेरी पलटनवर लवकरच दबाव आणण्यात यश मिळवले. पहिल्या हाफमध्ये संघाने २० गुण मिळवले, तर पुणेरी पलटन १४ गुणांपर्यंत मर्यादित राहिले. दिल्लीच्या रेडर्सनी अर्ध्यामध्ये १३ रेड पॉइंट्स मिळवले, ज्यामध्ये नीरज नरवालचा संस्मरणीय सुपर रेडचा समावेश होता. मध्यंतराला स्कोअर २०-१४ होता आणि दबंग दिल्ली मजबूत स्थितीत होती. दबंग दिल्लीने यापूर्वी २०११-२२ मध्ये पटना पायरेट्सचा पराभव करुन पीकेएलचं विजेतेपद जिंकलं होतं, तर २०२३-२४ मध्ये अंतिम फेरीत हरियाणा स्टीलर्सचा पराभव करुन पुणेरी पलटणने ट्रॉफी जिंकली होती. या हंगामात दोन्ही संघांनी लीग टप्प्यात प्रत्येकी १३ सामने जिंकण्यात यश मिळवले. प्रत्येकी २६ गुणांसह, ते पॉइंट टेबलच्या पहिल्या दोनमध्ये राहिले आणि अखेर अंतिम फेरीत त्यांचे स्थान निश्चित झाले. प्रो कबड्डी लीग २०२५ चं विजेतेपद जिंकणाऱ्या संघाला ३ कोटी रुपयांची बक्षीस रक्कम मिळाली. तर उपविजेत्या संघाला, पुणेरी पलटणला १.८ कोटी रुपयांची बक्षीस रक्कम मिळाली.



दबंग दिल्लीने पुणेरी पलटनचा ३१-२८ ने पराभव करून प्रो-कबड्डी लीग १२ ची ट्रॉफी पटकवाली आहे. प्रो कबड्डी लीगच्या इतिहासात दिल्ली दुसऱ्यांदा चॅम्पियन बनली आहे. शेवटच्या दीड मिनिटात पुण्याला मॅच फिरवण्याची संधी होती, पण दिल्लीच्या डिफेंडरनी आदित्य शिंदेला टॅकल करून ऐतिहासिक विजय मिळवला. याआधी दिल्लीने आठव्या सिझनमध्ये ट्रॉफी जिंकली होती. पहिल्या हाफमध्ये दोन्ही टीमने उत्कृष्ट सुरूवात केली, पण दबंग दिल्लीला पुणेरी पलटनवर दबाव बनवण्यात यश आले. दिल्लीने पहिल्या हाफमध्ये २० पॉईंट्स मिळवले, तर पुण्याला १४ पॉईंट्सवर समाधान मानावे लागले.

### दुसऱ्या हाफमध्ये पलटनचे कमबॅक

**दुसऱ्या हाफमध्ये पुणेरी पलटनने कमबॅकचा प्रयत्न केला. आदित्य शिंदेने लागोपाठ रेड करून १० पॉईंट्स मिळवले, त्यामुळे काही काळ दिल्ली दबावात आली. पण दिल्लीचा कर्णधार आशु मलिकने संयम ठेवला आणि दुसऱ्या हाफमध्येही टीमने २० पॉईंट्स मिळवले. तर पुण्याला पुन्हा एकदा १४ पॉईंट्स घेण्यात यश आलं. शेवटच्या मिनिटामध्ये आशू मलिकची डू-ऑर-डाय रेड निर्णायक ठरली आणि दिल्लीने रोमाचंक विजय मिळवला.**

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ.सुप्रिया पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)